CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

धाराशिव | शनिवार, २० जून २०२६ | वर्ष ४ थे अंक १०३ | पाने १२ | किंमत रु. ८/- ■ RNI No. MAHMAR/2023/86468 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026. dainiktarunbharat.com epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



अनेक समस्यांमुळे आपण अधीर होता कामा नये. तथापि, केवळ आपणच सर्व काही ठीकठाक करू शकतो, हा विचारही योग्य नाही. सर्वांमध्ये सामावलेल्या समान बिंदूंना एका सूत्रात गुंफत हळूहळू पुढे जायला हवे.

**– स्व. यादवराव कृष्ण जोशी**
रा. स्व. संघाचे पूर्व सह सरकार्यवाह

# मंगळवारपासून राज्यात बरसणार मान्सून धारा

## । हवामान विभागाचा अंदाज । पुढील वाटचालीसाठी पोषक वातावरण

**नवी दिल्ली, १९ जून**

गेल्या दोन आठवड्यांपासून रखडलेला मान्सून दोन दिवसांत जोर पकडणार आहे. यासाठी पोषक वातावरण तयार झाले असून कोरड्या हवेच्या प्रभावाला मोडून मान्सून आता वेग पकडण्यासाठी सज्ज आहे. रेंगाळलेला मान्सून पुढे सरकण्यासाठी परिस्थिती निर्माण झाली असून, २३ जून, मंगळवारपासून महाराष्ट्रात मान्सून सक्रिय होणार आहे. विदर्भ, मध्य, पश्चिम महाराष्ट्रात मुसळधार पाऊस कोसळण्याचा अंदाज हवामान विभागाने शुक्रवारी वर्तविला आहे.

देशातील बहुतांश भाग मान्सूनची चातकासारखी वाट बघत असून, पावसाची तूट वाढत चालली आहे. मान्सूनच्या मोठ्या खंडामुळे सर्वांमध्येच चिंतेचे वातावरण आहे. मान्सूनला भारतीय उपखंडात पुढे ढकलणारी वातावरणीय स्थिती प्रचंड कमकुवत राहिली. मात्र आता प्रतीक्षा संपली असून, मंगळवारपासून मान्सूनचा वेग वाढणार आहे आणि संपूर्ण महाराष्ट्र व्यापून मुसळधार पाऊस कोसळणार असल्याचे भारतीय हवामान विभागाने जारी केलेल्या प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे. तीन दिवसांत मान्सून उत्तर आणि पश्चिमेकडे (महाराष्ट्रासह इतर राज्यांत) वेगाने कूच करू शकतो. २३ जूनपासून मान्सून पुन्हा अनेक राज्यांमध्ये दाखल होणार आहे. यामुळे महाराष्ट्र, बिहार आणि झारखंडसह अनेक राज्यांमध्ये मुसळधार पाऊस पडेल. तेलंगणा, ओडिशा, झारखंड, बिहार आणि छत्तीसगडच्या उर्वरित भागांमध्ये मान्सून अधिक सक्रिय होईल. सध्या ईशान्य भारत मान्सूनने व्यापला आहे तर, कोकणाच्या आसपास रखडलेला मान्सून पुढे सरकण्यासाठी पोषक वातावरण तयार झाल्याने संपूर्ण महाराष्ट्रात तीन दिवसांत मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा अंदाज आहे. ◂ (वृत्तसंस्था)



### ‘या’ राज्यांमध्ये पावसाचा इशारा

वायव्य भारताबाबत बोलायचे झाल्यास, जम्मू आणि काश्मीर, लडाखमध्ये २२ जूनदरम्यान आणि हिमाचल प्रदेशात २०-२१ जून दरम्यान सर्वत्र पावसाची शक्यता आहे. पश्चिम राजस्थानमध्ये २४-२५ जून दरम्यान आणि १९ ते २२ जूनदरम्यान हरियाणा, चंदीगड, दिल्ली आणि पंजाबमध्ये आणि १९ ते २५ जून दरम्यान छत्तीसगड, पूर्व मध्य प्रदेश, विदर्भ, पश्चिम मध्य प्रदेशमधील काही ठिकाणी मेघगर्जनेसह पाऊस कोसळण्याची शक्यता असल्याचे हवामान विभागाने म्हटले आहे.

### चक्राकार परिस्थिती ठरली अडथळा

हवामान शास्त्रज्ञांच्या मते, मान्सून पुढे सरकण्यासाठी वेगवेगळ्या हवामान प्रणालींची गुंतागुंत कारणीभूत ठरली. मान्सून रखडण्यात सर्वात महत्त्वाचा प्रभाव पश्चिम प्रशांत महासागरात दिसून आला. जूनच्या सुरुवातीला हिंद महासागरात मान्सूनची लाट निर्माण झाली, परंतु उष्णतेचा काही भाग प्रशांत महासागरातील उष्णकटिबंधीय चक्राकार प्रणालीशी जोडला गेला. यामध्ये ‘जगामी’ या चक्रीवादळात रूपांतरित झालेल्या प्रणालीचाही समावेश होता.

# दोषींना सोडणार नाही

## । मुख्यमंत्री योगींचा इशारा । अयोध्येची बदनामी करण्यासाठी आरोप

**लखनौ, १९ जून**

अयोध्येतील श्रीराम मंदिरातील देणगी अपहारप्रकरणाची चौकशी करण्यासाठी विशेष पथक गठित करण्यात आले आहे. पंधरा दिवसांत तपास करून पथक अहवाल सादर करणार आहे. यात जे कोणी दोषी आढळेल त्यांना सोडले जाणार नाही. सर्व पक्षांनी भाविकांच्या भावना दुखावणारी टिप्पणी करणे टाळायला हवे. अयोध्येचा होणारा विकास खूपत असल्याने बदनामी केली जात असल्याची टीका उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी विरोधकांवर केली.

अयोध्येतील विकास प्रकल्पाचे लोकार्पण केल्यानंतर समाजवादी पक्षावर निशाणा साधताना मुख्यमंत्री म्हणाले, कारसेवकांवर गोळीबार करण्याचे आदेश देणारे, श्रीरामाचे नाव घेणाऱ्यांना अटक करणारे आता



उपदेश करत आहेत. आम्ही ट्रस्टच्या विनंतीवरून एसआयटी चौकशी सुरू केली.

एसआयटी सत्य आणि असत्य वेगळे करेल. निष्पक्ष चौकशीत जे कुणी दोषी आढळेल त्यांना सोडणार नाही. आजची नवीन अयोध्या आणि माता शबरीच्या नावाने सुरू असलेले भोजनालय विरोधकांच्या डोळ्यात खुपत आहे. काँग्रेस पक्षाने न्यायालयात श्रीराम नव्हतेच असे प्रतिज्ञापत्र दिले होते आणि आता हेच लोक रामभक्तांच्या अपमानाची भाषा करत आहेत. अयोध्येची नाहक बदनामी करणाऱ्यांच्या वक्तव्यांवर कुणीही विश्वास ठेवू नये, असे मुख्यमंत्री म्हणाले. ◂ (वृत्तसंस्था)

### मर्यादेचे पालन करूनच पाचशे वर्षांचा संघर्ष

प्रभू रामचंद्रांनी आपल्याला मर्यादा पालनाचा धडा शिकवला आहे. आम्ही त्या मर्यादेचे पालन करत ५०० वर्षे संघर्ष केला. यामुळे आणखी १५ दिवस वाट बघा आणि अजिबात काळजी करू नका. तपास सुरू असताना विधाने केल्याने तपासावर परिणाम होतो. यामुळे एसआयटीचा अहवाल येईपर्यंत वक्तव्ये करणे टाळा आणि कुणाचेही विनाकारण चारित्र्यहनन करू नका, असे आवाहन योगी यांनी केले.

## महत्त्वाचे

### पाच दिवसांच्या तेजीला ब्रेक!

**मुंबई :** शेअर बाजारात गेल्या पाच सत्रांपासून सुरू असलेल्या तेजीला अखेर शुक्रवारी ब्रेक लागला. माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील कंपन्यांच्या शेअर्समध्ये झालेल्या जोरदार घसरणीमुळे बाजार गडगडला. शुक्रवारी व्यवहारादरम्यान मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक ‘सेन्सेक्स’ ९०० हून अधिक अंकांनी घसरला होता, तर राष्ट्रीय शेअर बाजाराचा ‘निफ्टी-५०’ निर्देशांक २३,९५० अंकांच्या खाली गेला होता. मात्र, बाजार बंद होताना सेन्सेक्स ६०७.०८ अंकांच्या म्हणजेच ०.७८ टक्क्यांच्या घसरणीसह ७६,८०२.९० अंकांवर स्थिरावला. दुसरीकडे, निफ्टीमध्येही १५४.९० अंकांची म्हणजेच ०.६४ टक्क्यांची घसरण झाली.

### प्रा. बी. टी. देशमुख यांचे निधन

**अमरावती, १९ जून**

विदर्भ सिंचन अनुशेष निर्मूलन महर्षी व गाढे अभ्यासक माजी आमदार प्रा. बी. टी. उपाख्य भाऊराव तुळशीराम देशमुख यांचे शुक्रवारी रात्री साडे आठ वाजता हृदयविकाराच्या तीव्र धक्क्याने



निधन झाले. ते ८७ वर्षांचे होते. शनिवारी सायंकाळी ५ वाजता त्यांच्यावर अमरावतीच्या हिंदू स्मशानभूमीत अंत्यसंस्कार होणार आहे. त्यांच्या पश्चात विवाहित मुलगी, भाऊ नाना देशमुख यांच्यासह बराच मोठा आप्त परिवार आहे.

अमरावती पदवीधर मतदार संघाचे ते सलग ६ वेळा आमदार राहिले आहेत. नागपूर युनिव्हर्सिटी टिचर्स असोसिएशनचे ते संस्थापक अध्यक्ष होते. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोलाच्या स्थापनेत त्यांचे योगदान होते.

# ‘नीट’ पुनर्परीक्षेसाठी एनटीएचे कडक नियम

## विद्यार्थ्यांच्या पेहरावाबाबत नवीन मार्गदर्शक तत्त्वे जारी

**नवी दिल्ली, १९ जून**

राष्ट्रीय चाचणी संस्थे (एनटीए)ने २१ जून रोजी होणाऱ्या ‘नीट-युजी’ पुनर्परीक्षेसाठी नियमावली अधिक कडक केली आहे. परीक्षा केंद्रांवर होणारा गैरप्रकार रोखण्यासाठी सुरक्षा व्यवस्था, बायोमेट्रिक पडताळणी आणि विद्यार्थ्यांच्या पेहरावाबाबत नवीन मार्गदर्शक तत्त्वे जारी करण्यात आली आहेत. केंद्रात प्रवेश देण्यापूर्वी सर्व विद्यार्थ्यांची कसून तपासणी केली जाईल. त्यानंतर त्यांची बायोमेट्रिक ओळख पटवली जाईल, असे ‘एनटीए’ने स्पष्ट केले आहे.

बायोमेट्रिक प्रक्रियेदरम्यान काही तांत्रिक बिघाड, सर्व्हरची समस्या किंवा डेटा न जुळल्यास विद्यार्थ्यांना परीक्षेपासून वंचित ठेवले जाणार नाही. अशा परिस्थितीत संबंधित उमेदवाराला परीक्षा केंद्रावरच एक लेखी हमीपत्र द्यावे लागेल.त्यानंतर त्याला परीक्षेला बसू दिले जाईल. कोणत्याही विद्यार्थ्याला बायोमेट्रिक पडताळणीच्या नावाखाली त्रास दिला जाणार नाही, अशी ग्वाही ’एनटीए’ने दिली आहे. आवश्यक वाटल्यास ही पडताळणी परीक्षा सुरू होण्यापूर्वी किंवा पेपर संपल्यानंतरही पूर्ण केली जाऊ शकते, असेही त्यांनी स्पष्ट केले आहे

#### इलेक्ट्रॉनिक वस्तूंवर पूर्णपणे बंदी

परीक्षा केंद्रावर मोबाईल, स्मार्टवॉच, ब्लूटूथ किंवा इतर कोणत्याही इलेक्ट्रॉनिक गॅजेट्स आणण्यास सक्त मनाई आहे. याशिवाय मोठे बकल्स असलेले बेल्ट, जड दागिने आणि धातूच्या वस्तूंवरही बंदी घालण्यात आली आहे. ◂ (वृत्तसंस्था)

### धार्मिक पेहरावाला परवानगी


परीक्षेसाठी विद्यार्थ्यांनी हलके आणि साधे कपडे परिधान करावेत, असा सल्ला देण्यात आला आहे. धार्मिक चिन्हे, हिजाब, फेटा किंवा जानवे घालून येणाऱ्या विद्यार्थ्यांना परवानगी दिली जाणार आहे. मात्र, त्यांच्या सुरक्षिततेची खात्री करण्यासाठी त्यांना तपासणी केंद्रावर वेळेपूर्वी उपस्थित राहावे लागेल. विद्यार्थ्यांना परीक्षा हॉलमध्ये केवळ एक पारदर्शक पाण्याची बाटली आणि पारदर्शक प्लास्टिक पाऊचमध्ये हॉल तिकीट घेऊन जाण्याची मुभा असेल. दिव्यांग उमेदवारांना नियमानुसार अतिरिक्त वेळ दिला जाईल.

### ग्राम महसूल अधिकारी कार्यालयाला आग

**मेहकर, १९ जून**

येथील ग्राम महसूल अधिकारी भाग-०२ कार्यालयाच्या प्रवेशद्वारास अज्ञात व्यक्तींनी आग लावल्याची घटना १८ जूनच्या सकाळी उघडकीस आली. यात कार्यालयाच्या मुख्य दरवाज्याचे नुकसान झाले.

या प्रकरणी ग्राम महसूल अधिकारी शिवशंकर निकस यांनी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. १७ जून रोजी



कार्यालयीन कामकाज पूर्ण करून सायंकाळी त्यांनी आणि महसूल सेवक विशाल राऊत यांनी कार्यालय बंद केले होते. १८ जून रोजी पहाटे विशाल राऊत यांनी फोनवरून निकस यांना माहिती दिली की, नव्या ग्राम महसूल अधिकारी कार्यालयाच्या प्रवेशद्वाराजवळ आग लावण्यात आली. माहिती मिळताच शिवशंकर यांनी घटनास्थळी धाव घेतली.

घटनास्थळापासून काही अंतरावर फसव्या कर्जमाफीचा जाहीर निषेध... रविकांत तुपकर यांच्या आंदोलनाची दखल घ्या... अशा आशयाचे पत्रक आढळून आले. घटनेची माहिती निकस यांनी प्रभारी तहसीलदार नालट तसेच उपविभागीय अधिकारी जोगी यांना माहिती दिली. या प्रकरणी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली. ◂ (तभा वृत्तसेवा)

(अग्रलेख)

**अशा पक्षात फूटच पडणार हो!**
(पान ४ वर)

# इराण-अमेरिका चर्चा स्थगित

## इस्रायलच्या लेबनॉनवरील हल्ल्याने इराण नाराज

**वॉशिंग्टन, १९ जून**

अमेरिका-इराण यांच्यात करारावरील प्रस्तावित चर्चा शुक्रवारी स्थगित करण्यात आली. उपराष्ट्राध्यक्ष जे.डी. व्हान्स चर्चेसाठी स्वित्झर्लंडच्या दौऱ्यावर जाणार होते, मात्र ऐनवेळी त्यांनी हा दौरा रद्द केला. इस्रायलने लेबनॉनमध्ये हल्ले सुरू केल्याने इराणने नाराजी व्यक्त केली. लेबनॉनमधील संघर्षविरामाचा मुद्दा करारात समाविष्ट असताना इस्रायलने केलेल्या हल्ल्याने शांतता कराराच्या अंमलबजावणीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

स्वित्झर्लंडच्या परराष्ट्र व्यवहार विभागाने शुक्रवारी जाहीर केले की, अमेरिका, इराण, कतार आणि पाकिस्तान यांच्यात होणारी नियोजित चर्चा स्थगित करण्यात आली आहे. स्वित्झर्लंड या चर्चेत सहकार्य करण्यास तयार आहे.

अमेरिका आणि इराण यांच्यात कराराची अंमलबजावणी, पडताळणी आणि अनुपालनावर सविस्तर चर्चा करण्यासाठी नियोजित होती. मात्र दोन्ही पक्षांनी चर्चा पढे ढकलण्यात येत असल्याचे स्पष्ट केले आहे. दुसरीकडे व्हाईट हाऊसने जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, उपराष्ट्राध्यक्ष. व्हान्स यांचा तांत्रिक चर्चेसाठी नियोजित दौरा पुढे ढकलण्यात आला आहे. तथापि, चर्चेची तयारी सुरू असून, लवकरच नवीन तारीख जाहीर केली जाईल. चर्चेची योजना अद्याप अंतिम झालेली नाही. माध्यमांशी संवाद साधताना व्हान्स म्हणाले की, तांत्रिक चर्चा काही दिवसांत सुरू होण्याची अपेक्षा आहे आणि ती स्वित्झर्लंडमध्ये होईल. ◂ (वत्तसंस्था)

# उद्धव ठाकरेंची सत्तेसाठी लाचार: शिंदे

**मुंबई , १९ जून**

ज्यांनी शिवसेना पहिल्यांदा फोडली, त्या शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या आणि दुसऱ्यांदा फोडणाऱ्या काँग्रेसच्या तुम्ही ओव्या गाता आणि दुसरीकडे ज्यांनी शिवसेनेचा धनुष्यबाण वाचवला, बाळासाहेबांच्या स्वप्नांना खऱ्या अर्थाने पुढे नेले, त्यांना मात्र तुम्ही शिव्या देता, अशी तोफ डागत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांच्या दुटप्पीपणावर जोरदार हल्ला चढवला. उद्धव ठाकरेंनी सत्तेसाठी लाचारी पत्करल्याची टीकाही त्यांनी केली.



गोरेगाव येथील नेस्को सेंटरमध्ये आयोजित शिवसेनेच्या भव्य ६० व्या वर्धापन दिन सोहळ्यात ते बोलत होते. यावेळी शिवसैनिकांना संबोधित करताना शिंदे यांनी शिवसेना आणि हिंदुत्वाच्या मुद्द्यावरून ठाकरे गटाचे वाभाडे काढले.

राज्यातील राजकीय घडामोडींवर भाष्य करताना शिंदे म्हणाले की, आम्ही चार वर्षांपूर्वी जो ऐतिहासिक उठाव केला, तो आज जनतेच्या आशीर्वादाने ‘सुपर हिट’ ठरला आहे. त्यावेळी अनेकांनी आमचे सरकार पडेल, आमदार निवडून येणार नाहीत, अशा वल्गना केल्या होत्या. मात्र, आम्ही ४० आमदारांवरून ६० आमदार निवडून आणले आहेत आणि राज्याच्या कानाकोपऱ्यात शिवसेनेचा भगवा अभिमानाने फडकत आहे.

#### शिवसेना हा आमच्या काळजाचा तुकडा

काहींना शिवसेना म्हणजे एक मालमत्ता किंवा जमिनीचा तुकडा वाटतो. पण आमच्यासाठी शिवसेना हा केवळ जमिनीचा तुकडा नसून तो आमच्या काळजाचा तुकडा आणि हिंदुत्वाचे भगवे वादळ आहे. जो भगव्याला विसरला, तो राजकारणातून कायमचा संपला. खुर्चीसाठी तत्त्वांशी तडजोड करणाऱ्या ठाकरे गटाला जनतेने नाकारले असून, बाळासाहेबांचे खरे विचार केवळ आणि केवळ आपल्या शिवसेनेतच जिवंत असल्याचे शिंदेंनी यावेळी ठणकावून सांगितले. ◂ (तभा वृत्तसेवा)

### गाण्याचा वादातून नर्तकीला घातल्या गोळ्या

**गोपालगंज :** बिहारमधील गोपालगंज जिल्ह्यात एका लग्नसमारंभात आवडीचे गाणे गाण्याच्या मागणीवरून झालेल्या वादातून एका नर्तकीला गोळ्या घालून ठार करण्यात आले. या घटनेमुळे कार्यक्रमस्थळी गोंधळ उडाला. ही घटना पट्टहा जमुन्हा गावात घडली. सोनू गोड, असे मृत नर्तकीचे नाव आहे. महेंद्र कुशवाह यांच्या लग्नानिमित्त नृत्य आणि गायनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या समारंभात सिसवा गावातील तृतीयपंथी नर्तकी सोनू गोड आपल्या पथकासोबत कार्यक्रम सादर करत होती. रात्री उशिरापर्यंत सुरु असलेल्या कार्यक्रमादरम्यान गावातील काही तरुण स्टेजजवळ आले.

# शिवसेनेचा जन्म सत्तेसाठी नाही : उध्दव ठाकरे

**मुंबई, १९ जून**

शिवसेना ही मराठी माणसांच्या न्याय हक्कांसाठी लढण्यासाठी स्थापन झाली असून ती विलीन होण्यासाठी झालेली नाही. सत्ताप्राप्ती तर मुळीच नाही, असे उबाठा पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी म्हटले आहे. पक्षाच्या ६० व्या वर्धापन दिनानिमित्त मुंबईतील षण्मुखानंद हॉलमध्ये आयोजित मेळाव्यात ते बोलत होते.

भाजपवर निशाणा साधताना ठाकरे म्हणाले की, संसदेत भाजपकडे दोन तृतीयांश बहुमत नाही आणि त्यातील दोन तृतीयांश सदस्य हे इतर पक्षांतून आलेले आहेत. उपरे आमच्या डोक्यावर बसले आहेत, अशा शब्दांत त्यांनी पक्षांतर्गत अस्वस्थतेलाही वाट करून दिली. उद्धव कोणालाच भेटत नाहीत, अशी टीका होत असल्याचा उल्लेख करत ठाकरे यांनी प्रतिप्रश्न केला, जर मी भेटतच नव्हतो, तर तुम्ही निवडून कसे आलात? उद्धव बाळासाहेब ठाकरे या नावामुळेच आमदार, खासदार आणि मंत्रिपदे मिळाली, पण त्याचा अहंकार आपल्याला नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले. शिवसेनेच्या स्थापनेपासून ते आजवरच्या वाटचालीचा उल्लेख करताना त्यांनी शिवाजी महाराज, महात्मा फुले-शाहू महाराज आणि प्रबोधनकार ठाकरे यांच्या काळातही गद्दारी व टीका झाल्याचा संदर्भ दिला. ज्यांनी गद्दारी केली, त्या त्या मतदारसंघातील मतदारांची मी माफी मागतो, असे भावनिक वक्तव्यही त्यांनी केले.



# फुटपाथवर सर्वप्रथम पादचाऱ्यांचा हक्क

## पायदळ चालणे हा त्यांचा मूलभूत अधिकार : सर्वोच्च न्यायालय

**नवी दिल्ली, १९ जून**

रस्त्यांवरील पादचाऱ्यांची सुरक्षा आणि हक्कांबाबत सर्वोच्च न्यायालयाने महत्त्वाचा निकाल दिला आहे. निर्धारित फुटपाथवर चालणे हा नागरिकांचा मूलभूत अधिकार आहे.फुटपाथवर सर्वप्रथम पादचाऱ्यांचा हक्क आहे. या हक्काला मोटार वाहनांच्या वाहतुकीपेक्षा प्राधान्य दिले जाईल, असे सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी स्पष्ट केले.

न्यायालयाने पुढे म्हटले की, सुरक्षित आणि स्पष्टपणे चिन्हांकित पदपथ उपलब्ध करून देणे ही सरकार आणि स्थानिक स्वराज्य संस्थांची जबाबदारी आहे. शाळेत जाणाऱ्या पाच वर्षांच्या मुलाचा मृत्यू झालेल्या एका रस्ते अपघाताशी



संबंधित खटल्याच्या सुनावणीदरम्यान हा निर्णय आला. न्यायमूर्ती पी.एस. नरसिंह आणि ए.एस. चांदुरकर यांच्या न्यायासनाने म्हटले की, चालण्याचा हक्क हा संविधानाच्या अनुच्छेद १९(१)(डी) अंतर्गत हमी दिलेल्या मुक्त संचार करण्याच्या हक्काचा एक भाग आहे. हा हक्क अनुच्छेद २१, म्हणजेच जीवन आणि वैयक्तिक स्वातंत्र्याच्या हक्काशी देखील जोडलेला आहे. रस्त्यावर चालण्याचा प्राथमिक हक्क पादचाऱ्यांना.त्यांच्यासाठी पदपथ सुरक्षित व संरक्षित असले पाहिजेत, असेही न्यायालयाने स्पष्ट केले. सर्वोच्च न्यायालयाने पुढे म्हटले की, जिथे रस्ता आहे, तिथे एक सुरक्षित आणि स्पष्टपणे चिन्हांकित फुटपाथही असला पाहिजे. फुटपाथ बांधणे, त्यांची देखभाल करणे आणि ते अतिक्रमणमुक्त ठेवण्याची जबाबदारी शहरी विकास प्राधिकरणे, महानगरपालिका, नगरपालिका आणि पंचायतींची आहे. चालणे हा जीवनाचा एक अविभाज्य भाग आहे.त्यामुळे या मूलभूत सुविधेकडे दुर्लक्ष करता येत नाही, असेही न्यायालयाने स्पष्ट केले. ◂ (वृत्तसंस्था)

### हक्काचे उल्लंघन झाल्यास घटनात्मक उपायांचा अवलंब

न्यायालयाने पुढे म्हटले की, फुटपाथावर सुरक्षितपणे चालण्याच्या नागरिकांच्या हक्काचे उल्लंघन झाल्यास, ते घटनात्मक आणि कायदेशीर उपायांचा अवलंब करू शकतात. अशा प्रकरणांमध्ये, संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई केली जाऊ शकते आणि नुकसान भरपाईची मागणीही केली जाऊ शकते. हा हक्क मोटार वाहन कायद्यांतर्गत प्रदान केलेल्या हक्कांपासून वेगळा आणि स्वतंत्र आहे, असेही न्यायालयाने स्पष्ट केले.

# श्रीरामाचा अवमान; बांगलादेशात हिंदू भडकले

**ढाका, १९ जून -**

गायबांधा जिल्ह्यातील पलाशबारी येथे प्रभू श्रीरामाचा ८१ फूट उंच पुतळा उभारण्याचे काम कट्टरवाद्यांनी रोखल्याने हिंदू नागरिकांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे. याविरोधात आता हिंदू तरुण रस्त्यावर उतरले असून, त्यांनी शुक्रवारी राजधानी ढाका येथे आंदोलन केले. श्रीरामाचा अपमान सहन करणार नाही, असा इशारा त्यांनी सरकारला दिला.

प्रभू श्रीरामाच्या मूर्तीवर चप्पल ठेवल्याच्या आणि ८१ फूट उंच पुतळा उभारण्याला विरोध करणाऱ्या कट्टरवाद्यांचा




निषेध करत बांगलादेशात हिंदू विद्यार्थी रस्त्यावर उतरले. त्यांनी याप्रकरणात सहभागी असलेल्या आरोपींवर कारवाई करण्याची मागणी केली. संतप्त विद्यार्थ्यांनी ढाक्यातील शाहबाग येथे आंदोलन केले आणि श्रीरामाचा अपमान करणाऱ्यांना कठोर शिक्षा देण्याची मागणी केली. बांग्लादेश स्टुडंट युनिटी कौन्सिलचे संयोजक नोव्हेल्टी रॉय उदय म्हणाले, आमचे पूजनीय प्रभू श्रीराम यांचा अपमान झाला आणि ही आमच्यासाठी अत्यंत दुःखाची बाब आहे. हा अपमान सहन केला जाणार नाही. बांगलादेशात जे घडत आहे ते जर आणखी १० वर्षे असेच सुरू राहिले, तर हिंदू समाज पूर्णपणे नष्ट होईल. अलीकडेच, गायबांधा जिल्ह्यातील पलाशबारी येथे प्रभू श्रीरामाचा ८१ फूट उंच पुतळा उभारला जात होता. कट्टरपंथीयांनी धुडगूस घालत बांधकाम थांबवले. त्यानंतर हिंदूंच्या विरोधात प्रक्षोभक भाषणे दिली आणि हिंदुत्वाचा अपमान केला.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### टेलिग्रामवर तात्पुरती बंदी कायम

**नवी दिल्ली :** केंद्र सरकारने २१ जूनला होणाऱ्या नीट पुनर्परीक्षेच्या पार्श्वभूमीवर सोशल मीडिया मेसेजिंग ॲप टेलिग्रामवर तात्पुरती बंदी घालण्याचा निर्णय घेतला होता. या निर्णयाला दिल्ली उच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले. दरम्यान, शुक्रवारी दिल्ली उच्च न्यायालयाने टेलिग्रामची याचिका फेटाळून लावली. त्यामुळे टेलिग्रामवर तात्पुरती बंदी कायम राहणार आहे. न्यायमूर्ती तेजस कारिया यांच्या न्यायासनाने म्हटले की, सरकारने माहिती तंत्रज्ञान कायद्याच्या कलम ६९अ चे पालन केले आहे. तात्पुरत्या बंदीसाठी कोणतेही कारण दिले नसल्याचा टेलिग्रामचा युक्तिवाद न्यायालयाने फेटाळून लावत केंद्र सरकारचा आदेश योग्य होता, असे सांगत न्यायालयाने १८ जूनचा आपला निर्णय राखून ठेवला.

# प्रमाणपत्र नसल्यास १५ ऑगस्टनंतर कारवाई

## अमराठी रिक्षा-टॅक्सी चालकांना मराठी भाषा प्रमाणपत्र अनिवार्य

**मुंबई, १९ जून**

राज्यातील अमराठी रिक्षा व टॅक्सी चालकांना मराठी भाषेचे ज्ञान मिळावे आणि प्रवाशांशी संवाद अधिक सुलभ व्हावा यासाठी परिवहन विभागाने धोरणात्मक व ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. १ जून ते १५ ऑगस्ट या कालावधीत सर्व अमराठी रिक्षा-टॅक्सी चालकांनी चार तासांचा 'मराठी भाषा संवाद पाठ्यक्रम' पूर्ण करणे अनिवार्य करण्यात आले असून, १५ ऑगस्टनंतर प्रमाणपत्र नसलेल्या चालकांवर कडक कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे.

परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमासाठी शासनाने महाराष्ट्र राज्य मराठी भाषा विभाग, कोकण मराठी साहित्य परिषद आणि मुंबई मराठी साहित्य संघ या संस्थांची अधिकृत तज्ज्ञ संस्था म्हणून नियुक्ती केली आहे. या संस्थांमार्फतच चालकांना मोफत मराठी भाषा प्रशिक्षण दिले जाणार असून, त्यांच्याकडून देण्यात येणारे प्रमाणपत्रच परिवहन विभागाकडून ग्राह्य धरले जाणार आहे. परिवहन विभागाचे सहआयुक्त रवी गायकवाड यांनी दिलेल्या माहितीनुसार, मुंबई महानगर प्रदेश क्षेत्रात प्रशिक्षण वर्ग मोठ्या प्रमाणावर सुरू असून यासाठी सुमारे ७१ अभ्यास केंद्रे कार्यान्वित करण्यात आली आहेत. या मोहिमेला शैक्षणिक बळ देण्यासाठी कोकण मराठी साहित्य परिषदेचे सुमारे साडेचार हजार शिक्षक प्रशिक्षण कार्यात सहभागी झाले आहेत. तसेच सर्व प्रादेशिक परिवहन कार्यालयांचे अधिकारी चालकांना आवश्यक सहकार्य करत आहेत. प्रवाशांशी संवाद साधताना भाषेची अडचण दूर करणे, सेवा अधिक दर्जेदार बनविणे आणि चालकांच्या व्यावसायिक संधी वाढविणे हा या अभ्यासक्रमाचा मुख्य उद्देश असल्याचे विभागाने कळविले आहे. मराठी भाषेचे प्राथमिक ज्ञान मिळाल्याने प्रवासी व चालक यांच्यातील संवाद अधिक प्रभावी होणार असून दैनंदिन व्यवहार सुलभ होण्यास मदत मिळणार आहे.

(तभा वृत्तसेवा)




### मोफत प्रशिक्षणाचा लाभ घ्यावा

१५ ऑगस्ट २०२६ नंतर अधिकृत प्रमाणपत्र नसलेल्या अमराठी चालकांवर नियमानुसार दंडात्मक व कायदेशीर कारवाई केली जाईल, असे परिवहन विभागाने एका प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे. मात्र, कोणावरही कारवाई करण्याचा उद्देश नसून, सर्व चालकांनी या मोफत प्रशिक्षणाचा लाभ घेऊन वेळेत प्रमाणपत्र मिळवावे, असे आवाहन सहआयुक्त रवी गायकवाड यांनी केले आहे.

# आव्हानांसाठी भारत सज्ज

### संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांची ग्वाही

**नागपूर, १९ जून**

जागतिक पातळीवर सुरू असलेल्या घडामोडी पाहता, आपणही शस्त्रसंपन्न राहायला हवे. भवष्यितील ही गरज लक्षात घेत, आपण संरक्षण क्षेत्रात आत्मनर्भिरतेचा मंत्र स्वीकारला आहे. त्यामुळे भवष्यितील कुठल्याही आव्हानांसाठी भारत सज्ज असल्याची ग्वाही संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी दिली.

नागपुरातील अंबाझरीस्थित आयुध नर्माणी क्षेत्रात दहा हजार टन ॲल्युमिनियम एक्सट्रूजन प्रेसच्या भूमिपूजन सोहळ्यात संरक्षण मंत्री राजनाथ सिंह बोलत होते. याप्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, यंत्र इंडिया लिमिटेडचे अध्यक्ष विजयकुमार अय्यर उपस्थित होते. ॲल्युमिनियम एक्सट्रूजन प्रेस यंत्र इंडिया लिमिटेडचा एक महत्त्वपूर्ण घटक आहे. ही एक्सट्रूजन प्रेस देशाच्या दृष्टिकोनातील बदलाचे प्रतीक आहे. हा बदल आयातीवर अवलंबून राहण्याऐवजी देशांतर्गत स्तरावर महत्त्वपूर्ण वस्तूंच्या उत्पादनाकडे वळण्याचा प्रशस्त मार्ग आहे. सध्याच्या भू-राजकीय परस्थितीत भवष्यिासाठी सज्ज राहण्याकरिता सुरक्षेशी संबंधित गरजांवर विशेष लक्ष देणे अनिवार्य असल्याचेही त्यांनी ठामपणे नमूद केले. आजचा विचार करता देश ३ लाख कोटी रुपयांची संरक्षण उत्पादने आणि ५० हजार कोटी रुपयांच्या संरक्षण निर्यातीचे ध्येय नियोजित वेळेपूर्वीच गाठण्याच्या मार्गावर असल्याची सुखद वार्ताही यावेळी राजनाथ सिंह यांनी दिली.

प्रस्तावित प्रेस ही देशातील सर्वांत प्रगत सुविधांपैकी एक असेल. ही सुविधा संरक्षण प्रणाली आणि प्लॅटफॉर्म्स, एरोस्पेस, विमानसंचलन संरचना, क्षेपणास्त्र कार्यक्रम, रेल्वे व परिवहन क्षेत्राला मदत करेल.

(तभा वृत्तसेवा)




### संरक्षण क्षेत्रात चमत्कार : फडणवीस

संरक्षण क्षेत्रात आपल्याला पुढे जाणे काळाची गरज होती. त्यानुसार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आत्मनर्भिर भारत - विकसित भारत हा मंत्र मनापासून अंगीकारला. आज एक्सट्रूजन प्रेसच्या भूमिपूजन सोहळ्यातून ती संकल्पना किती महत्त्वपूर्ण ठरणार आहे, याची कल्पना सर्वांनाच आली आहे. हा सर्व संरक्षण क्षेत्रातील आपण चमत्कारच मानतो, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

# सदाशिवराव देवधर यांचे वाढदिवसानिमित्त अभीष्टचिंतन

**नवी दिल्ली, १९ जून**

रा. स्व. संघाचे ज्येष्ठ प्रचारक आणि अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे क्षेत्रीय संघटनमंत्री सदाशिवराव देवधर यांच्या ८६ व्या वाढदिवसाचे औचित्य साधत राजधानी दिल्लीत एका अभिनंदन सोहळ्यांचे आयोजन करण्यात आले होते. राजकुमार भाटिया आणि डॉ. मल्लिका नड्डा यांनी आयोजित केलेल्या या कौटुंबिक सोहळ्यात अनेक मान्यवरांनी उपस्थित राहत सदाशिवरावांचे अभिष्टचितन केले, त्यांना शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमात केंद्रीय आरोग्यमंत्री जे.पी. नड्डा, गोविंदाचार्य, लक्ष्मीनारायण भाला, शिक्षा संस्कृती उत्थान न्यासचे अतुल कोठारी, तेजस्विनी अनंतकुमार यांच्यासह अनेक मान्यवरांची भाषणे झाली. या सर्वांनी विद्यार्थी परिषदेत सदाशिवरावांच्या मार्गदर्शनात काम करतांनाच्या आठवणींना उजाळा दिला.




आयोजन समितीचे राजकुमार भाटिया यांनी या कार्यक्रमामागची भूमिका विषद केली. अभाविपच्या पूर्वकालिन महिला कार्यकर्त्यांनी पितृतुल्य सदाशिवरावांना औक्षवण करत शाल आणि पुष्पहार घालून त्यांचे अभिष्टचिंतन केले आणि त्यांचा आशीर्वाद घेतला. यावेळी शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान, दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता, भाजपाचे राष्ट्रीय महासचिव विनोद तावडे, माजी खासदार विनय सहस्त्रबुध्दे, श्याम जाजू, अभाविपचे राष्ट्रीय संघटनमंत्री आशीष चौहान, भारतीय मजदूर संघाचे राष्ट्रीय संघटनमंत्री बी. सुरेंद्रन, सहकार भारतीचे राष्ट्रीय संघटनमंत्री संजय पाचपोर, अधिवक्ता परिषदेचे राष्ट्रीय संघटनमंत्री श्रीहरी बोरीकर, आमदार आशीष सूद यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. अरुण करमरकर यांनी वैयक्तिक गीत सादर केले. कार्यक्रमाचे संचालन ललितबिहारी गोस्वामी यांनी तर आभारप्रदर्शन डॉ. मल्लिका नड्डा यांनी केले.

(तभा वृत्तसेवा)

# अंगणवाड्यांमध्ये आता 'व्हेज पुलाव'

## 'टेक होम राशन' होणार चविष्ट अन् रुचकर

**मुंबई, १९ जून**

राज्यातील अंगणवाडीतील बालके, गरोदर महिला, स्तनदा माता आणि आकांक्षित जिल्ह्यांतील किशोरवयीन मुलींना मिळणाऱ्या घरपोच आहारामध्ये आता केवळ पोषणमूल्येच नव्हे, तर चवीलाही विशेष प्राधान्य दिले जाणार आहे. या लाभार्थींसाठी आता अत्यंत नवीन आणि रुचकर पाककृतींचा समावेश करण्यात आला आहे, अशी माहिती महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिली.




मंत्रालयात आयोजित एकात्मिक बाल विकास सेवा योजनेच्या विशेष आढावा बैठकीत त्यांनी स्वतः या पोषण आहाराच्या गुणवत्तेची प्रत्यक्ष चाचणी व तपासणी केली. केंद्र शासनाच्या निकषांनुसार सध्या हा घरपोच आहार प्रीमिक्स (रेडी-टू-कुक) स्वरूपात दिला जातो. मात्र, लाभार्थींकडून मिळालेला प्रतिसाद, क्षेत्रीय अधिकाऱ्यांच्या सूचना तसेच आहारतज्ज्ञांच्या शिफारशी लक्षात घेऊन या आहारामध्ये महत्त्वपूर्ण बदल करण्यात आले आहेत. सध्याच्या 'एनर्जी डेन्स मूग डाळ खिचडी प्रीमिक्स'मधील घटकांच्या मिश्रणात सुधारणा करण्यात आली असून आहाराचा दर्जा आणि चव उत्तम राखण्यासाठी आता यासोबतचे मसाल्याचे पाकीट स्वतंत्रपणे उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

याशिवाय पूर्वीची अत्यंत लोकप्रिय असलेली 'मल्टी मिक्स सिरियल्स ॲण्ड प्रोटीन्स' ही पाककृती पुढेही तशीच कायम ठेवण्यात आली असून लाभार्थ्यांच्या आवडीनुसार आता घरपोच आहारामध्ये 'व्हेज पुलाव' आणि 'मल्टीग्रेन पफ' या दोन नवीन आणि चविष्ट पाककृतींची भर घालण्यात आली आहे. या नवीन बदलांमुळे मिळणाऱ्या सर्व पाककृतींमध्ये केंद्र सरकारने ठरवून दिलेले उष्मांक (कॅलरीज), प्रथिने (प्रोटीन्स) आणि आवश्यक सूक्ष्म पोषकतत्त्वे (मायक्रोन्यूट्रिएंट्स) योग्य प्रमाणात उपलब्ध असणार आहेत. आहारामध्ये हे बदल करण्यापूर्वी संपूर्ण राज्यभरात एक सविस्तर सर्वेक्षण करण्यात आले होते, तसेच वैद्यकीय अधिकारी आणि विविध विशेषज्ञ संस्थांची मते जाणून घेऊनच या नवीन पाककृती निश्चित करण्यात आल्या आहेत, असे महिला व बालविकास विभागाचे सचिव डॉ. अनुपकुमार यादव यांनी सांगितले.

(तभा वृत्तसेवा)

**राज्यातील कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी शासन सातत्याने विविध उपाययोजना राबवत असून, गेल्या तीन वर्षांत कुपोषणात लक्षणीय घट झाली आहे. आता नव्याने समाविष्ट करण्यात आलेल्या या चविष्ट आहारामुळे लाभार्थ्यांची या आहाराबाबतची स्वीकृती अधिक वाढेल आणि राज्याला कुपोषणमुक्त करण्याच्या मोहिमेला अधिक बळ मिळेल, असा विश्वास मंत्री आदिती तटकरे यांनी व्यक्त केला आहे.**

# मराठा विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क परत मिळणार

**सातारा, १९ जून**

मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गाप्रमाणे शैक्षणिक सवलती देण्याचा निर्णय राज्य सरकारने जाहीर केला असला, तरी प्रत्यक्षात अनेक शाळा आणि महाविद्यालयांकडून मराठा विद्यार्थ्यांकडून पूर्ण शुल्क आकारले जात असल्याची तक्रार समोर आली आहे. दरम्यान, या मुद्यावर प्रतिक्रिया देताना आमदार प्रसाद लाड यांनी मराठा विद्यार्थ्यांकडून शाळा आणि महाविद्यालयांनी आकारलेले शैक्षणिक शुल्क परत केले जाईल, असे आश्वासन दिले.

अंतरवाली सराटी येथे आमदार प्रसाद लाड यांनी मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांची भेट घेतली. यावेळी जरांगे पाटील यांनी मराठा विद्यार्थ्यांच्या शुल्काच्या प्रश्नाकडे लक्ष वेधले. सरकारने ५ जूनला शासकीय निर्णय (जीआर) जारी करून ओबीसीप्रमाणे सवलती लागू केल्या असल्या, तरी त्याचा प्रत्यक्ष लाभ विद्यार्थ्यांना मिळत नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. ते पुढे म्हणाले, सरकारने सवलती जाहीर केल्या आहेत. मात्र, राज्यातील अनेक शाळा, महाविद्यालये आणि व्यावसायिक शिक्षण संस्थांकडून अजूनही १०० टक्के शुल्क आकारले जात आहे. विद्यार्थ्यांनी आधीच फी भरली, पुस्तके घेतली, मग सवलतीचा नेमका फायदा काय?, असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

जरांगे पुढे म्हणाले, सरकारचा निर्णय असूनही काही अधिकारी त्याची प्रभावी अंमलबजावणी करत नाही. ओबीसी सवलतींचे आदेश शैक्षणिक संस्थांपर्यंत पोहोचलेच नाही, अशी तक्रारही त्यांनी केली. दरम्यान, या मुद्यावर आमदार प्रसाद लाड यांनी मराठा विद्यार्थ्यांकडून शाळा आणि महाविद्यालयांनी आकारलेले शुल्क परत केले जाईल, असे आश्वासन दिले.

(वृत्तसंस्था)

# २१ जून वर्षातील सर्वांत मोठा दिवस

**अमरावती, १९ जून**

पृथ्वी ही सूर्याभोवती फिरत असते, त्याच वेळी स्वतःभोवतीही फिरत असते. सूर्याभोवती फिरण्याच्या क्रियेस परिभ्रमण तर स्वतःभोवती फिरण्याच्या क्रियेस परिवलन म्हणतात. मात्र, पृथ्वीचा अक्ष २३.५ अंशाने कललेला असल्याने दिवस व रात्र यातील काळात अंतर असते आणि ते सतत बदलत राहते. या परिक्रमेत २१ जून रोजी १३ तास १३ मिनिटांचा दिवस राहील. यामुळे २१ जून हा वर्षातला सर्वांत मोठा दिवस राहील. या दिवसात दरवर्षाला एक दिवसाचा फरक पडू शकतो.

पृथ्वीचा अक्ष २३.५ अंशाने कललेला आहे. या दिवशी पृथ्वीचा उत्तर ध्रुव सर्वांत जास्त सूर्याकडे झुकलेला असतो. त्यामुळे सूर्य जास्तीत जास्त उत्तरेकडे दिसतो. या बिंदूला समर सोल्स्टाईस असे म्हणतात. या बिंदूवर सूर्य असताना दिवस हा सर्वांत मोठा असतो व रात्र लहान असते. दिवस व रात्रीचा कालावधी कमीजास्त होणे आपण नेहमीच अनुभवत असतो. २१ जूनपासून उत्तरायण संपून दक्षिणायण सुरू होते. सूर्याचे उत्तरायण व दक्षिणायण सुद्धा आपल्याला अनुभवता येते. कोणत्याही वस्तूच्या पडणार्या सावलीचे निरीक्षण केल्यास उत्तरायण व दक्षिणायण सहज लक्षात येऊ शकते. पृथ्वीवरील ऋतू सुद्धा पृथ्वीच्या अक्षाच्या कलत्या स्थितीमुळे निर्माण होतात. आकाशात वैषुविक व आयनिक वृत्ताचे दोन काल्पनिक छेदनबिंदू आहे. यापैकी एका बिंदूत २२ मार्च रोजी सूर्य प्रवेश करतो. याला वसंत संपात दिन असे म्हणतात. तर त्याच्या विरुद्ध बिंदूस २३ सप्टेंबर रोजी सूर्य प्रवेश करतो. याला शरद संपात दिन असे म्हणतात. या दोन्ही दिवशी दिवस व रात्र सारखी असते. सर्व खगोलप्रेमींनी व जिज्ञासूंनी २१ जून या उत्तर गोलार्धातील सर्वांत मोठ्या दिवसाचे प्रत्यक्ष कालमापन करावे व या १३ तास १३ मिनिटांच्या दिवसाचा अनुभव घ्यावा, असे आवाहन मराठी विज्ञान परिषद, अमरावती विभागाचे अध्यक्ष प्रवीण गुल्हाने व हौशी खगोल अभ्यासक विजय गिरुळकर यांनी केले आहे.

(तभा वृत्तसेवा)




# पोलिस दलातील दत्तात्रय काळे, हेमंत वाघमारे यांचे जागतिक कॉमरेड्स अल्ट्रा मॅरेथॉन स्पर्धेत यश

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १९ जून-**

जगातील अत्यंत खडतर आणि आव्हानात्मक मानली जाणारी कॉमरेड्स अल्ट्रा मॅरेथॉन स्पर्धा यशस्वीपणे पूर्ण करून शहरातील दोन पोलिसांनी सोलापूर पोलीस दलाचे नाव आंतरराष्ट्रीय स्तरावर उज्ज्वल केले आहे. शहर पोलीस आयुक्तालय गुन्हे शाखेचे सहायक पोलीस निरीक्षक दत्तात्रेय काळे आणि पोलीस आयुक्तांचे अंगरक्षक पोलीस अंमलदार हेमंत वाघमारे यांनी या जागतिक स्पर्धेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

द अल्टीमेट ह्युमन रेस म्हणून जगप्रसिद्ध असलेली ही स्पर्धा यावर्षी दक्षिण आफ्रिकेतील डर्बन ते पीटरमॅरीटझबर्ग या मार्गावर आयोजित करण्यात आली होती. पहाटे ५ वाजता राष्ट्रगीतानंतर या ८५.७७७ किमी अंतराच्या चढाईच्या स्पर्धेला सुरुवात झाली. जगभरातून तब्बल २१,६७८ धावपटूंनी यात सहभाग घेतला होता. पोलीस कॉन्स्टेबल हेमंत वाघमारे यांनी हे अंतर अवघ्या ९ तास २९ मिनिटांत पूर्ण केले. वाघमारे यांनी महाराष्ट्र पोलिस दलातून प्रथम येण्याचा मान मिळवला आहे. गुन्हे शाखेतील सहायक पोलीस निरीक्षक दत्तात्रेय काळे यांनी १० तास २३ मिनिटांत हे अंतर पार केले. या दोन्ही खेळाडूंचे सोलापूर शहराचे पोलीस आयुक्त एम. राजकुमार यांनी कौतुक केले.



# 'बालाजी'कडून सोलापूर व धाराशिव जिल्ह्यातील २८ शाळांना शालेय साहित्य वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१९ जून-**

बालाजी अमाईन्स आणि बालाजी स्पेशालिटी केमिकल्स यांचे कडून सीएसआर अंतर्गत सोलापूर व धाराशिव जिल्हयातील २८ शाळांना शालोपयोगी साहित्याचे वितरण करण्यात आले.

बालाजी अमाईन्सचे व्यवस्थापकीय संचालक राम रेडडी यांचे हस्ते सोलापूर जिल्हयातील २० शाळांना व धाराशिव जिल्हयातील ८ शाळांना शालोपयोगी साहित्याचे वितरण करण्यात आले. त्यात ७ शाळांना ७ स्मार्ट टिव्ही, १० शाळांना १० संगणक व एक इंटरॲक्टीव्ह बोर्ड, ११ शाळांना २२५ बेंच हे शालेय साहित्याचे वितरण करण्यात आले. यावेळी बालाजी अमाईन्सचे सीएसआर विभागप्रमुख अनिल विपत यांनी सर्व शिक्षक व मुख्याध्यापक यांचे स्वागत केले. सर फाऊंडेशनचे सिध्दाराम माशाळे यांनी आभार मानले. यावेळी सर फाऊंडेशनचे बाळासाहेब वाघ, बालाजी अमाईन्सचे दत्तप्रसाद सांजेकर, अमोल गुंड आदी उपस्थित होते.

**साहित्याचे वितरण केलेल्या शाळा :**

**सोलापूर :** संगणक १ व इन्टरॲक्टीव्ट बोर्ड (जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मोरवंची), संगणक ६ (पुण्यश्लोक विदयालय हिंगणी ता मोहोळ, ओंकार मराठी प्राथमिक शाळा मांजरेवाडी, श्री सिध्देश्वर प्राथमिक शाळा कुमठे साखर कारखाना ,जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कुडल ता दक्षिण सोलापूर, स्वामी विवेकानंद प्रशाला सोलापूर), स्मार्ट टिव्ही ६ ( जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कुमठे ,नगर पालिका मुलींची शाळा नं २ अक्कलकोट, जिल्हा परिषद प्राथमिक कन्नड शाळा सुलेरजवळगे, संभाजीराव चव्हाण माध्यमिक विदयालय विठ्ठलवाडी, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा




कारकल ता द सोलापूर, रोशन प्रशाला सोलापूर), १४५ बेंच ७ शाळा (जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वडकबाळ २० बेंच ,मा न पा उर्दु मुलींची शाळा सोलापूर २० बेंच ,चंद्रभागाबाई यलगुलवार प्राथमिक शाळा सोलापूर २० बेंच, श्री सोमेश्वर हायस्कुल हत्तुर ता द सोलापूर २० बेंच,सिध्दार्थ मराठी विदयालय मुळेगाव २५ बेंच, लोकनेते के बाबुरावअण्णा पाटील विदयालय हिवरे ता मोहोळ २० बेंच, मुक बधीर शाळा टेंभुर्णी ता माढा).

**धाराशिव :** संगणक ४ (जिल्हा परिषद प्राथमिक शाळा दिंडेगाव ता तुळजापूर, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सलगरा दि ता तुळजापूर, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बेलवाडी ता लोहारा ,ज्युनिअर कॉलेज ऑफ एज्युकेशन नळदुर्ग ता तुळजापूर), स्मार्ट टिव्ही १ (जिल्हा परिषद सेकंडरी हायस्कुल मस्सा ता कळंब), बेंच (जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पिंपळा खुर्द ता तुळजापूर २० बेंच ,जिल्हा परिषद बॉईज हायस्कुल नळदुर्ग ता तुळजापूर २० बेंच ,नरेन्द्र बोरगावकर माध्यमिक प्रशाला देवकुरळी ता तुळजापूर २० बेंच).

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



# अफगाणिस्तानचा पाकिस्तानवर प्रहार

## । हवाई हल्ल्याचा घेतला सूड । खैबर पख्तुनख्वा, ईसिसचे अड्डे लक्ष्य





**काबूल, १९ जून**

पाकिस्तानच्या अलीकडील हवाई हल्ल्यांचा सूड घेत अफगाणी फौजांनी शुक्रवारी खैबर पख्तुनख्वा, बलुचिस्तान प्रांतात जोरदार हल्ले चढवले. पाकिस्तानी सैन्याला पाठिंबा देणाऱ्या इसिस खोरासानच्या दहशतवादी अड्डयांना लक्ष्य करत ड्रोन आणि तोफगोळ्यांचा मारा केला. यात अनेक इमारती उद्ध्वस्त झाल्या. जीवितहानीची माहिती अद्याप समोर आलेली नाही.

तालिबानच्या संरक्षण मंत्रालयाने एक्सवरील पोस्टमध्ये हल्ल्याची माहिती देताना म्हटले की, या अड्डयांचा वापर अफगाण भूमीवर हल्ल्यांचे नियोजन आणि अंमलबजावणी करण्यासाठी केला जात होता. हल्ला करण्यात आली ठिकाणे शत्रू गुप्तचर गटांना अफगाणिस्तानवरील हल्ल्यांचे नियोजन आणि समन्वय साधण्यास मदत करत होती. अनेक प्राणघातक हल्ल्यांचे नियोजन व अंमलबजावणी करण्यासाठी ऑपरेशनल तळ म्हणून यांचा वापर करण्यात येत होता. हे हल्ले बलुचिस्तान प्रांतातील किला अब्दुल्ला जिल्ह्यातील गुलिस्तान भागात, तसेच चगाई जिल्ह्यातील शकर अब जंगल गर्दी भागांना लक्ष्य करून करण्यात आले.

इसिसचे अड्डे आणि इस्लामिक अमिरातीला विरोध करणाऱ्या अतिरेकी गटांच्या लक्ष्यांवर हल्ला करण्यात आला. अफगाणिस्तानमधील अनेक प्राणघातक हल्ल्यांचे नियोजन याच ठिकाणांवरून केले जात होते. त्यामुळे, ही लष्करी कारवाई सुरू असलेल्या धोक्यांना दिलेले प्रत्युत्तर आहे. गेल्या आठवड्यात नांगरहार आणि पक्तियामध्ये झालेल्या पाकिस्तानी हवाई हल्ल्यांमध्ये मोठी जीवितहानी झाली असून, त्यात अफगाण महिला आणि मुलांचा मृत्यू झाला आहे. या हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून अफगाण ड्रोनने पाकिस्तानी भागांना लक्ष्य केले आहे.

इस्लामिक स्टेट खोरासान प्रांताच्या (इसिस-के) दहशतवादी तळांवर आणि लपण्याच्या ठिकाणांवर यशस्वी हल्ला केला. तालिबान सरकारने दहशतवादी तळ पूर्णपणे उद्ध्वस्त केल्याची पुष्टी केली. इसिसची भरती आणि प्रशिक्षण केंद्रांवर अचूक प्रहार करण्यात आला. अफगाणिस्तानच्या सुरक्षेसाठी ही कारवाई आवश्यक होती. पाकिस्तानने या कारवाईवर अद्याप अधिकृत माहिती दिलेली नाही. खैबर पख्तुनख्वाच्या ओरकझाई कंबर खेल परिसरात इसिसच्या ठिकाणाला यशस्वीरित्या लक्ष्य करण्यात आले. ◂ (वृत्तसंस्था)

### दोन्ही देशात संघर्ष चिघळला

पाकिस्तान आणि अफगाणिस्तान यांच्यातील तणाव गेल्या वर्षापासून धुमसत आहे. पाकिस्तानने अफगाणिस्तानवर वारंवार हवाई हल्ले केले. याला प्रत्युत्तर म्हणून,अफगाण सैन्याने सीमेवरील पाकिस्तानी लष्करी चौक्यांना लक्ष्य केले. आता अफगाण सैन्याने हे प्रकरण आणखी पुढे नेले असून, पाकिस्तानात आश्रय घेतलेल्या दहशतवाद्यांवर ड्रोन हल्ले सुरू केले आहेत. यामुळे दोन्ही देशातील संघर्ष शिगेला पोहोचला.

### वाद कसा सुरू झाला?

पाकिस्तान हवाई दलाने 'ऑपरेशन गजब लिल-हक' नावाच्या लष्करी कारवाईचा भाग म्हणून संशयित दहशतवादी लपण्याच्या ठिकाणांवर अचूक हवाई हल्ले केले. या हल्ल्यांचे मुख्य लक्ष्य तहरीक-ए-तालिबान पाकिस्तान (टीटीपी) च्या लपण्याची ठिकाणे होती. पाकिस्तानी सैन्याने नांगरहार, पक्तिया, काबूल आणि कंदाहार प्रांतांमधील प्रमुख पायाभूत सुविधांना लक्ष्य केले होते. प्रत्युत्तरात अफगाण तालिबान सैन्याने पाकिस्तानवर शुक्रवारी हल्ले चढवले.

# इस्त्रायलचा दक्षिण लेबनॉनवर हल्ला

## । वायुदलाचा प्रहार । तोफगाळ्याचा मारा । ३५ नागरिक ठार

**बैरुत, १९ जून**

अमेरिका-इराणमध्ये झालेल्या शांतता कराराच्या काही तासांतच इस्त्रायलने दहशतवादी हिजबुल्लाहच्या अड्डयांना लक्ष्य करत दक्षिण लेबनॉनच्या नबातीह जिल्ह्यात जोरदार हल्ले चढवले. यात ३५ नागरिकांचा मृत्यू झाला असून, अनेक लोक जखमी आहे. वायुदलाच्या विमाने आणि लष्कराने तोफगोळ्याचा मारा केला, यात अनेक निवासी इमारती उद्ध्वस्त झाल्या.

इराणच्या इशाऱ्यानंतर आणि अमेरिकेसोबत झालेल्या करारानंतरही इस्त्रायलने लेबनॉनमध्ये शुक्रवारी पहाटे जोरदार हल्ले चढवले. दक्षिण लेबनॉनच्या नबातीह जिल्ह्यात इस्त्रायली हवाई हल्ले आणि तोफगोळ्यांच्या माऱ्यात ३५ जण ठार आणि अनेक जखमी असल्याची माहिती लेबनॉनच्या आरोग्य विभागाने दिली आहे. हल्ल्यात अनेक इमारती उद्ध्वस्त झाल्या. ढिगाऱ्यातून बाहेर काढण्यात आलेल्या ५० पेक्षा अधिक नागरिकांना रुग्णालयात भरती करण्यात आले. नबातीह शहर, तसेच काफर जौझ आणि काफर रामोन व झेबेदिनसह अनेक शहरांमध्ये इस्त्रायली लष्कराने तोफगोळ्याचा मारा केला. त्यानंतर वायुदलाच्या विमानांनी काफर तिबनित आणि रायहान हाइट्स या भागांना लक्ष्य करत हिजबुल्लाहचे अड्डे उद्ध्वस्त केले. नबातीह आणि हारूफमध्ये आठ जण ठार झाले. हिजबुल्लाहने या प्रदेशातील इस्त्रायली सैन्याच्या तळाला लक्ष्य करत प्रत्युत्तर दिले.

इस्त्रायलच्या संरक्षण विभागाने हल्ल्याची पुष्टी करताना म्हटले की, आमची हिजबुल्लाहविरुद्ध कारवाई सुरूच राहणार आहे. लेबनॉनधून इस्त्रायलचे सैन्य माघारी परतणार नाही. दक्षिण लेबनॉनमध्ये झालेल्या कारवाईत चार सैनिकांचा मृत्यू झाला, तर दहा जखमी आहे. गुरुवारी हिजबुल्लाहने इस्त्रायली सैन्यावर हल्ला केला, ज्यामुळे इस्त्रायलला हवाई हल्ले करावे लागले. ◂ (वृत्तसंस्था)



इस्त्रायलच्या हल्ल्यानंतर दक्षिण लेबनॉनमध्ये बचावपथकाकडून इमारतीत अडकलेल्या नागरिकांच्या सुटकेसाठी शोधमोहीम सुरू करण्यात आली

### लेबनॉनबाबत इराणची मागणी काय?


इराणचे परराष्ट्र मंत्री अब्बास अराघची यांनी लेबनॉनवरील इस्त्रायली हल्ल्याचा निषेध करत म्हटले की, इस्त्रायली हल्ले थांबवणे आणि तेथून सैन्याने माघार घेणे अमेरिकेसोबत झालेल्या करारातील महत्त्वाचा मुद्दा आहे. इस्त्रायलने कराराचे पालन करून तातडीने लेबनॉवमधून माघार घ्यायला हवी. कराराचे उल्लंघन केल्यासा पुढील वाटाघाटीला अडथळा येऊ शकते.

### इंडिगो विमानावर वीज कोसळली

**कोलकाता** : कोलकाता विमानतळावर उभ्या असलेल्या इंडिगोच्या विमानावर अचानक वीज कोसळली. ही घटना शुक्रवारी वादळी पावदरम्यान घडली.यात दोन ग्राउंड स्टाफ जखमी झाले या घटनेनंतर विमानातील प्रवाशांना सुखरुप उतरवण्यात आले.

# 'कोरोना विषाणू' तयार करण्यासाठी अमेरिकेचा पैसा?

## तुलसी गबार्ड यांचा आतापर्यंतचा सर्वात मोठा खुलासा



**वॉशिंग्टन, १९ जून**

संपूर्ण जगाला हादरवून टाकणाऱ्या कोरोना विषाणू महामारीबाबत एक मोठा खुलासा झाला आहे. काही दिवसांपूर्वी अमेरिकेच्या गुप्तचर विभागाच्या संचालकपदाचा राजीनामा जाहीर करणाऱ्या तुलसी गबार्ड यांनी गुरुवारी कोरोना विषाणूबाबत एक महत्त्वपूर्ण खुलासा केला आहे. चीनच्या वूहानमधील ज्या प्रयोगशाळेतून कोरोना महामारीचा उगम झाला होता त्या प्रयोगशाळेला अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष जो बायडेन यांचे मुख्य वैद्यकीय सल्लागार अँथनी फाउची यांनी निधी दिला होता, असा गौप्यस्फोट गबार्ड यांनी केला आहे.

अमेरिकेच्या राष्ट्रीय गुप्तचर संचालक तुलसी गबार्ड यांनी अलीकडेच अमेरिकेने निधी दिलेल्या जैविक प्रयोगशाळांशी संबंधित अनेक दस्तऐवज सार्वजनिक केले आहेत. त्यांनी सांगितले की, या दस्तऐवजांवरून असे सूचित होते की, अमेरिकेच्या 'नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ ॲलर्जी अँड इन्फेक्शियस डिसीजेस'चे माजी संचालक अँथनी फाउची यांनी कोरोना विषाणू महामारीच्या प्रारंभाबाबतच्या गुप्तचर मूल्यांकनांवर प्रभाव टाकला होता आणि नंतर काँग्रेससमोर शपथ घेऊन असे संबंध नाकारले होते. राष्ट्रीय गुप्तचर संचालकांच्या कार्यालयाने (ओडीएनआय) हा दस्तऐवज प्रसिद्ध केला आहे. गॅबार्ड यांचे हे पाऊल, साथीच्या रोगाच्या उगमाची पुनर्तपासणी करण्याच्या आणि या जागतिक आरोग्य संकटादरम्यान अमेरिकी सरकारी संस्था, शास्त्रज्ञ व गुप्तचर अधिकाऱ्यांच्या भूमिकेची चौकशी करण्याच्या ट्रम्प प्रशासनाच्या प्रयत्नांमधील एक मोठे पाऊल आहे. गॅबार्ड यांच्या म्हणण्यानुसार, नव्याने प्रसिद्ध झालेल्या संभाषणांमधून आणि कागदपत्रांमधून हे उघड झाले आहे की, जेव्हा हा विषाणू नैसर्गिकरित्या उद्भवला की चीनच्या वुहानमधील प्रयोगशाळेत यावर जोरदार वाद सुरू होता, तेव्हा फाउची यांनी गुप्तचर अधिकाऱ्यांशी कसा संवाद साधला होता. ◂ (वृत्तसंस्था)

### जनतेला सत्य माहीत पडणे आवश्यक

गॅबार्ड म्हणाल्या, कोविड-१९ महामारीमुळे आपल्या लाखो अमेरिकन बांधवांसह जगभरातील असंख्य इतरांना प्रचंड त्रास सहन करावा लागला आहे. अनेक वर्षांच्या खोटेपणा, सेन्सॉरशिप आणि लपवाछपवीनंतर अमेरिकन जनतेला पारदर्शकता, सत्य समजायला हवे. डॉ. फाउचींसारख्या राजकीय हेतूने प्रेरित नेत्यांनी आपली गैरकृत्ये लपवली आणि अधिकारांचा गैरवापर केला, गुप्त माहितीमध्ये फेरफार केली, काँग्रेससमोर खोटे बोलले आणि देशाला सुरक्षित ठेवण्यासाठी अत्यावश्यक असलेल्या माहितीपर्यंतचा नवनिर्वाचित राष्ट्राध्यक्षांचा प्रवेश मर्यादित करून त्यांची प्रतिमा मलीन केली, असा आरोपही त्यांनी केला.

## चित्रपट वार्ता

### मिथुन चक्रवर्तीच्या घरी वाजणार सनई-चौघडे



**मुंबई** : हिंदी चित्रपटसृष्टीचे 'डिस्को डान्सर' म्हणजेच, मिथुन चक्रवर्ती एकेकाळी सिल्वर स्क्रिनवर राज्य करणारे मिथुन दा आता लवकरच सासरेबुवा होणार आहेत. त्यांच्या घरात लवकरच सनई-चौघडे वाजणार आहे. त्यांच्या घरी लेकीची लवकरच लगीनघाई सुरू होणार आहे. मिथुन चक्रवर्ती यांची लेक, दिशानी चक्रवर्ती हिचा मित्र माइल्स मँटजारिस याच्याशी साखरपुडा झाला. दिशानीने समाज माध्यमावर तिच्या या स्वप्नवत प्रपोजलचे फोटो शेअर केले. कॅलिफोर्नियातील मालिबू येथील निसर्गरम्य समुद्रकिनाऱ्यावर माइल्स मँटजारिस याने दिशानीला लग्नासाठी गुडघ्यावर बसून मागणी घातली आणि दिशानीनेही होकार दिला. माइल्स मँटजारिस इंटरनॅशनल इंडस्ट्रीत काम करणारा एक क्रिएटिव्ह प्रोफेशनल आहे. तो फ्रीलांस सिनेमेटोग्राफर, स्टेडीकॅम ऑपरेटर, डायरेक्टर ऑफ फोटोग्राफी आणि कलरिस्ट म्हणून इंडस्ट्रीत सक्रिय आहे.

### आलियाने मुलीला म्हटले 'फिल्मी'



**मुंबई** : अभिनेत्री आलिया भट्टने नुकतेच 'अमृत रत्न' समिटमध्ये तिच्या बालपणाबद्दल आणि मुलगी राहाबद्दल मनमोकळेपणाने सांगितले आहे. लहानपणापासूनच तिला अभिनयाची आवड होती आणि ती आरशासमोर तासन्तास परफॉर्मन्स देत असे. मुलगी राहा देखील जन्मापासूनच परफॉर्मर आहे, असे आलियाने सांगितले. आलियानुसार, राहा खूप 'फिल्मी' आहे. तिला नाचायला आणि गाणी ऐकायला खूप आवडते. राहा खूप वेगाने डान्स स्टेप्स शिकते आणि ती एका नेत्याप्रमाणे गोष्टी समजून घेते. राहा अजून खूप लहान आहे, पण ती वेगवेगळ्या गोष्टींमध्ये आपली आवड दाखवत आहे. तिला केवळ नृत्य आणि संगीतातच रस नाही, तर क्रीडा प्रकारातही ती खूप पुढे आहे. राहा सध्या तिच्या आजूबाजूच्या गोष्टींचे निरीक्षण करत आहे. ती कला, नृत्य आणि क्रीडा यांसारख्या अनेक गोष्टींमध्ये हात आजमावत आहे, असे आलियाने सांगितले.

### वैष्णोदेवी मंदिरात पोहोचला अक्षय कुमार



**मुंबई** : अभिनेता अक्षय कुमार त्याच्या आगामी 'वेलकम टू द जंगल' चित्रपटाच्या प्रदर्शनापूर्वी माता वैष्णोदेवी मंदिरात पोहोचला. गुरुवारी अक्षय कुमार याने त्रिकुटा पर्वतावर असलेल्या या मंदिरात नतमस्तक होऊन आशीर्वाद घेतले. मंदिराच्या परिसरात अभिनेत्याला पाहताच तेथे उपस्थित चाहत्यांनी त्यांना घेरले. यावेळी अक्षय कुमार पारंपरिक पांढऱ्या रंगाचा कुर्ता परिधान केला होता. समाज माध्यमावरही अक्षयचे अनेक व्हिडीओ समोर आले आहेत. यापूर्वीही अक्षय अनेकदा त्याच्या चित्रपटांच्या प्रदर्शनापूर्वी धार्मिक स्थळांना भेट देऊन आशीर्वाद घेताना दिसला आहे. गुरुवारीच निर्मात्यांनी चित्रपटातील नवीन गाणे 'दीवाने हैं' प्रदर्शित केले आहे. अक्षयने स्वतः आपल्या इंस्टाग्राम हँडलवरून हे गाणे शेअर केले.



२१ जून रोजी जगभरात योग दिन साजरा केला जाणार आहे. यासाठी विविध देशांमध्ये योगासनांचा सराव केला जात आहे. चीनची राजधानी बीजिंग येथील भारतीय दुतावासाच्या परिसरात योगाचा सराव करताना नागरिक

# २५ हजार मुले लैंगिक हिंसाचाराचे बळी

**युनोचा अहवाल**

**न्यू यॉर्क, १९ जून**

संयुक्त राष्ट्रांच्या एका नवीन अहवालानुसार, २०२५ साली संघर्षग्रस्त भागांमध्ये मुलांवरील हिंसाचार, हत्या, लैंगिक शोषण, अपहरण आणि सैन्यात सक्तीची भरती यांसारख्या गंभीर अत्याचारांची विक्रमी म्हणजेच ३८,५५८ प्रकरणे नोंदवली गेली. मागील ३० वर्षांत प्रथमच, मुलांवरील सर्वाधिक अत्याचारांसाठी सरकारी यंत्रणा जबाबदार असल्याचे आढळले.

संघर्ष आणि युद्धग्रस्त भागांमधील मुलांची परिस्थिती सातत्याने बिघडत चालली आहे. संयुक्त राष्ट्रांच्या एका नवीन अहवालानुसार, मागील वर्षी जगभरातील सुमारे २५ हजार मुले हत्या, लैंगिक हिंसाचार, अपहरण आणि लढाईत सक्तीची भरती यांसारख्या गंभीर गुन्ह्यांची बळी ठरली. संयुक्त राष्ट्रांच्या एका अहवालानुसार, मुलांविरुद्ध नोंदवलेल्या गंभीर उल्लंघनांच्या संख्येत सलग चौथ्या वर्षी वाढ झाली आहे. २०२५ मध्ये, अशा ३८,५५८ प्रकरणांची पडताळणी करण्यात आली, ज्यामध्ये मुलांच्या हत्या, अपहरण, शाळा आणि रुग्णालयांवरील हल्ले, तसेच मानवतावादी मदत रोखणे यांसारख्या घटनांचा समावेश आहे. अहवालानुसार, या घटनांमुळे एकूण २४,१७४ मुले प्रभावित झाली. यापैकी जवळपास एक तृतीयांश मुली होत्या. अनेक मुलांना एकाच वेळी विविध प्रकारच्या हिंसाचाराचा आणि अत्याचाराचा सामना करावा लागला.

संयुक्त राष्ट्रांचे महासचिव अँटोनियो गुटेरेस यांच्या वार्षिक अहवालानुसार, संयुक्त राष्ट्रांनी मुलांवरील अत्याचारांवर देखरेख ठेवण्यास सुरुवात केल्यापासूनच्या तीन दशकांत प्रथमच, बहुतांश गंभीर उल्लंघनांसाठी सरकारी दले जबाबदार असल्याचे आढळले आहे. यापूर्वी, सशस्त्र बंडखोर आणि दहशतवादी गटांना सामान्यतः मुख्य गुन्हेगार मानले जात होते. अहवालानुसार, २०२५ मध्ये इस्त्रायली सैन्य आणि त्याच्याशी संलग्न सुरक्षा संस्थांनी सर्वाधिक १२,४४५ उल्लंघने केली. यानंतर डेमोक्रॅटिक रिपब्लिक ऑफ काँगोचा क्रमांक लागतो, जिथे ४,११४ उल्लंघने झाली. म्यानमार, सोमालिया आणि नायजेरियामधील विविध सशस्त्र गटांनी देखील २,००० हून अधिक गंभीर उल्लंघने केली. या यादीत सुदान, दक्षिण सुदान, सीरिया आणि युक्रेनमधील रशियन लष्करी दलांचाही उल्लेख आहे. ◂ (वृत्तसंस्था)



**सरकारी दलांवर पहिल्यांदाच ठपका**

### बालमृत्यूमध्ये सरकारी दले आघाडीवर

बालमृत्यू आणि जखमी होण्याच्या घटनांमध्येही सरकारी दले आघाडीवर आहेत. अहवालानुसार, ६,२६६ मुलांच्या मृत्यूसाठी सरकारी यंत्रणा जबाबदार असल्याचे आढळले आहे. हा आकडा मागील वर्षापेक्षा ३४ टक्क्यांनी जास्त आहे. ७,९५८ मुले जखमी झाल्याचीही पुष्टी झाली आहे.

### संयुक्त राष्ट्रांनी व्यक्त केली चिंता

मुलांवरील अत्याचारांचे प्रमाण अत्यंत चिंताजनक आहे आणि केवळ चिंता व्यक्त करणे आता पुरेसे नाही. त्यांनी सदस्य राष्ट्रांना मुलांच्या संरक्षणाला प्राधान्य देण्याचे आवाहन केले, असे संघर्षग्रस्त भागांतील मुलांसाठीच्या संयुक्त राष्ट्रांच्या विशेष प्रतिनिधी, व्हेनेसा फ्रेझियर म्हणाल्या.

# माजी सीएमओ डॉ. रंगा यांना अटक

## वैद्यकीय उपकरणांच्या खरेदीत अनियमितता

**नवी दिल्ली, १९ जून**

दिल्ली सरकारच्या लाचलुचपत प्रतिबंधक शाखेने (एसीबी) सेंट्रल प्रोक्युरमेंट एजन्सी (सीपीए)शी संबंधित एका घोटाळाप्रकरणी डॉ. विजय कुमार रंगा यांना अटक केली आहे. सह पोलिस आयुक्त विक्रमजीत सिंग यांच्या म्हणण्यानुसार, शेकडो कोटी रुपयांच्या औषधे आणि वैद्यकीय उपकरणांच्या खरेदीमध्ये मोठ्या प्रमाणावर अनियमितता व निविदांच्या अटींमध्ये फेरफार केल्याच्या एका भ्रष्टाचार प्रकरणी ही कारवाई करण्यात आली आहे.

या प्रकरणी नुकत्याच निलंबित झालेल्या माजी डीजीएचएस डॉक्टर, वत्सला अग्रवाल यांना अटक करण्यासाठी एसीबीचे एक पथकही तैनात करण्यात आले आहे. एसीबीचे पथक अग्रवाल यांच्या घरी पोहोचले आहे. या घोटाळ्याप्रकरणी नायब राज्यपाल तरनजीत सिंग संधू यांनी गेल्या आठवड्यात वत्सला अग्रवाल आणि डॉ. रंगा यांना निलंबित केले होते. डॉ. रंगा यांच्या अटकेसंदर्भात लाचलुचपत प्रतिबंधक शाखेने जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, सरकारी मालकीच्या राष्ट्रीय आरोग्य विकास प्राधिकरणाच्या दक्षता संचालनालयाकडून औषधे, शस्त्रक्रिया साहित्य, शस्त्रक्रियेसाठी लागणारे उपभोग्य साहित्य, इतर उपभोग्य वस्तू आणि वैद्यकीय उपकरणे यांच्या खरेदीमध्ये मोठ्या प्रमाणावर अनियमितता झाल्याच्या आरोपांबाबत तक्रार प्राप्त झाली होती. ही खरेदी आरोग्य सेवा महासंचालनालयाच्या केंद्रीय खरेदी एजन्सी मार्फत करण्यात आली होती.

काही सरकारी कर्मचारी आणि खाजगी व्यक्तींनी गुन्हेगारी कट रचून, निवडक कंपन्या आणि पुरवठादारांना अवाजवी लाभ देण्यासाठी खरेदी प्रक्रिया, निविदा अटी आणि तांत्रिक तपशिलांमध्ये फेरफार केली. निवडक पुरवठादारांना फायदा व्हावा यासाठी बनावट तपशील तयार करुन सुमारे ६६० कोटी रुपयांच्या सरकारी निधीचा गैरवापर केला. ◂ (वृत्तसंस्था)

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख

# अशा पक्षात फूटच पडणार हो!

राजकारण आणि पाडापाडी किंवा फुटाफूट यांचे काहीतरी सख्य असावे. भारतीय राजकारणाचा पट पाहिला तर असे दिसेल की, देशात भाजपा वगळता एकही पक्ष असा नाही, जो कधीतरी फुटला नाही. याचे महत्त्वाचे कारण असे की, भाजपा वगळता इतर बहुतांशी पक्ष हे व्यक्तिकेंद्री किंवा परिवारवादी आहेत. इतिहासात असे दिसते की, काँग्रेस आणि जनता दलाचे सर्वाधिक तुकडे झाले. त्यामुळे आज आपल्या देशातील अनेक पक्षांची नावे काँग्रेस आणि जनता दलावरून आहे. काँग्रेसमधून बाहेर पडणारा नेता आपल्या नव्या पक्षाच्या नावात 'काँग्रेस' राहील, याची काळजी घेतो. उदा. तृणमूल काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस. तसाच प्रकार जनता दलाच्या बाबतीतही आहे. जनता दलातून फुटून बाहेर निघालेल्या नेत्यांनी आपल्या पक्षाच्या नावात 'जनता दल' हे शब्द कायम ठेवले आहे. उदा. राष्ट्रीय जनता दल, संयुक्त जनता दल आणि धर्मनिरपेक्ष जनता दल. मूळ पक्षाच्या नावाची गोधडी पांघरल्याशिवाय या नेत्यांना राजकीय अस्तित्व सिद्ध करता येत नसावे. काही नेते तर मूळ पक्षातून बाहेर पडतात आणि मूळ पक्षावर आणि त्याच्या निवडणूक चिन्हावरही दावा करतात. उदाहरणार्थ एकनाथ शिंदे मूळ शिवसेनेतून बाहेर पडले आणि त्यांनी आपला गट हीच मूळ शिवसेना असल्याचा दावा करीत त्या पक्षाचे 'धनुष्यबाण' हे निवडणूक चिन्हही मिळविले. आता त्याच मूळ शिवसेनेत म्हणजे जिचा उल्लेख सध्या उपरोधाने 'शिल्लकसेना' असा केला जातो, तीत आणखी एक फूट पडली आहे आणि त्या फुटीचा ठपका भाजपावर ठेवला जात आहे.

एकनाथ शिंदे यांच्या बंडानंतर शिवसेना नावावरून संभ्रम होऊ नये म्हणून निवडणूक आयोगाने दोन पक्षांचे बारसे केले होते. एकाला शिवसेना-एकनाथ शिंदे तर दुसऱ्याला शिवसेना-उद्धव बाळासाहेब ठाकरे असे नाव दिले. शिवसेना-उद्धव बाळासाहेब ठाकरे असे लांबलचक नाव रोज घेणे शक्य नसल्यामुळे तो पक्ष शिवसेना-उबाठा म्हणून ओळखला जाऊ लागला. लोकसभेत शिवसेना-उबाठाचे एकूण नऊ खासदार होते. त्यातील सहा खासदारांनी बाहेर पडत आपल्याला वेगळा गट म्हणून मान्यता देण्याची व नंतर शिवसेना शिंदे गटातील आपल्या विलीनीकरणालाही मान्यता देण्याची विनंती करणारे पत्र लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांना दिले आहे. सध्या काही तांत्रिक कारणामुळे शिवसेनेतील ही फूट प्रत्यक्षात आली नसली, तरी ती पडली आहे, हे तर खरेच. पण, या फुटीला त्या पक्षाचे नेतृत्वच कारणीभूत आहे, अन्य कुणीही नाही. राजकारण्यांमध्ये आता पक्षाच्या विचारधारेवर अव्यभिचारी निष्ठा राहिलेली नाही. तत्त्वाचे आणि मूल्यांचे राजकारण करायला आज कोणाला वेळ नाही; सगळेच संधिसाधू झाले आहेत. त्यामुळे फूट पडण्यात नवलाई राहिलेली नाही. नवलाई एवढीच की, कोणत्याही पक्षात फूट पडली तरी त्याचे खापर भाजपावर फोडले जाते. खरे तर भाजपाच्या केंद्रातील सरकारकडे भक्कम बहुमत आहे. भाजपाच्या महाराष्ट्रातील सरकारकडेही तीन चतुर्थांश बहुमत आहे. त्यामुळे भाजपाला कोणताही पक्ष फोडण्याची गरज नाही. तरीही फूट पडत असते. आधी तृणमूल काँग्रेसमध्ये फूट पडली. आता महाराष्ट्रातील शिवसेना उबाठात फूट पडली. या फुटीचे कारण भाजपा नव्हे तर त्या पक्षाचे नेतृत्व आहे. तृणमूल काँग्रेसच्या नेत्या ममता बॅनर्जी यांना आपला पक्ष सांभाळता आला नाही. त्यामुळे त्यांच्या पक्षातून आधी ५८ आमदार बाहेर पडले, नंतर २० खासदारांनीही त्या पक्षाला रामराम केला. ममता बॅनर्जी यांनी पश्चिम बंगालमध्ये सलग १५ वर्षे राज्य केले, मुख्यमंत्रिपद सांभाळले. पण, या काळात त्यांची आणि त्यांचा अतिमहत्त्वाकांक्षी भाचा अभिषेक बॅनर्जी यांची वागणूक आपल्या आमदारांना-खासदारांना कस्पटासमान लेखण्याची होती. पक्षाचे आमदार आणि खासदार आपले घरगडी आहेत, अशा पद्धतीने ममता बॅनर्जी आणि अभिषेक बॅनर्जी वागत होते. विधानसभा निवडणुकीत पराभव झाल्यानंतर या आमदार आणि खासदारांनी ममता बॅनर्जी आणि अभिषेक बॅनर्जी यांना त्यांची जागा दाखवली. कितीही सहन करतो असे म्हटले तरी संधी मिळाल्यावर अपमानाची परतफेड करण्यास माणसं विसरत नाहीत. तेच घडले. शिवसेना उबाठातील फुटीमागेही तृणमूलप्रमाणे हेच महत्त्वाचे कारण आहे. उद्धव ठाकरे यांना आपला पक्ष सांभाळता आला नाही आणि आपले आमदार-खासदारही जपता आले नाहीत. पक्षातून एखाददुसऱ्या नेत्याने बाहेर पडणे आणि पक्षात फूट पडणे यात फरक आहे. शिवसेनेतून यापूर्वीही अनेक नेते बाहेर पडले. तेव्हा भाजपावर कोणताही आरोप झाला नाही. कारण भाजपा हा तेव्हा शिवसेनेचा मित्रपक्ष होता. आता तशी स्थिती राहिलेली नाही. आता उबाठा गटात खुट्ट जरी वाजले तरी भाजपाला दोष दिला जातो. आपल्याला घर सांभाळता येत नाही, हे उद्धव ठाकरे आणि त्यांची पालखी वाहणाऱ्यांना दिसत नाही.

२०२२ मध्ये एकनाथ शिंदे ४० आमदारांसह बाहेर पडले त्यावेळी शिवसेनेला सरकार गमवावे लागले. मुख्यमंत्री असलेल्या उद्धव ठाकरे यांना राजीनामा द्यावा लागला. तेव्हाही भाजपाला दोष दिला गेला. आपले दरबारी राजकारण आपल्याला भोवते आहे, याकडे दुर्लक्ष केले गेले. आता पुन्हा फूट पडली. पुन्हा फुटीचे खापर भाजपावरच फोडले जात आहे. वास्तवात या दोन्ही फुटींना स्वतः उद्धव ठाकरे आणि त्यांचे चिरंजीव आदित्य ठाकरे जबाबदार आहेत. उद्धव ठाकरे हे हस्तिदंती मनोऱ्यातील राजकारणी आहेत. त्यांच्याकडे बाळासाहेब ठाकरे यांच्यासारखा करिश्मा नाही. त्यांच्यासारखे नेतृत्व आणि वक्तृत्वही नाही. मुख्यमंत्रिपदाची ओढून-ताणून आणलेली संधी उद्धव ठाकरेंना मिळाली होती. पण कोणतीही जबाबदारी न घेण्याच्या स्वभावामुळे त्यांनी त्या संधीचे सोने करण्याऐवजी माती केली. मुख्यमंत्री म्हणून मंत्रालयात सर्वांत कमी वेळा गेलेले महाराष्ट्रातील एकमेव नेते म्हणजे उद्धव ठाकरेच असावेत. राज्यातील जनतेला तर सोडाच; पण आपल्या पक्षाच्या आमदार आणि खासदारांनाही उद्धव ठाकरे भेटत नाहीत. सामान्य शिवसैनिकांचा तर प्रश्नच उद्भवत नाही. खरा नेता तोच असतो, जो आपल्या कार्यकर्त्यांना भेटत असतो, आमदार-खासदारांच्या संपर्कात असतो, त्यांचे प्रश्न आणि समस्या सोडवत असतो. उद्धव ठाकरे यांना यातले काहीच जमले नाही. आपल्या कार्यकर्त्यांसाठी नेता सदैव उपलब्ध असला पाहिजे, त्यांच्यासाठी धावून गेला पाहिजे. उद्धव ठाकरेंनी अन्य पक्षातील नेत्यांच्या स्वभावाचा आणि आचरणाचा अभ्यास केला पाहिजे. कधी काळी मित्रपक्ष राहिलेल्या भाजपाचे नेते कार्यकर्त्यांना, लोकप्रतिनिधींना कसे वागवितात, हे त्यांनी नव्याने पाहिले पाहिजे. पण, उद्धव ठाकरेंची वागणूक एखाद्या महाराजाला साजेशी आहे. बाळासाहेबांचे वारसदार या नात्याने शिवसेनाप्रमुख म्हणून त्यांचा राज्याभिषेक झाला. हे पद त्यांना कर्तृत्वाने नव्हे तर वारशाने मिळाले. त्यामुळे उद्धव ठाकरे यांना राज्यातील गोरगरीब जनतेच्या प्रश्नांशी आणि समस्यांशी कधीच देणेघेणे नव्हते. विशेष म्हणजे उद्धव ठाकरे यांनी आपल्या भोवती संजय राऊत यांच्यासारखे सल्लागार गोळा केले आहेत. नेत्याने ऐकायचे सर्वांचे, पण करायचे आपल्या मताने अशी पद्धत आहे. उद्धव ठाकरे आपल्या लोकप्रतिनिधींना आणि कार्यकर्त्यांना भेटतच नसतील तर त्यांना राजकारणात नेमके काय चालले आहे हे कसे कळणार? भाजपाला दोष देणे सर्वांत सोपे आहे. पण, अशा दोषारोपणातून त्यांचा पक्ष सुधारत नाही. तो अधिक व्यक्तिकेंद्रित होत जातो. कारण सभोवतालच्या व्यक्ती कमी होत जातात. उबाठा गटाचे तसेच झाले आहे. तृणमूल काँग्रेसचेही तेच झाले आहे. अशा पक्षांत फूट पडणार नाही तर दुसरे काय होणार हो? ■

## यंगिस्तान

# ऑपरेशन शिव्या

**जयेश शत्रुघ्न मेस्त्री**

१२ जून रोजी महाराष्ट्राने एका महान साहित्यिकाचा, महाराष्ट्राच्या लाडक्या व्यक्तिमत्त्वाचा पु. ल. देशपांडे यांचा स्मृतिदिन साजरा केला. पुलं या दोन अक्षरात महाराष्ट्राच्या साहित्यिक संस्कृतीचा गाभा सामावलेला आहे. पुलंच्या विनोदात एक सोज्वळता होती, एक मार्दव होतं, जे आजही मनाला भिडतं. आजच्या काळात जिथे कोणाच्या तरी वैयक्तिक जीवनावर गलिच्छ टीका करणे म्हणजे विनोद असं समजलं जातं, तिथे पुलंनी अतिशय सोज्वळ शब्दांत महाराष्ट्राला हसवलं, विचार करायला लावलं आणि समृद्ध केलं. त्यांच्या लेखणीतून प्रकट झालेला विनोद हा कधीही कोणाला दुखावणारा नव्हता, तर तो समाजातील विसंगतींवर, मानवी स्वभावाच्या गमतींवर बोट ठेवणारा होता. पुलंच्या विनोदाला एक सांस्कृतिक अधिष्ठान होतं, एक वैचारिक बैठक होती.

महाराष्ट्र हे राकट राज्य आहे, असं नेहमी म्हटलं जातं. पण याच राकट भूमीत अतिशय मृदू स्वभावाचे संत ज्ञानेश्वर येऊन गेले, ज्यांनी भागवत धर्माचा पाया रचला. ज्ञानदेवांचा काळ म्हणजे या राकट देशाने डोक्यावर घेतलेला व सावरलेला पदर. तो पदर म्हणजे ज्ञानोबांची अमृतानुभव, ज्ञानेश्वरी आणि अभंगवाणी. तो काळ म्हणजे महाराष्ट्राच्या आध्यात्मिक आणि सांस्कृतिक उन्नतीचा सुवर्णकाळ. त्यानंतर शिवकाळ आला, शिवकाळ म्हणजे तोच पदर कमरेत खोचून केलेली रणगर्जना, हलकल्लोळ, अट्टाहास! हे दोन्ही काळ महाराष्ट्राने पाहिलेय आणि महाराष्ट्राचा स्वभावही असाच घडलेला आहे. तुकोबा म्हणतात, 'मऊ मेणाहूनि आम्ही विष्णुदास। कठिण वज्रास भेदूं ऐसे ॥ मेले जित असों निजोनियां जागे। जो जो जें जें मागे तें तें देऊं ॥' ही महाराष्ट्राची खरी ओळख आहे. इथे मऊपणा आहे, संवेदनशीलता आहे; त्याचबरोबर अन्यायाविरुद्ध लढण्याची, वज्रालाही भेदण्याची ताकद आहे. हीच ताकद छत्रपती शिवाजी महाराजांनी दाखवली. याच ताकदीने अनेक संतांनी समाजात सुधारणा केली. तर, मूळ विषय असा की, आता काही दिवसांपूर्वी 'ऑपरेशन टायगर' या नावाने उबाठाचे खासदार फोडण्याच्या चर्चा रंगल्या होत्या. अर्थात ही त्यांच्या पक्षाची अंतर्गत बाब असल्याने कोणाला याच्याशी कर्तव्य नाही. पण या चर्चांमुळे महाराष्ट्राच्या राजकारणातील सध्याची पातळी किती खालावली आहे, हे स्पष्ट होतं. खासदार फुटणार अशा चर्चा रंगू लागल्यावर संजय राऊत यांनी पत्रकार परिषद घेतली आणि त्यांनी पत्रकारांसमोर खासदारांना शिव्या घातल्या. ही घटना महाराष्ट्राच्या राजकीय संस्कृतीला काळिमा फासणारी आहे. संजय राऊत यांनी याआधीही पत्रकार परिषदांमध्ये शिव्या घातलेल्या आहेत, महिलेला उद्देशून अर्वाच्च भाषा वापरली आहे. ही त्यांची पहिली वेळ नाही, तर ही त्यांची सवय झाली आहे. सार्वजनिक जीवनात, विशेषतः पत्रकार परिषदेसारख्या व्यासपीठावर, जिथे हजारो लोक आपल्याला ऐकत असतात, टीव्हीवर बायका, लहान मुले तुम्हाला पाहत असतात तिथे अशी भाषा वापरणे हे अत्यंत निंदनीय आहे. ही केवळ असभ्यता नाही तर हा महाराष्ट्राच्या संस्कृतीचा अपमान आहे. विशेष म्हणजे, मुंबईकरांच्या दुर्दैवाने झालेल्या माजी महापौर किशोरी पेडणेकर यांनी संजय राऊतांची बाजू उचलून धरली आणि आपल्या विचित्र शैलीत ही मराठी भाषा आहे असं म्हटलं. हा तर कहरच झाला ना भाऊ! शिवीगाळ करणे, अर्वाच्च भाषा वापरणे ही जर मराठी भाषा असेल, तर मग स्वातंत्र्यवीर सावरकरांनी व्यक्त केलेला सात्त्विक संताप काय होता? सावरकर त्या काळचे जहाल नेते. त्यांनी भोंदूंवर आणि देशशत्रूंवर साहित्याच्या माध्यमातून प्रचंड टीका केलीय. त्यांची टीका इतकी बोचरी की इंग्रज सरकारने त्यांच्या साहित्यावर बंदी घातली. पण सावरकरांनी आपला रोष व्यक्त करताना कुठेही शिव्या घातल्या नाहीत. 'सरकारचे डोके ठिकाणावर आहे का?' हा त्या काळचा प्रचंड जहाल अग्रलेख टिळकांनी लिहिला. उद्धव ठाकरे, संजय राऊत, किशोरी पेडणेकर यांनी त्यांच्या समर्थकांनी कधी हे साहित्य वाचण्याचे कष्ट घ्यावे. मी म्हणजे मराठी, मी म्हणजे महाराष्ट्र, मी म्हणजे मराठी भाषा या फालतू अहंकारापोटी लोक तुम्हाला सोडून पळून जात आहेत. 'तुम्ही नको' असे केवळ महाराष्ट्राची जनता म्हणत नाही तर तुमचे नेतेही म्हणतायत. पण काही लबाड पत्रकार या लोकांची बाजू ठामपणे मांडतात. जणू यांचाच पक्ष फुटलाय. हे पत्रकारदेखील या मातीचे शत्रू आहेत. मराठी पत्रकारिता जणू मंडई झालेली आहे.

लक्षात ठेवा, मराठी भाषा ही समृद्ध आहे, तिला नवरसांची देणगी आहे. ती प्रेम व्यक्त करू शकते, शौर्य दाखवू शकते, विनोद निर्माण करू शकते आणि कठोर टीकाही करू शकते, पण ती कधीही शिवीगाळ करणारी भाषा नाही. कोणते शब्द चारचौघात वापरावेत आणि कोणते वैयक्तिक आयुष्यात याचं भान असायला हवं. मराठी भाषेला शिवीगाळ करणाऱ्यांच्या तोंडून 'मराठी भाषा' म्हणून समर्थन मिळणे हे मराठी भाषेचे दुर्दैव आहे. उद्धव ठाकरे आणि त्यांच्या सहकाऱ्यांना ना मराठीची जाणीव आहे, ना महाराष्ट्राची. त्यांना फक्त खुर्चीची जाणीव आहे, सत्तेची लालसा आहे. बरं ती खुर्ची कशी मिळवावी आणि कशी टिकवावी, याची जाणीव तर त्यांना नाहीच नाही. त्यांच्या कृतीतून आणि बोलण्यातून हेच वारंवार सिद्ध होत आहे. ज्या राज्यात पुलंसारखे साहित्यिक जन्माला आले, ज्या भूमीत ज्ञानेश्वर, तुकाराम, शिवाजी महाराज यांसारख्या महान व्यक्तींनी महाराष्ट्राला घडवलं, त्याच देशात आज ही शिवराळ भाषा मराठी राकट भाषेच्या नावाने खपवली जातेय, हे दुर्दैव आहे.

राकटपणा म्हणजे कठोरता, कणखरपणा, पण असभ्यता किंवा शिवीगाळ नव्हे. राकटपणा म्हणजे अन्यायाविरुद्ध लढण्याची धमक, स्वाभिमानाने जगण्याची वृत्ती. पण आजच्या राजकारण्यांनी राकटपणाचा अर्थ पूर्णपणे बदलून टाकला आहे. इथे पुलंचा एक किस्सा आठवतो. एका कार्यक्रमात वयोवृद्ध झालेले आचार्य अत्रे आणि पुलं दोघेही उपस्थित होते. रस्त्यावर सतत धूळ असल्याने अत्रेंनी राजकारण्यांवर टीका केली की किती धूळ. पुलं बोलायला उभे राहिले तेव्हा म्हणाले, 'ज्या माणसाने आयुष्यभर लोकांना धूळ चारली, त्याला का धुळीचा त्रास व्हावा!' हा मराठीचा गोडवा आहे लोकहो... आजच्या राजकारण्यांनी हा गोड चेहरा विद्रूप करण्याचा प्रयत्न चालवला आहे. खरं तर महाराष्ट्रात सध्या ऑपरेशन टायगर नव्हे तर 'ऑपरेशन शिव्या' सुरू आहे. मराठी भाषा ही शिवराळ राजकारण्यांची जहागीर नसून ज्ञानेश्वर-तुकोबा आणि पुलंच्या सुसंस्कृत वारशाचा पवित्र ठेवा आहे; हा ठेवा विद्रूप करणाऱ्यांना वेळीच आवरणे, हेच आजच्या पिढीपुढील खरे 'ऑपरेशन' आहे. ■

writerjayeshmestry@gmail.com

## वेध

**नीलेश जोशी**

# 'मनी म्युल' फसवे मायाजाळ

'घरबसल्या काम करा आणि दरमहा ५० हजार रुपये कमवा', 'पार्ट टाईम काम करा आणि मिळवा हजारो रुपये' या आणि अशा स्वरूपाच्या जाहिरातीला बळी पडणाऱ्यांची संख्या वाढतच आहे. झटपट पैसे कमविण्याची अभिलाषा, वाढती बेरोजगारी यासह इतर अनेक कारणे याला आहेत. या जाहिराती गावागावांत पत्रके वाटून, समाजमाध्यमांचा उपयोग करून केल्या जातात. जाहिराती असलेल्या संपर्कावर विचारणा केली असता कामाच्या स्वरूपाबाबत सांगितले जाते की, काही रक्कम त्यांच्या खात्यात जमा होईल आणि त्यांना ती पुढे दुसऱ्या खात्यात पाठवावी लागेल. या कामाच्या प्रत्येक व्यवहारावर कमिशन मिळेल. बेरोजगारीमुळे त्रस्त असलेला किंवा विविध अडचणीत फसलेला युवक हे काम स्वीकारतो. काही दिवसांत त्याच्या खात्यात लाखो रुपयांची उलाढाल होते. अचानक पोलिसांचा फोन येतो आणि त्याला कळते की, त्याच्या खात्यात आलेल्या आणि त्याने पुढे अन्य खात्यात वळत्या केलेल्या सर्व रकमा ऑनलाईन फसवणुकीतून आलेल्या होत्या. सायबर गुन्हेगार कोणत्याही व्यक्तीला थेट तुमचे खाते गुन्हेगारी व्यवहारासाठी वापरू द्या, असे सांगत नाहीत. त्याऐवजी आकर्षक ऑफर, नोकरीची संधी किंवा कमिशनच्या आमिषातून लोकांना जाळ्यात ओढले जाते. जाणता किंवा अजाणता या प्रकाराला बळी पडणाऱ्या व्यक्तींना 'मनी म्युल' असे संबोधले जाते.

आज इंटरनेट, मोबाईल बँकिंग, यूपीआय, ई-वॉलेट आणि ऑनलाईन व्यवहारांच्या वाढत्या वापरामुळे गुन्हेगारांनी सायबर फसवणुकीचे नवे मार्ग शोधले आहेत. अशाच धोकादायक आणि वेगाने वाढणाऱ्या गुन्हेगारी प्रकारांपैकी एक म्हणजे 'मनी म्युल घोटाळा.' अनेकांना या संज्ञेचा अर्थही माहिती नसतो, परंतु नकळतपणे हजारो नागरिक या गुन्हेगारी साखळीचा भाग बनत आहेत. सायबर गुन्हेगारांनी फसवणूक, ऑनलाईन लॉटरी, गुंतवणूक घोटाळे, बनावट नोकऱ्या, डिजिटल अटक, ओटीपी फसवणूक किंवा इतर मार्गांनी मिळविलेला पैसा थेट स्वतःच्या खात्यात न घेता तो दुसऱ्या व्यक्तीच्या खात्यात जमा करतात. त्यानंतर तो पैसा विविध खात्यांमधून फिरवून अखेरीस स्वतःपर्यंत पोहोचवतात. या प्रक्रियेत ज्यांच्या खात्यांचा वापर केला जातो, त्या व्यक्तींना 'मनी म्युल' म्हटले जाते. म्युल म्हणजे सामान वाहून नेणारे खेचर. जसे खेचर एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी सामान वाहून नेते, तसेच मनी म्युल बेकायदेशीर पैशाची वाहतूक करणारे माध्यम बनते. अनेकदा संबंधित व्यक्तीला आपण गुन्हेगारी कारवायांचा भाग बनलो आहोत, याची कल्पनाही नसते. मात्र, सहज पैसे कमविण्याच्या मोहापायी लोक यात अडकतात.

आज भारतासह जगभरातील कायदा अंमलबजावणी यंत्रणांसमोर मनी म्युल नेटवर्क मोठे आव्हान बनले आहे. ऑनलाईन फसवणुकीतून मिळालेला पैसा शोधणे कठीण व्हावे यासाठी गुन्हेगार अनेक बँक खाती, डिजिटल वॉलेट आणि आंतरराष्ट्रीय व्यवहारांचा वापर करतात. त्यामुळे तपास यंत्रणांना मूळ आरोपीपर्यंत पोहोचण्यासाठी मोठी कसरत करावी लागते. इंडियन सायबर क्राईम को-ऑर्डिनेशन सेंटरने सप्टेंबर २०२४ मध्ये संशयास्पद खात्यांची नोंदणी सुरू केली तेव्हापासून सुमारे २५ लाख मनी म्युल खाती बँक आणि विविध वित्तीय संस्थांच्या निदर्शनास आणून दिली आहेत. या माध्यमातून जवळपास ८ हजार कोटी रुपयांची फसवणूक रोखल्या गेल्याचे एका अहवालात म्हटले आहे. खरं म्हणजे मनी म्युल हा केवळ आर्थिक गुन्हा नाही तर संपूर्ण सायबर गुन्हेगारीची साखळी आहे. जेव्हा एखादी व्यक्ती आपले खाते वापरू देते, तेव्हा ती नकळतपणे फसवणूक, आर्थिक गुन्हे आणि संघटित सायबर गुन्हेगारीला मदत करीत असते. त्यामुळे या समस्येकडे केवळ वैयक्तिक नव्हे तर सामाजिक जबाबदारी म्हणून पाहणे महत्त्वाचे आहे. शासन, बँका, शैक्षणिक संस्था, सामाजिक संस्था, पोलिस यंत्रणा आणि सायबर सुरक्षेचे ज्ञान असणारे नागरिक यांनी संयुक्तपणे जनजागृती केली तरच या वाढत्या धोक्याला आळा घालता येईल. आपले वैयक्तिक बँक खाते ही केवळ आर्थिक सुविधा नसून ती आपली कायदेशीर जबाबदारी आहे. याची जाणीव जागृती होणे देखील महत्त्वाचे म्हणावे लागेल. आज काही हजार रुपयांच्या मोहापायी आपले खाते दुसऱ्याला वापरू देणारी व्यक्ती उद्या मोठ्या गुन्हेगारी साखळीत अडकू शकते. त्यामुळे 'सहज पैसे कमवा' या आमिषाला बळी पडण्याऐवजी सजग नागरिक म्हणून आर्थिक व्यवहारांमध्ये सतर्कता बाळगणे हीच काळाची गरज आहे. ■

९४२२८६२४८४

## मुंबई वार्तापत्र

# नेतृत्व दिवाळखोरी

**नागेश दाचेवार**

महाराष्ट्राच्या राजकारणात गेल्या काही वर्षांत अनेक नाट्यमय घडामोडी घडल्या. सत्तांतर झाले, पक्ष फुटले, चिन्हे बदलली, निष्ठा बदलल्या आणि अनेक राजकीय समीकरणे पूर्णपणे उलटली. मात्र, या सर्व घटनांमध्ये जर एखादा पक्ष सर्वाधिक हादरला असेल, तर तो म्हणजे उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना.

एकेकाळी महाराष्ट्राच्या राजकारणात अभेद्य वाटणारी शिवसेना आज अस्तित्व, नेतृत्व आणि संघटन या तिन्ही पातळ्यांवर संघर्ष करताना दिसते. या परिस्थितीसाठी विरोधक, भाजपा, शिंदे गट, निवडणूक आयोग किंवा केंद्रीय यंत्रणा जबाबदार आहेत, असा दावा सातत्याने केला जातो. पण प्रत्येक वेळी इतरांनाच दोष देत राहणे आणि स्वतःच्या नेतृत्वाचे मूल्यमापन टाळणे, हीच आजची ठाकरेंसाठी सर्वात मोठी समस्या बनली आहे.

बाळासाहेब ठाकरे यांच्या काळातील शिवसेना आणि आजची शिवसेना यामध्ये जमीन-अस्मानाचा फरक असल्याची चर्चा केवळ त्यांचे विरोधकच करीत नाहीत, तर अनेक जुने शिवसैनिकदेखील करतात. बाळासाहेबांच्या काळातही संकटे आली, पण पक्षाचे अस्तित्व कधीच धोक्यात आले नाही. उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली मात्र परिस्थिती वेगळी दिसली. निर्णयप्रक्रिया मर्यादित लोकांच्या हातात गेली, कार्यकर्त्यांशी संवाद कमी झाला व पक्षाची ऊर्जा रस्त्यावरील संघर्षातून पत्रकार परिषदांमध्ये अडकली.

२०१९ मध्ये भाजपासोबत निवडणूक लढवून काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेससोबत सत्ता स्थापन करण्याचा निर्णय शिवसेनेच्या इतिहासातील सर्वात मोठे राजकीय वळण होते. हा निर्णय योग्य की अयोग्य यावर मतभेद असू शकतात, पण त्या निर्णयामुळे पक्षाच्या पारंपरिक मतदारांमध्ये संभ्रम निर्माण झाला, हे वास्तव नाकारता येत नाही. हिंदुत्वाच्या मुद्द्यावर मत मागायचे आणि नंतर विचारधारात्मक विरोधकांसोबत सत्ता वाटून घ्यायची, यामुळे शिवसेनेतील अनेक नेते आणि कार्यकर्ते अस्वस्थ झाले. त्या अस्वस्थतेचे रूपांतर पुढे बंडात झाले का, हा प्रश्न आजही चर्चेचा विषय आहे.

२०२२ मधील एकनाथ शिंदे यांचे बंड हे केवळ काही आमदारांचे राजकीय स्थलांतर नव्हते. तो नेतृत्वावरील अविश्वासाचा मोठा संदेश होता. दोन तृतीयांश आमदार एका वेळी पक्षातून बाहेर पडतात, ही घटना कोणत्याही राजकीय पक्षासाठी गंभीर धक्का असते. यावेळी उद्धव गटाने बंडखोरांना गद्दार, फितूर आणि विकाऊ अशी विशेषणे लावली. जनता त्यांना धडा शिकवेल, अशी भाषा केली. पण नंतर अनेक नव्हे तर जवळवजळ पूर्णच बंडखोर पुन्हा निवडून आले. जर जनता खरोखरच त्यांच्याविरोधात होती, तर त्यांना मतदारांनी पुन्हा निवडून दिले नसते. त्यांनी सिद्ध करून दाखवले ठाकरे 'ब्रॅण्ड' नाही तर आमच्यासारख्या कष्टाने शिवसेनेचा वटवृक्ष करणाऱ्यांमुळे ठाकरे हे 'ब्रॅण्ड' झाले आहेत; आणि अशा रक्ताचं पाणी करणाऱ्या खऱ्या खुऱ्या स्वाभिमानी, सच्चा कार्यकर्त्यांना शिवीगाळ करणे, गद्दार म्हणणे आणि नैतिकता, संस्कार, शिष्टाचाराचा प्रश्न येतो म्हणून त्या राऊतांनी दिलेल्या शिव्या इथे लिहिता येत नाही. अशी शिवीगाळ ऐकून नेते यांच्या सोबत राहतील अशी अपेक्षा करताना लाजसुद्धा वाटत नाही यांना.

संजय राऊत स्वतःला उद्धव गटाचा प्रमुख राजकीय योद्धा म्हणवून घेतात. रोज माध्यमांसमोर येऊन विरोधकांवर तोंडसुख घेतात. मात्र, त्यांच्या सकाळच्या प्रतापांमुळे पक्षाला फायदा झाला की नुकसान, हा विषय वेगळाच राहिला. सहा खासदार सोडून जाण्याच्या आदल्या दिवशी त्यांच्यावर तोंडसुख घेऊन राऊतांनी त्यांची वाट मोकळी करून दिली. राजकारणात रोज आरोप करणे आणि निवडणुका जिंकणे या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. टीव्ही स्टुडिओमधील आक्रमकता मतपेटीत यशात बदलतेच असे नाही. आज उबाठासमोरील सर्वात मोठा प्रश्न विरोधकांचा नाही, तर विश्वासाचा आहे. कार्यकर्त्यांचा विश्वास, स्थानिक नेत्यांचा विश्वास आणि मतदारांचा विश्वास पुन्हा मिळविणे ही सर्वात मोठी लढाई आहे. प्रत्येक फुटीसाठी बाह्य शक्तींना जबाबदार धरणे सोपे असते. पण जेव्हा मोठ्या प्रमाणावर लोक पक्ष सोडतात, तेव्हा नेतृत्वाने स्वतःकडेही पाहिले पाहिजे. प्रत्येक घटनेत भाजपाला ओढून आपले अपयश लपवून काहीही होणार नाही. यांचे असं झालं आहे, मुघल सैनिकांना जसे 'संताजी-धनाजी' स्वप्नात दिसायचे तसे उठता-बसता भाजपा मोदी-शाह दिसतात. पण असे लोकांकडे बोटं दाखवून चालत नाही. आत्मपरीक्षणाशिवाय पुनरुज्जीवन होत नाही, हे उठाबाने स्वीकारले पाहिजे. अन्यथा यांची अधोगती कोहीही रोखू शकणार नाही.

शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडली, काँग्रेस अनेक राज्यांत कमकुवत झाली, शिवसेना विभागली गेली या सर्व घटनांमधून एक समान धडा मिळतो. कोणताही पक्ष केवळ भावनिक निष्ठेवर टिकत नाही. कार्यकर्त्यांना संधी, नेत्यांना स्थान आणि संघटनेला दिशा मिळाली पाहिजे. आज उद्धव ठाकरे यांच्या राजकारणासमोर सर्वात मोठे आव्हान म्हणजे सहानुभूतीचे मत नेतृत्वाच्या विश्वासात रूपांतरित करणे. कारण सहानुभूती तात्पुरती असते, पण नेतृत्वावरील विश्वास दीर्घकालीन असतो.

निवडणूक आयोग, न्यायालये आणि इतर घटनात्मक संस्थांवर टीका करण्याची भूमिका देखील अनेकदा विरोधाभासी वाटते. निर्णय अनुकूल असेल तेव्हा संस्थांचे स्वागत करायचे आणि प्रतिकूल असेल तेव्हा त्यांच्यावर प्रश्न उपस्थित करायचे. जुन्या पक्षफुटीच्या प्रकरणाचा निकाल न्यायालय देत नाही म्हणून न्यायालयावर आगपाखड करायला न थकणारी हीच मंडळी आता पुन्हा खासदारांच्या फुटीनंतर त्याच अविश्वास असलेल्या न्यायालयासमोर जाण्याची भाषा करत आहेत. निवडणूक आयोगावर विश्वास नाही, ईव्हीएमवर प्रश्नचिन्ह उपस्थित करतात, तरी देखील निवडणूक आली की ती लढवायला सगळ्यात पहिले हेच लोकं तयार असतात. हा सगळा विरोधाभासी आणि संधिसाधू राजकारणाचा चेहरा आता जनतेसमोर आला आहे. महाराष्ट्रातील मतदार आता पूर्वीपेक्षा अधिक जागरूक आहेत. ते केवळ घोषणांवर विश्वास ठेवत नाहीत. ते निकाल पाहतात, नेतृत्व पाहतात, सातत्य पाहतात आणि इतिहास लक्षात ठेवतात.

आज प्रश्न केवळ पक्षफुटीचा नाही; प्रश्न आहे नेतृत्वाच्या परिणामकारकतेचा. पक्षातून सतत लोक का जातात? कार्यकर्ते का नाराज होतात? मतदार का संभ्रमित होतात? या प्रश्नांची प्रामाणिक उत्तरे शोधल्याशिवाय उबाठाला गत्यंतर नाही. बाळासाहेब ठाकरे यांनी उभी केलेली शिवसेना संघर्ष, संघटन आणि रस्त्यावरच्या राजकारणातून घडली होती. आज तीच शिवसेना अस्तित्वासाठी झगडताना दिसत असेल, तर त्यामागील कारणांचा शोध घेणे आवश्यक आहे. इतिहासाचा एक नियम असतो. विरोधकांवर विजय मिळविण्यापूर्वी स्वतःच्या कमतरतांवर विजय मिळवावा लागतो. जे नेतृत्व हा धडा विसरते, त्याला जनता वेळोवेळी वास्तवाची जाणीव करून देते आणि म्हणूनच आज महाराष्ट्राच्या राजकारणात सर्वात मोठा प्रश्न शिवसेना विरोधकांमुळे कमकुवत झाली की नेतृत्वातील त्रुटींमुळे? याचे उत्तर शोधल्याशिवाय राजकारणात टिकून राहण्याचा ठाकरेंकडे दुसरा मार्ग नाही. ■

९२७०३३३८८६

## वाचक पत्रे

### तलावातील पाणी पिण्याच्या पाण्यासाठीच वापरा

नागपूर व विदर्भातील उन्हाळा सर्वपरिचित आहे. उन्हाळ्याची तीव्रता दिवसेंदिवस वाढत असून वाढते तापमान ही केवळ नैसर्गिक समस्या नसून नियोजन व पर्यावरणावरील दुर्लक्षाचे दुष्परिणाम आहेत. मोठ्या प्रमाणावर होणारी वृक्षतोड आणि जलस्तोत्रावरील अतक्रिमण यामुळे उष्णतेची तीव्रता अधिक वाढत आहे. सार्वजनिक ठिकाणी पिण्याच्या पाण्याची कमतरता, रस्त्यावरील सावलीसाठी झाडांचा अभाव आणि उष्माघाताविषयी मर्यादित जनजागृती ही गंभीर समस्या बनली आहे. जशी जशी उन्हाची तीव्रता वाढते, तसे तसे पाण्याच्या बाष्पीभवनाचे प्रमाणही वाढत जाते व त्यामुळे आपल्याला पाण्याची कमतरता भासत असते. मग जलस्त्रोत वाढवणे, पाण्याचा वापर काटकसरीने करणे, पर्यावरणपूरक वातावरण इत्यादी बाबींकडे आपले लक्ष जात असते. भंडारा जिल्ह्यात गावांपेक्षा तलावांची संख्या जास्त आहे. या धर्तीवर विदर्भातील सर्व प्रमुख गावांचा विचार होऊन जुने मालगुजारी तलाव, लघु पाटबंधारे प्रकल्प, मध्यम प्रकल्प यांची संख्या वाढविण्याचा विचार व्हायला पाहिजे. तलावांमुळे पिण्याच्या पाण्याची सोय व शेतीसाठी सिंचनाची सोय होत असते. तसेच जमिनीतील पाण्याची पातळी वाढत असते. सिंचन तलावांची संख्या वाढविणे गरजेचे आहे; जेणेकरून पाणी टंचाई कमी होईल.

**शशिकांत दलाल**/नागपूर
९८२२३६५१९०.

■■■

### सर्व रस्त्यांना समान न्याय हवा

'मुंबई-पुणे ४८ मिनिटांत शक्य' ही बातमी वाचली. बुलेट ट्रेनमुळे ते शक्य होणार यचा आनंदही झाला, पण गेली अनेक वर्षे मुंबई-पुणे अंतर कमीत कमी वेळात पार पाडण्यासाठी सर्व स्तरांवर प्रयत्न होताना दिसतात, त्याचा खरंच फायदा होतोय? मुंबई-नाशिक, मुंबई-वापी, अहमदाबाद, मुंबई -गोवा य शहरांमध्ये कमी वेळात प्रवेश व्हावा यासाठी किती प्रयत्न केले जाताहेत? आता गौरी-गणपतीचे दिवस येतील आणि कोकणात जाणाऱ्या रस्त्यांवर घनघोर चर्चा होईल, पण प्रत्यक्षात गेल्या दोन दशकांत हा रस्ता कधीच सुधारला नाही हे कटू वास्तव आहे. मुंबई-अहमदाबाद मार्ग तर सवयीचं मूल असल्यासारखा वाढवला जातो. इतके अपघात होतात तरीही त्यावर काहीही तोडगा काढला जात नाही, रस्ता दुरुस्त होत नाही. तीच गत मुंबई-नाशिक रस्त्यांची आहे. आता कुंभ आला आहे म्हणून थोडीफार डागडुजी होईलही पण कायमस्वरूपी रस्त्याचे स्वरूप बदलणार नाही हे नक्की. एकूणच देशात काही ठरावीक शहरांमधील रस्ते बदलतात, पण इतरत्र मात्र सरकारी अनास्था प्रामुख्याने दिसून येते. संपूर्ण देशातील सर्व रस्त्यांना समान न्याय मिळाला तर भारताचे चित्र अजून परिणामकारक होईल असे वाटते.

**माया हेमंत भाटकर**/पुणे

■■■

### 'झुरळां'वर उपाययोजना आवश्यक

नीट पेपरफुटीचा पर्दाफाश करण्यासाठी केंद्रीय अन्वेषण विभागाचे पथक काम करत असून पेपरफुटीच्या मुख्य सूत्रधारांवर कठोर गुन्हे दाखल केले जात आहेत. जे शिक्षक आणि परीक्षा माफिया प्रश्नपत्रिका तयार करण्यापासून ते छपाई आणि वितरणात गैरप्रकार करताना आढळले आहेत, त्यांना अटक करून तुरुंगात पाठवले जात आहे.

२१ जूनला होणारी नीट परीक्षा सुरळीत पार पडावी म्हणून प्रथमच हवाई दलाच्या मदतीने प्रश्नपत्रिका सुरक्षितपणे केंद्रांपर्यंत पोहोचवण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. प्रश्नपत्रिका केंद्रांवर पोहोचवताना त्यांना सीआयएसएफ आणि सीआरपीएफ जवानांची सुरक्षा पुरवण्यात येणार आहे. सरकारने जर पुन्हा पेपरफूट होऊ नये म्हणून फारसे प्रयत्न केले नसते किंवा पेपरफुटीतील गुन्हेगारांना पाठीशी घातले असते तर झुरळ पार्टीचे आंदोलन योग्य ठरले असते. आपल्या आंदोलनाचे समर्थन करताना दिपके म्हणाले, जनआंदोलनानेच स्वातंत्र्य मिळाले. परंतु असे म्हणताना ते हे विसरले की, पारतंत्र्यातील जनआंदोलन हे अत्याचारी इंग्रज सरकारविरुद्ध होते, त्यामुळे ते जनआंदोलन फार आवश्यक होते. परंतु आजची परिस्थिती वेगळी आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवर भारताच्या वाढलेल्या दबदब्याने काही जणांना पोटशूळ उठला आहे. त्यामुळे लोकनियुक्त सरकार अस्थिर करणे, देशातील तरुणांना भडकविणे यासाठी पेपरफुटीचे निमित्त करून देशद्रोही कार्यभाग साधण्यासाठीच या झुरळ आंदोलनाचे



प्रयोजन आहे. म्हणूनच अशा झुरळांवर उपाययोजना करावी, असे वाटते. ■

**कल्पना विनय माहूरकर**/नागपूर

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस **tbedit2016@gmail.com** तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



### शिवसेना पक्षाच्या साठव्या वर्धापन दिनानिमित्त रक्तदान शिबिर

**सोलापूर, दि.१९ जून-**

शिवसेना पक्षाच्या साठव्या वर्धापन दिनानिमित्त शिवसेना जिल्हाप्रमुख तथा सोमपा गटनेता अमोल शिंदे यांच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. छत्रपती शिवाजी महाराज स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे स्वर्गीय आनंद दिघे यांच्या प्रतिमेचे पूजन करून शिबिराचे उदघाटन करण्यात आले करण्यात आले. याप्रसंगी जिल्हा परिषद सदस्य प्रवीण तानवडे, प्रकाश अवस्थी, युवानेते ज्ञानेश्वर सपाटे, संजय सरवदे, आयुब पठाण, माजिद बागवान, महादेव गवळी, बाळासाहेब पवार, गणेश कुलकर्णी, विक्रांत वानकर यांच्यासह पदाधिकारी व शिवसैनिक उपस्थित होते.

# सोलापुरात उद्या भव्य योग महाकुंभ; ह.दे. प्रशालेच्या मैदानावर आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ जून -**

यंदाचा १२ वा आंतरराष्ट्रीय योग दिवस रविवार, २१ जून रोजी सोलापुरात अत्यंत आगळ्यावेगळ्या आणि भव्य पद्धतीने साजरा केला जाणार आहे. शासकीय संस्था आणि शहरातील सर्व प्रमुख योग संस्थांच्या वतीने एकत्रितपणे हा योग महाकुंभ आयोजित करण्यात आला आहे.

सोलापुरात सन २०१५ पासून हा संयुक्त उपक्रम राबवला जात असून, संपूर्ण महाराष्ट्रात अशा प्रकारचा हा एकमेव सामूहिक सोहळा ठरला आहे. यंदा योग दिवस समन्वय समितीच्या वतीने या कार्यक्रमाचे नेटके नियोजन करण्यात आले आहे. हा सोहळा ह.दे. प्रशालेच्या मैदानावर सकाळी ठीक ७:०० वाजता सुरू होऊन ८:१५ वाजता संपन्न होईल. कार्यक्रमाच्या सुरुवातीला दीपप्रज्वलन आणि शंखनाद होईल. त्यानंतर मान्यवरांचे मार्गदर्शन आणि योग क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल पाच योगगुरूंचा विशेष सत्कार केला जाईल.

यानंतर आयुष मंत्रालयाने प्रस्तावित केलेला ४० मिनिटांचा अधिकृत योगाभ्यास




विविध संस्थांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केला जाईल. यामध्ये योग सेवा मंडळातर्फे ओमकार, प्रार्थना, शिथिलीकरण व्यायाम व उभी आसने घेतली जातील. योग साधना मंडळाचे साधक बसून करावयाची आसने करून घेतील. भारतीय योग संस्थेचे साधक पोटावर निजून करावयाची आसने, तर विवेकानंद केंद्राचे साधक पाठीवर निजून करावयाची आसने व शवासन दाखवतील. तसेच पतंजली योग पीठातर्फे प्राणायाम आणि गीता परिवार व सर्व कल्याण योगतर्फे ध्यान, संकल्प व शांतीपाठ घेतला जाईल. योगाभ्यासानंतर नृत्य निरंजन संस्थेच्या वतीने बहारदार योग नृत्य सादर केले जाणार आहे. या महाकुंभात क्रीडा मंत्रालय, मेरा युवा भारत या शासकीय संस्थांसह सर्वोदय योग साधना मंडळ, भारत स्वाभिमान ट्रस्ट, योग प्रभा मंडळ, योग असोसिएशन तसेच ह.दे. प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय या संस्था सक्रिय सहभागी होत आहेत. कार्यक्रमाच्या ठिकाणी योग विषयक पुस्तकांचे स्टॉल्सही लावण्यात येणार आहेत.

### नागरिकांसाठी सूचना

कार्यक्रमाला येताना प्रत्येकाने स्वतःची सतरंजी (मॅट) आणि पाण्याची बाटली सोबत आणणे आवश्यक आहे. ज्यांना प्रत्यक्ष योगाभ्यास करायचा नसेल, ते केवळ पाहण्यासाठी (प्रेक्षक म्हणून) येऊ शकतात. मैदानावर प्रवेश केवळ शाळेच्या मागील बाजूने किंवा बाजूच्या बोळातूनच करावा. वाहने फक्त अतिमहत्त्वाच्या व्यक्तींचीच समोरून आत येऊ शकतील, इतरांनी आपली वाहने आत आणू नयेत, असे आवाहन समन्वय समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

# शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार विजेते, आंतरराष्ट्रीय खेळाडू व पालकांचा मंगळवारी सत्कार

### जागतिक ऑलिम्पिक दिनानिमित्त जिल्हा क्रीडा कार्यालयाच्या वतीने आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १९ जून-**

जागतिक ऑलिम्पिक दिनानिमित्त शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार विजेते, आंतरराष्ट्रीय खेळाडू तसेच त्यांच्या पालकांचा सत्कार मंगळवारी २३ जून रोजी सायंकाळी ४.३० वाजता एमआयडीसी येथील स्वामी विवेकानंद हायस्कूल येथे होईल.

आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समितीची स्थापना २३ जून १८९४ रोजी झाल्याच्या स्मरणार्थ दरवर्षी २३ जून हा दिवस जगभर जागतिक ऑलिम्पिक दिन म्हणून साजरा केला जातो. खेळाडूंमध्ये क्रीडाभावना, उत्कृष्टतेचा ध्यास, सहभागाची प्रेरणा आणि निरोगी जीवनशैलीचा प्रसार करण्याच्या उद्देशाने हा दिवस साजरा केला जातो. या पार्श्वभूमीवर जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व एमआयडीसी येथील स्वामी विवेकानंद हायस्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने यावेळी मान्यवरांच्या उपस्थितीत क्रीडा क्षेत्रातील अनुभवांवर आधारित चर्चासत्राचे आयोजनही केले आहे. या कार्यक्रमास खेळाडू, पुरस्कार विजेते, पालक, क्रीडा प्रशिक्षक व क्रीडाप्रेमींनी उपस्थित राहावे, असेही आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी प्रकाश मोहारे यांनी केले आहे.

तसेच जिल्ह्यातील सर्व शाळा, महाविद्यालये, विविध क्रीडा संघटना, एनसीसी, मेरा युवा भारत अभियान, सामाजिक संस्था तसेच औद्योगिक प्रतिष्ठानांनी विविध क्रीडा व जनजागृतीपर उपक्रमांचे आयोजन करावे. आयोजित उपक्रमांचा अहवाल व छायाचित्रे जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयास सादर करावीत, असे आवाहन श्री. मोहारे यांनी केले आहे.

# ‘वालचंद’च्या ४२ विद्यार्थ्यांचे ९० पेक्षा अधिक पर्सेंटाईल

### राज्य सामायिक प्रवेश परीक्षा सेकंड अटेम्प्ट परीक्षा

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १९ जून-**

राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत घेण्यात आलेल्या सीईटी-पीसीएम गटाच्या सेकंड अटेम्प्ट परीक्षेत वालचंद कनिष्ठ महाविद्यालयाच्या ४२ विद्यार्थ्यांनी ९० पेक्षा अधिक पर्सेंटाईल मिळवत महाविद्यालयाच्या गुणवत्तापूर्ण शैक्षणिक परंपरेला साजेशी कामगिरी केली.

अनिकेत खडके याने ९९.८९ पर्सेंटाइल मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे सर्व विश्वस्त, प्राचार्य डॉ. संतोष कोटी, उपप्राचार्य अनुप म्हेत्रे, पर्यवेक्षक डॉ. जीवराज



कस्तुरे तसेच सीईटी समन्वयिका सारिका महिंद्रकर यांनी अभिनंदन केले.

**यशस्वी गुणामुक्रमे विद्यार्था :** अनिकेत खडके याने (९९.८९) रेवणेश सुतार (९९.८३), स्वयम वनकुद्रे (९८.५८), सोनाली नंदी (९८.१९), अनुष्का बब्बूर (९७.८०), समर्थ उन्नद (९७.०३), अमृता वाघमोडे (९६.८०), प्रणव साखरे (९६.७०), श्रद्धा कापसे (९६.४०), नितीन कोंकती (९५.९४), आकांक्षा सुतार (९५.९३), कोमल हुक्कीरे (९५.६८), सुयश माने (९५.६१), सार्थक पाटील (९५.५९), हसिनी शेगुरे (९५.१९), वैष्णवी अल्लोळी (९५.१३), ओंकार श्रीपुरम (९५.१२), मोहम्मद झियान चौधरी (९५.०७), समर्थ चिप्पा (९४.४८), प्रियंका एडके (९४.३३), ओंकार साबळे (९३.७२), अमूल्या होटगोंड (९३.७२), मधुमाला चव्हाण (९३.००), सुचित्रा पांगती (९२.८०), कीर्ती द्यावरकोंडा (९२.७५), रमजान शेख (९२.५६), एम. नोमान पीरजादे (९२.५२), श्रवण पटेल (९२.४९), अनिकेत इराबत्ती (९२.१५), वैष्णवी चोपडे (९१.९५), वेदिका बोडा (९१.७३), शिवलीला खोबरे (९१.३७), घनश्याम नक्का (९१.२५), समर्थ येळे (९०.९२), वेदांत आडम (९०.९२), हर्षवर्धन शितोळे (९०.८२), आर्यन वेर्णेकर (९०.५१), विशाल गंडगे (९०.२५), मनीषा कंकुंटला (९०.२३), रसिका साळुंके (९०.१२), सोहम चराटे (९०.१०) आणि पूनम साखरे (९०.०४).

# सलीम खान व दास्ताने संघांची विजयी घोडदौड

### लिटील चॅम्प चषक क्रिकेट स्पर्धा : निमेश मणियार व व्यंकटेश घाडगे सामनावीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ जून -**

सोलापूर डिस्ट्रिक्ट क्रिकेट असोसिएशन यांच्या वतीने सुरू असलेल्या लिटील चॅम्प चषक क्रिकेट स्पर्धेत शुक्रवारी झालेल्या सामन्यात सलीम खान संघ आणि दास्ताने संघाने आपापल्या सामन्यात शानदार विजय घोडदौड कायम ठेवली आहे.

जुळे सोलापूर येथील भंडारी मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत सकाळच्या सत्रात झालेल्या पहिल्या सामन्यात कुद्दूस खान संघाने प्रथम फलंदाजी करताना निर्धारित ३० षटकांत ८ बाद १२९ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात सलीम खान संघाने संयमी आणि आक्रमक फलंदाजीचे प्रदर्शन करत २४.५ षटकांत ६ बाद १३० धावा पूर्ण केल्या आणि ४ गडी राखून विजय मिळवला. सलीम खान संघाच्या विजयात निमेश मणियार याने ३ षटकांत अवघ्या १३ धावा देत २ बळी घेतले. त्याच्या या उत्कृष्ट कामगिरीमुळे त्याला सामनावीर पुरस्काराने गौरविण्यात आले.

दुसऱ्या सामन्यात दास्ताने संघाने श्रीनिवास शिवाळ संघावर २४ धावांनी मात केली. प्रथम फलंदाजी करताना दास्ताने संघाचा डाव



निमेश मणियार



व्यंकटेश घाडगे

२६.३ षटकांत सर्वबाद १२२ धावांवर आटोपला होता. मात्र, दास्तानेच्या गोलंदाजांनी अचूक मारा करत श्रीनिवास शिवाळ संघाला २४.३ षटकांत अवघ्या ९८ धावांवर रोखले आणि सर्वबाद केले. दास्ताने संघाच्या या विजयात वेंकटेश घाडगे याने अष्टपैलू कामगिरी केली. त्याने फलंदाजीत ३१ चेंडूत नाबाद २२ धावा केल्या, तर गोलंदाजीत १ षटकात ३ धावा देऊन १ बळी घेतला. त्याच्या या कामगिरीमुळे त्याला सामनावीर घोषित करण्यात आले.

आजच्या दोन्ही सामन्यांचे पंच म्हणून प्रवीण कुलकर्णी आणि चंदू मंजली यांनी काम पाहिले, तर गुणलेखक म्हणून शुभम मुत्तूर यांनी जबाबदारी सांभाळली.

# ‘वृक्षलागवड व संवर्धन ही काळाची गरज’

### वृक्ष लागवड संवर्धन स्पर्धेच्या पुरस्कार वितरणप्रसंगी उद्योजक सुदाम भोरे यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १९ जून-**

वृक्षलागवड व संवर्धन ही आज काळाची गरज आहे, असे प्रतिपादन उद्योजक सुदाम भोरे यांनी केले. माणगंगा भ्रमणसेवा बहुउद्देशीय संस्था, वाढेगाव आयोजित ‘वृक्ष लागवड व संवर्धन स्पर्धा-२०२५’च्या पुरस्कार वितरणप्रसंगी ते बोलत होते. यावेळी सांगोला येथील सहाय्यक पोलीस निरीक्षक भारत वाघे, दिपाली जाधव, वसंत फुले व अमोल तोडकरी आदी उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते वृक्षपूजन व वृक्षांना पाणी घालून करण्यात आली. प्रास्ताविक वैजिनाथ घोगडे यांनी केले.




यावेळी स्पर्धेच्या निवड समितीतील प्रा. विजय जाधव, प्रा. राजेंद्र सूर्यवंशी आणि दत्ता पाटील तसेच स्पर्धेतील विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके प्रदान करण्यात आली.

**सांगोल्याचे पांडुरंग पाटील प्रथम**

स्पर्धेतील प्रथम तीन : पांडुरंग रामचंद्र पाटील (सांगोला), बलवडी ग्रामपंचायत (बलवडी), वासूद अकोला रोड वृक्ष संवर्धन समूह (वासूद). विशेष वृक्षसेवा सत्कार : प्रवीण तळे (सोलापूर), डॉ. किशोर वाघमारे, श्री गणेश जाधव.

### ज्ञानेश्वरी झेंडेकर हिचे एम.बी.बी.एस परीक्षेत यश

**सोलापूर, दि. १९ जून -**



शेळगी येथील ज्ञानेश्वरी उमेश झेंडेकर हिने एम.बी.बी.एस. परीक्षेत यश संपादन केले. ज्ञानेश्वरीचे वडिलाचे जनरल स्टोअर्सचे दुकान असून आई या शिक्षिका आहेत ज्ञानेश्वरीने आई-वडिलांकडून समाजसेवेचा धडा घेतला आहे आहे. जिद्द प्रयत्न आणि अभ्यासातलं सातत्य यामुळे यश संपादन करता आलं एमबीबीएस नंतर पुढे शिक्षण चालू ठेवून उत्तम दर्जाची रूग्ण सेवा करण्याचा मानस असल्याचे डॉ ज्ञानेश्वरी हिने सांगितले.

**मध्य रेल्वे**
**सोलापुर मंडळ**
**विविध इंजीनियरिंग कार्य**

मंडळ रेल्वे व्यवस्थापक (कामे), मध्य रेल्वे, सोलापूर हे भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने खालील कामांसाठी नामांकित संस्था / कंत्राटदारांकडून ई-निविदा मागवत आहेत: निविदा सूचना क्रमांक: 15-2026-एसआरडीईएनसीओ, कामाचे नाव: 1. बोरोटी (BOT) आणि कुलाळी (KUI) स्टेशनवर हाय लेव्हल प्लॅटफॉर्मची (HL PF) तरतूद करणे. 2. होटगी (HG) स्टेशनवर हाय लेव्हल प्लॅटफॉर्मची (HL PF) तरतूद करणे. कामाची अंदाजे किंमत: रु. 15,49,77,821.71, बयाणा रक्कम: रु. 30,99,600/-, काम पूर्ण करण्याचा कालावधी: 12 महिने. देखभाल कालावधी: 24 महिने. निविदा सूचना क्रमांक: 16-2026-एसआरडीईएनसीओ, कामाचे नाव: 1. जिंती रोड (JNTR), पारेवाडी (PRWD) (ज्याचे नाव बदलून केईयू KEU केले आहे) आणि मोहोळ (MO) स्टेशनवर हाय लेव्हल प्लॅटफॉर्मची (HL PF) तरतूद करणे. 2. माळठण (MLM) आणि भिगवण (BGVN) स्टेशनवर हाय लेव्हल प्लॅटफॉर्मची (HL PF) तरतूद करणे. कामाची अंदाजे किंमत: 23,24,14,849.16, बयाणा रक्कम (अर्नेस्ट मनी): 46,48,300/-, काम पूर्ण करण्याचा कालावधी: 12 महिने, देखभाल कालावधी: 24 महिने, www.ireps.gov.in या संकेतस्थळावर कोट केलेली निविदा अपलोड करण्याची अंतिम तारीख आणि वेळ: 15-2026-एसआरडीईएनसीओ - 10/07/2026 रोजी 15.00 वाजेपर्यंत. 16-2026-एसआरडीईएनसीओ - 08/07/2026 रोजी 15.00 वाजेपर्यंत. www.ireps.gov.in वर निविदा उघडण्याची तारीख आणि वेळ: १५-२०२६-एसआरडीईएनसीओ - 10.07.2026 रोजी 15.30 वाजता. 16-2026-एसआरडीईएनसीओ - 08/07/2026 रोजी 15.30 वाजता. भावी निविदाकारांना सल्ला दिला जातो की त्यांनी या निविदेसाठी जारी केलेले कोणतेही बदल/शुद्धिपत्रक पाहण्यासाठी निविदा बंद होण्याच्या तारखेपूर्वी वारंवार संकेतस्थळाला भेट द्यावी. संकेतस्थळ: www.ireps.gov.in

**मं.रे.व्य. (का.)**

धोकादायक आणि स्फोटक वस्तू घेऊन प्रवास करणे हा दंडनीय गुन्हा आहे. 32

**Hon. Balasaheb Thackeray Agribusiness and Rural Transformation (SMART) Project (www.smart-mh.org)**

**E-TENDER NOTICE NO 2026 DOAWB_1310016**

**CONSTRUCTION OF MAIN SHED 3400 SQ.FT KID SHED OF 1500 SQ.FT & AGREGATION SHED 3000 SQ.FT**

The Government of Maharashtra is implementing the World Bank-funded SMART Project. **MFSS Farmers Producer Company LTD Sendurwafa Tal Sakoli Dist Bhandara** is one of the beneficiaries under the project and inviting online bids on **https://mahatenders.gov.in** for above mentioned works. The estimated cost of work is **Rs. 79.79 Lakhs (Including GST).** The last date for submission of online bid is **20/07/2026 up to 2.00 PM.** Any updates or notices shall be published on aforementioned websites only.

**District Implementation Unit, SMART Project Dist.- Bhandara**

**खरेदीपूर्व जाहीर नोटीस**

तमाम लोकांस कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णन :- डि. व सब डि. सोलापूर, तालुका उत्तर सोलापूर पैकी सोलापूर शहर महानगर पालिका हद्दवाढ भागातील कसबे सोलापूर येथील जुना सर्व्हे नं. १३२ यासी नविन सव्हे नं. १३० यापैकी सुर्या नगरमधील प्लॉट नं. ९० याचे क्षेत्र ५६.४२ चौ. मीटर अथवा ६०७.00 चौ. फुट इतकी आहे. यासी चतुःसीमा :- पुर्वेस :- ७.५ मीटर रुंदीचा रस्ता, दक्षिणेस :- प्लॉट नं. ८९, पश्चिमेस :- सर्व्हे नं. १३० पैकी शिल्लक जागा, उत्तरेस :- प्लॉट नं. ९१

येणेप्रमाणे चतुःसीमेतील खुली प्लॉट जागा त्यातील तदंगभुत वस्तूंसह. ही प्लॉट जागा - लक्ष्मी नागनाथ सकीनाल, रा. घर नं. ३७/२, दत्त नगर, सोलापूर यांचे मालकीची असून त्यांनी ही मिळकत आमचे अशिलास कायम खुष खरेदीने देण्याचे ठरवून इसारा पावती लिहून दिला आहे. त्यांनी ही मिळकत निर्वेध, निजोखमी व बिनबोजाची असल्याचे खात्री व भरवसा दिला आहे. तरीही नमुद प्लॉट जागेवर कोणाचाही कसलाही गहाण, दान, बक्षिस, इसारा पावती, साठेखत, खरेदीखत, वारसा, पोटगी, टाच, बोजा, जप्ती, कोर्ट केसेस अथवा अन्य कोणत्याही स्वरुपाचा हक्क, हितसंबंध वा वाद असल्यास, त्यांनी खालील नमूद पत्यावर योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून सहा (०६) दिवसांचे आत लेखी कळवावे. मुदतीत कोणाचेही हरकत न आल्यास सदर मिळकतीवर कोणाचाही, कोणताही, कसल्याही प्रकारचा हक्क वा हितसंबंध नसल्याचे समजून अथवा त्यांनी तो जाणीवपुर्वक स्वेच्छेने सोडून दिला असे समजून आमचे अशिल ठरल्यानुसार खरेदीखत करुन घेतील. नंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही, कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून ही जाहीर नोटीस दिली असे. दि. १९/०६/२०२६

सही/-
**ॲड. प्रशांत सुदर्शन जन्नू**
**नोटरी भारत सरकार**
**५-ब, रंगराज नगर, मार्केट यार्ड मागे,**
**सोलापूर - ६, मो.नं.९२२६८९०१८१**
**अशिलातर्फे ॲडव्होकेट**

**महाराष्ट्र महसूल व वन विभाग**
**तहसीलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी कार्यालय अक्कलकोट यांच्या न्यायालयात**
**संकलन - जन्म-मृत्यू**

दूरध्वनी नं. ९४२१९६९५१६ Email- tahakkalkot@.gmail.com

जा.क्र. २०२६/जन्म-मृत्यू/कावि/१०११/२०२६ — दि. १९/०६/२०२६

**जाहिर प्रसिध्दीकरण**

**श्री. युसुफमियाँ दौलतमियाँ सय्यद** - **अर्जदार**
रा. अक्कलकोट ता. अक्कलकोट
विरुध्द
**जन्म-मृत्यू नोंदणी, कार्यालय** - **सामनेवाला**
**नगर परिषद, अक्कलकोट, ता. अक्कलकोट**

ज्याअर्थी, यातील युसुफनियाँ दौलतमियाँ सय्यद, रा. अक्कलकोट, ता. अक्कलकोट यांनी या कार्यालयाकडे अर्ज करुन त्यांची मुलगी महेविश युसुफमियाँ सय्यद हिचा जन्म दि. ०९/०४/२००८ रोजी मौजे अक्कलकोट ता. अक्कलकोट येथे राहत्या घरी झाला आहे. परंतु माझ्या मुलीच्या जन्माची नोंद हे सामनेवाला यांच्या दप्तरी आढळून आले नाही. त्यामुळे अर्जदार यांनी त्यांच्या मुलीच्या जन्माची नोंद महेविश युसुफमियाँ सय्यद या नावाने जन्म दाखला मिळण्याकामी जन्म-मृत्यू नोंदणी (दुरुस्ती) अधिनियम २०२३ चे कलम १३(२)(३) अन्वये मा. तहसिलदार अक्कलकोट यांच्या न्यायालयात दि. १८/०२/२०२६ रोजी अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर अर्जाकामी अर्जदार यांच्या मुलीच्या जन्म दाखला मिळणेकामी कोणाची हरकत अथवा म्हणणे असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात आपण स्वतः अथवा आपल्या वकिलामार्फत हजर राहून आपले लेखी म्हणणे मांडावे. मुदतीत कोणचाही काही हरकत अथवा म्हणने न आल्यास कोणाचीही हरकत नाही असे समजून या अर्जाची चौकशी होऊन अर्जदारास संबंधीत दाखला देण्यात येईल. हे आज दि. १९/०६/२०२६ रोजी आमचे सहीने व कोर्टाचे शिक्याने प्रसिध्द केले असे.

शिक्का
सही/-
**तहसीलदार, अक्कलकोट**

**खरेदीपुर्व जाहीर नोटीस**

तमाम विशेषतः डि. सोलापूर सब. डि. व ता. बार्शी पैकी बार्शी नगरपरिषद हद्दीतील व आसपासचे परिसरातील लोकांना या खरेदीपुर्व नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

१) मिळकतीचे वर्णन : डि. सोलापूर सब. डि. व ता. बार्शी पैकी बार्शी शहर नगरपरिषद हद्दीतील अकृषी/बिनशेती प्लॉट, याचा गट नं. ८७१/१/१४ याचे एकूण क्षेत्रफळ ९०.२० चौ.मी., यांसी चतुःसिमा :- पूर्वेस - प्लॉट नं. १३, दक्षिणेस - गट नं. ८७१ चे उर्वरीत क्षेत्र, पश्चिमेस - प्लॉट नं. १५ व उत्तरेस - ९ मीटर रुंदीचा रस्ता, याचे वागणूक व पाणी उत्तर बाजूचे रस्त्यास जाते व आहे. येणेप्रमाणे चतुःसिमापुर्वक वर्णनाची प्लॉट मिळकत, आतील सर्व दगड-माती, झाड-झुडुपे वगैरे तदंगभूत वस्तुंसह, मालकी, कब्जे वहिवाटीचे हक्कासह.

२) वर कलम १ मध्ये नमुद केलेली मिळकत ही सौ. ज्योती शंकर जाधव, रा. बार्शी, जि. सोलापूर यांची खरेदी मालकीची मिळकत असून, मिळकतीचे हक्कपत्रकी व रेकॉर्ड ऑफ राईटसला त्यांचे नावाची नोंद आहे. वर कलम १ मध्ये नमुद केलेली मिळकत ही सौ. ज्योती शंकर जाधव यांनी योग्य त्या बाजारभाव किंमतीस आमचे अशिल नामे श्री. नामदेव खंडु चव्हाण यांना विक्री करण्याचे ठरवून तसा वर नमुद मिळकत विक्रीबाबत उभयतांमध्ये तोंडी करार ठरलेला आहे. सदर मिळकत ही स्वतंत्र मालकी हक्काची व कब्जे, वहिवाटीची निर्वेध, निजोखमी व बिनबोजाची असल्याची खात्री मिळकत मालकाने आमच्या अशिलास दिलेली आहे व आमचे अशिलांचीही तशी खात्री झालेली आहे.

३) तरी वर नमुद मिळकतीवर कोणाचा कसलाही हक्क हितसंबध असल्यास, सदर मिळकती संदर्भाने कोणी इसार पावती, साठेखत, गहाणखत, खरेदीखत, भाडेपट्टा, दान, लिज, पोटगी, हितसंबंध, बोजा, बक्षिस, मृत्युपत्र किंवा तत्सम स्वरुपाचा दस्त केला असल्यास किंवा सदर मिळकतीवर कोणाचा बोजा असल्यास सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ०८ दिवसांच्या आत आमच्या अशिलास लेखी स्वरुपात कागदपत्रासह विधीज्ञांचे खालील नमुद पत्यावर हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध, निजोखमी व बिन-बोजाची आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. मुदतीनंतर कोणाचीही हरकत आमचे अशिलांचे खरेदी हक्कावर बंधनकारक राहणार नाही. कोणाचीही फसगत होवू नये म्हणुन ही खरेदीपुर्व जाहीर नोटीस दिली असे. दि. १९/०६/२०२६

सही/-
**अशिलातर्फे ॲडव्होकेट**
**ॲड. प्रशांत पांडुरंग एडके**
**बी.एस.एल., एलएल.एम.**
**कचेरी रोड, न्यायालयाच्या समोर,**
**खेडकर बिल्डींग, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर.**
**मो. नं. ७३८५११०१८५/९८२२८१६४७८**

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांना विशेषतः शहर सोलापूर, तालुका उत्तर सोलापूर येथील तसेच आजूबाजूच्या परिसरातील लोकांना आमच्या अशिलानी दिलेल्या अधिकार व माहिती व कागदपत्रावरुन या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, डि।। व सब डि।। सोलापूर पैकी शहर सोलापूर महानगरपालिका ग.व.सु. हद्दीतील पेठ - कुर्बान हुसेन नगर, (नवीन) उत्तर सदर बझार, सोलापूर या नावाने ओळखल्या जाणाऱ्या नगरातील घर नं. ३०२ ही मिळकत घरजागा आहे. सदरची मिळकत आमचे अशिल श्रीमती नसीमा महमद हुसेन शेख यांचे मयत पती पै. महमदहुसेन महिबुब शेख यांचे नावावर असून त्यांचे दि. ०८/१२/२०२५ रोजी सोलापूर येथे मृत्यु झालेला आहे.

सदर ठिकाणी आमचे अशिलाचे मयत पती पै. महमदहुसेन महिबुब शेख यांचे नावे घर नं. ३०२ कुर्बान हुसेन नगर, (नवीन) उत्तर सदर बझार, सोलापूर येथे १० X १० फुटांचे दोन खोल्या आहेत.

सदरहू घरजागेत आमचे अशिल श्रीमती नसीमा महमद हुसेन शेख हे त्यांचे कुटुंबासह कायमस्वरुपी मयताचे हयातीपासून राहणेस आहेत. सदरहू घर नं. ३०२ कुर्बान हुसेन नगर, सोलापूर या मिळकतीवरील मयताचे नाव कमी करुन आमचे अशिल श्रीमती नसीमा महमद हुसेन शेख यांचे नावाची वारस नोंद करणेकामी सो.म.पा.चे कर आकारणी ग.व.सु. विभागाचे दप्तरी वारस नोंद होऊन त्यांचे नांवे कर पावती मिळावे याकरिता आमचे अशिल म.न.पा.कडे अर्ज दाखल करणार आहेत.

तरी सदरहू घरजागेवर आमचे अशिला व्यतिरिक्त इतर अन्य कोणाचाही कुठल्याही प्रकारचे हक्क व अधिकार असेल अथवा इतर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध, गहाण, दान, बक्षिस, लीज, करार, मदार, टाच, जप्ती, बोजा, पोटगी, बक्षिसपत्र, खरेदीखत अगर इतर हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झालेपासून ७दिवसाचे आंत हक्काचे व अधिकाराचे लेखी कागदोपत्री पुराव्यानिशी खालील पत्यावर लेखी हरकत नोंदवावी. मुदतीत कोणाचेही कसलेही हरकत व तक्रार न आल्यास ही घरजागा निर्वेध, निजोखमी आहे असे समजून आमचे अशिल त्यांचे नावाची वारस नोंद सो.म.पा.चे कर आकारणी विभाग, ग.व. सु. विभागाचे दप्तरी त्याचे नावाची वारस नोंद करून घेतील व त्यानंतर कोणाचेही व कसल्याही प्रकारचे तक्रार व हरकतीचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

ही जाहीर नोटीस दिली तारीख : १९/०६/२०२६

सही/-
**विजय पंडीत शिंदे**
**ॲडव्होकेट बी.एस.सी, एलएल.बी.**
**पत्ता. ६६ब आदर्श नगर, कुमठा नाका,**
**अहिल्याबाई होळकर शाळेजवळ, सोलापूर-६**

**महापारेषण**
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

**चारचाकी वाहन भाडेतत्वावर पाहिजेत**

म.रा.वि.पारेषण कंपनी मर्यादित, अउदा संवसु मंडल, सोलापूर अंतर्गत पी.आय.डी. कक्ष, सोलापूर या कार्यालयास चारचाकी प्रवासी वाहतूक परवाना असलेले वाहन भाडेतत्वावर हवे आहे. सदर वाहनासाठी फक्त इंधन पारेषण कंपनी कडून पुरविले जाईल. इंधन वापरासाठी किमान सरासरी १२ (कि.मी.) प्रती लिटर अट लागू राहिल तसेच प्रती दिन १० तासानंतरच्या कामासाठी ओव्हर टाईम व मुक्कामाचा दर देण्यात येईल.

०१. वाहनाचा प्रकार : टाटा सुमो /महिंद्रा बोलेरो इत्यादी
०२. दर प्रतिदिन रु. १०५०/–
०३. ओव्हर टाईम रु. १५०/–
०४. मुक्काम भत्ता रु. २५०/–

तरी इच्छुकांनी या कार्यालयात संपर्क साधावा. वाहन मालकाने वरील प्रमाणे वाहनाचे दर व वाहनाच्या आवश्यक कागदपत्राच्या प्रमाणपत्रासह (छायांकित) बंद लिफाफ्यात या कार्यालयास दि. २९.०६.२०२६ पर्यंत किंवा तत्पूर्वी सादर करावे.

**आवश्यक कागदपत्रे (वैध) :**
०१. वैध दुकाने व संस्था परवाना/ ग्रामपंचायत दाखला.
०२. कर भरणा पावती
०३. फिटनेस दाखला
०४. प्रदूषण दाखला
०५. वाहन चालक परवाना
०६. वैध टॅक्सी परवाना
०७. आर.सी. बुक
०८. पॅनकार्ड / सेवा कर नोंदणी
०९. जी.एस.टी परवाना (If available)
१०. वैध विमा
११. सुरक्षा रक्कम भरलेली पावती (E-enquiry Fee Rs. 100/- + GST @ 18% in the name of SE EHV O&M Circle Solapur)

वाहनाचे दर पत्रक स्वीकारणे अथवा नाकारणेचे अधिकार निम्न स्वाक्षरीधारकाने राखून ठेवले आहेत.

**पत्ता:** अधीक्षक अभियंता यांचे कार्यालय, म.रा.वि.पा.कं.म., अउदा संवसु मंडल, सोलापूर, २२० कि.व्हो. बाळे उपकेंद्र आवार, अंबीकानगर, बार्शी रोड, बाळे, सोलापूर ४१३ २५५. **भ्रमणध्वनी कमांक :** ७४४७४४०६०५.

सही/–
**अधीक्षक अभियंता, अउदा संवसु मंडल, सोलापूर**



## महत्त्वाचे

### केप वर्देचा 'वोझिन्हा' जगभरात लोकप्रिय

**अटलांटा :** फिफा विश्वचषकात स्पेनविरुद्धच्या अविस्मरणीय कामगिरीनंतर केप वर्देचा गोलरक्षक 'वोझिन्हा' याची लोकप्रियता जगभरात प्रचंड वेगाने वाढली. सामना संपल्यानंतर अवघ्या काही तासांतच, या ४० वर्षीय गोलरक्षकाच्या इन्स्टाग्राम फॉलोअर्सची संख्या साधारण ४५,००० वरून थेट १ कोटी २० लाखांहून (१२ दशलक्ष) अधिक झाली. या अभूतपूर्व वाढीमुळे तो इंटरनेटवर जागतिक स्तरावर चर्चेचा विषय बनला आणि त्याच्या फॉलोअर्सची संख्या त्याच्या मायदेशातील एकूण लोकसंख्येपेक्षाही अधिक झाली.



स्पेनविरुद्धच्या ०-० अशा बरोबरीच्या सामन्याच्या शेवटी केप वर्देचा गोलरक्षक वोझिन्हा ढसाढसा रडला. कारण त्याला त्यावेळी त्याच्या आजीची आठवण झाली. स्पेनने केप वर्देच्या चिवट बचावाला भेदण्याचा प्रयत्न केला, तेव्हा वोझिन्हा खंबीरपणे गोलरक्षण केले. विश्वचषकाच्या सलामीच्या सामन्यात युरोपियन चॅम्पियन्सना विजयापासून वंचित ठेवणाऱ्या आपल्या शानदार कामगिरीनंतर, या ४० वर्षीय खेळाडूला त्याच्या सहकाऱ्यांनी गराडा घातला होता.वोझिन्हा हा केप वर्देमधील साओ व्हिसेंटे या मूळ गावचा रहिवासी आहे. त्याच्या संपूर्ण क्लब कारकिर्दीत जर्सीवरील वोझिन्हा हेच नाव राहिले आहे. वोझिन्हा हे त्याचे टोपण नाव असून त्याचे खरे नाव जोसिमार जोस एव्होरा डियास असे आहे. हे नाव त्याला त्याच्या आजी-आजोबांकडून मिळाले, त्यांच्यासोबत त्याने आपला बहुतेक वेळ घालवला, कारण त्याचे वडील सैन्यात होते आणि आई नोकरी करत होती. पोर्तुगीज भाषेत वोझिन्हाचा अर्थ लहान आजी असा होतो. ■

# मेस्सीनंतर जोनाथन डेव्हिडचीही हॅट्ट्रिक

**व्हँकुव्हर, १९ जून**

अमेरिकेत सुरू असलेल्या फिफा विश्वचषक २०२६ फुटबॉल स्पर्धेत आतापर्यंत एकापेक्षा एक रोमांचक सामने पाहायला मिळाले आहेत. शुक्रवारी झालेल्या ग्रुप बी च्या सामन्यात कॅनडाने कतारवर एकतर्फी वर्चस्व गाजविले. हा सामना कॅनडाने ६-० ने आपल्या नावावर केला. दरम्यान कॅनडाला विजय मिळवून देण्यात जोनाथन डेव्हिडने मोलाची भूमिका बजावली. त्याने या सामन्यात गोलची हॅट् ट्रिक साजरी केली, पण या सामन्यादरम्यान कॅनडा संघाला मोठा धक्का बसला. सामन्यादरम्यान संघातील प्रमुख खेळाडू इस्माईल कोने दुखापतग्रस्त झाला. त्यामुळे त्याला स्ट्रेचरच्या साहाय्याने मैदानाबाहेर नेण्यात आले. या सामन्यादरम्यान, कतारच्या २ खेळाडूंना रेड कार्ड देण्यात आले, त्यामुळे कतारला ९ खेळाडूंसह सामना खेळावा लागला. त्यामुळे कॅनडाचा दबदबा आणखी वाढला. कतारचा संघ आधीच या सामन्यात पिछाडीवर होता. त्यामुळे २ खेळाडू बाहेर होणे हे कतारसाठी मोठ्या धक्क्याहून कमी नव्हते.कॅनडाची



इतिहासाला गवसणी

कॅनडाने या सामन्यात एकूण ६ गोल केले. यासह इतिहासाला गवसणी घातली आहे. हा सामना जिंकून कॅनडाने फिफा विश्वचषक स्पर्धेच्या इतिहासातील पहिल्या विजयाची नोंद केली आहे. एकतर्फी लढतीमुळे कॅनडा संघाच्या ताफ्यात जल्लोषाचे वातावरण निर्माण झाले होते, पण इस्माईल दुखापतग्रस्त झाल्याने खेळाडूंची चिंता वाढली. कोनेला स्ट्रेचरहून बाहेर नेल्यानंतर, मदीबोला रेड कार्ड देण्यात आले. कोने ज्यावेळी मैदानाबाहेर जात होता त्यावेळी तो चाहत्यांचे आभार मानताना दिसून आला. हा कोनेचा फिफा विश्वचषक स्पर्धेतील शेवटचा सामना असू शकतो.

याआधी लिओनेल मेस्सीने आपल्या पहिल्याच सामन्यात हॅट् ट्रिक केली होती. आता जोनाथन डेव्हिड हा फिफा विश्वचषक २०२६ स्पर्धेत हॅट् ट्रिक करणारा दुसराच खेळाडू ठरला आहे. या विजयासह कॅनडाचा संघ ग्रुप बी मध्ये अव्वल स्थानी पोहोचला आहे. कॅनडाचा पुढील सामना स्वित्झर्लंड संघाविरुद्ध होणार आहे. ◂ (वृत्तसंस्था)

### जोनाथन, मेस्सी 'गोल्डन बूट'च्या शर्यतीत

**कॅनडाचा जोनाथन डेव्हिड ३ गोलसह विश्वचषक 'गोल्डन बूट'च्या शर्यतीत मेस्सीच्या बरोबरीवर आहे.सध्या सुरू असलेल्या फिफा विश्वचषकात हॅट ट्रिक साधणाऱ्या मोजक्या खेळाडूंच्या यादीत तो अर्जेंटिनाचा दिग्गज खेळाडू लिओनेल मेस्सीच्या बरोबरीने सामील झाला.कतारविरुद्धच्या सामन्यात जोनाथन डेव्हिडने २९ व्या मिनिटाला, पहिल्या सत्रातील अतिरिक्त वेळेत (४५+३) आणि पुन्हा ९०+२ व्या मिनिटाला गोल करत आपली अविस्मरणीय हॅट ट्रिक पूर्ण केली; तर काईल लारिनने १६ व्या मिनिटाला गोल करून संघाचे खाते उघडले.** ■

## आजचे सामने

**नेदरलँड्स वि. स्वीडन**
**वेळ :** शनिवारी रात्री १०:३० वाजतापासून
**स्थळ :** एनआरजी स्टेडियम, ह्युस्टन

**जर्मनी वि. आयव्हरी कोस्ट**
**वेळ :** शनिवारी रात्री १:३० वाजतापासून
**स्थळ :** बीएमओ फील्ड, टोरंटो

**इक्वेडोर वि. कुरासाओ**
**वेळ :** रविवारी पहाटे ५:३० वाजतापासून
**स्थळ :** ॲरोहेड स्टेडियम, कॅन्सस सिटी

**ट्युनिशिया वि. जपान**
**वेळ :** रविवारी सकाळी ९:३० वाजतापासून
**स्थळ :** एस्तादियो बीबीव्हीए, मॉन्टेरी

**थेट प्रक्षेपण : युनाईट ८ (झी५)**

# मेक्सिको बाद फेरी गाठणारा पहिला संघ

### दक्षिण कोरियावर १-० ने विजय

**ग्वाडलहारा, १९ जून**



लुईस रोमोचा विजयी गोल

ग्वाडलहारा स्टेडियमवर लुईस रोमोने ५० व्या मिनिटाला केलेल्या गोलच्या बळावर मेक्सिकोने दक्षिण कोरियावर १-० ने विजय नोंदवून फिफा फुटबॉल विश्वचषकाच्या अंतिम ३२च्या फेरीत प्रवेश केला. २०२६ फिफा विश्वचषकाचे सह-यजमान असलेल्या मेक्सिकोने बाद फेरीत धडक मारणारा पहिला संघ होण्याचा मान मिळवला; ही फेरी ते आपल्या मायदेशातच खेळणार आहेत.

पूर्वार्धानंतर लगेचच गोलरक्षकाकडून झालेल्या चुकीचा फायदा घेत लुईस रोमोने गोल केला आणि मेक्सिकोला 'ग्रुप ए' मधील विजेतेपद मिळवून दिले; विशेष म्हणजे, गटातील अजून एक सामना शिल्लक असतानाच त्यांनी हे स्थान निश्चित केले.

दरम्यान, मेक्सिकोचा गोलरक्षक राउल रँगेल याने सामन्याच्या अंतिम क्षणांत उत्कृष्ट 'डबल सेव्ह' करत संघाची आघाडी कायम राखली.

गटात अव्वल स्थान मिळवल्यामुळे मेक्सिकोला 'अंतिम ३२ च्या फेरी' मधील सामना आपल्याच देशात (मेक्सिको सिटीमध्ये) खेळता येईल. तिथे त्यांचा सामना तिसऱ्या क्रमांकावर असलेल्या संघाशी होईल. दक्षिण कोरिया तीन गुणांसह दुसऱ्या स्थानावर आहे, तर झेक प्रजासत्ताक आणि दक्षिण आफ्रिका प्रत्येकी एका गुणासह अजूनही स्पर्धेत टिकून आहेत.

हा अत्यंत चुरशीचा सामना होता; आम्ही इंचभरही जागा दिली नाही आणि प्रत्येक चेंडूसाठी अशा प्रकारे लढलो जणू काही तोच आमचा शेवटचा चेंडू आहे, असे मेक्सिकोचे मुख्य प्रशिक्षक जेवियर ॲग्युइरे म्हणाले. हा असा सामना होता जिथे चूक करणारा संघ हरणार होता आणि ती चूक त्यांनी केली. हा सामना विसरण्यासारखा असला, तरी त्याचा निकाल मात्र लक्षात ठेवण्यासारखा आहे. आता शेवटचा सामना कसा होतो ते पाहू आणि अंतिम ३२ च्या फेरीतील आमच्या प्रतिस्पर्ध्याची वाट पाहू. मी आनंदाने जात आहे, असेही त्यांनी नमूद केले. ◂ (वृत्तसंस्था)


# स्वित्झर्लंडने भेदली बोस्नियाची बचावफळी

### पात्रता फेरीतील आशा उंचावल्या

**लॉस एंजेलिस, १९ जून**

पर्यायी खेळाडू जोहान मंझांबीने दोन गोल करत स्वित्झर्लंडला बोस्निया आणि हर्झगोव्हिनाचा भक्कम बचाव भेदण्यास मदत केली. सामन्याच्या उत्तरार्धात चार गोल करीत स्वित्झर्लंडने ४-१ असा दणदणीत विजय मिळविला आणि विश्वचषकाच्या बाद फेरीच्या दिशेने एक पाऊल पुढे टाकले.

जोहान मंझांबीचे दोन गोल, तसेच अन्य पर्यायी खेळाडू रुबेन वर्गास व कर्णधार ग्रॅनिट झाकाने (पेनॉल्टीद्वारे) केलेल्या गोलच्या जोरावर स्वित्झर्लंडने बोस्निया आणि हर्झगोव्हिनाचा भक्कम बचाव भेदून ४-१ असा विजय साकारला.



बोस्निया आणि हर्झगोव्हिनाविरुद्ध तिसरा गोल केल्यानंतर आनंद साजरा करताना स्वित्झर्लंडचा जोहान मंझांबी

सामन्याच्या अंतिम टप्प्यात स्वित्झर्लंडने बोस्निया आणि हर्झगोव्हिनाचा प्रतिकार मोडून काढला; ७४ व्या मिनिटानंतर चार गोल करीत त्यांनी ४-१ असा निर्णायक विजय मिळविला.

बदली खेळाडू जोहान मंझांबीने दोन गोल करून सामन्याचे चित्र पालटले, तर सामन्याच्या अखेरीस तारिक मुहरमोविचला रेड कार्ड दाखवून मैदानाबाहेर पाठवण्यात आल्याने बोस्नियाची स्थिती अधिक कठीण झाली.

या विजयामुळे 'गट ब'मध्ये स्वित्झर्लंडचे चार गुण झाले आहेत. कॅनडाविरुद्धच्या अंतिम साखळी सामन्यापूर्वी, अंतिम ३२च्या फेरीमधील स्थान निश्चित करण्याच्या ते अगदी जवळ पोहोचले आहेत. ◂ (वृत्तसंस्था)


# जयस्वाल, राहुलवर लक्ष; नितीशचे पुनरागमन

**चेन्नई, १९ जून**

शनिवारी अफगाणिस्तानविरुद्ध होणाऱ्या तिसऱ्या आणि अंतिम वनडे सामन्यात, मालिका निर्भेळ विजयासह (क्लीन स्वीप) वर्चस्व कायम राखण्यासोबतच, भारताची नजर केएल राहुल आणि यशस्वी जयस्वालकडून मोठ्या धावसंख्येची अपेक्षा करण्यावर असेल.

वन-डे संघात राहुलचे स्थान कधीच धोक्यात नव्हते, मात्र जयस्वालसाठी ही एक मोठी खेळी करून, आधीच दाटीवाटी असलेल्या 'फलंदाजांच्या अव्वल फळी'मध्ये आपले स्थान पक्के करण्याची संधी असेल.

डिसेंबर २०२५ नंतर पहिल्यांदाच जयस्वालला ५० षटकांच्या फॉरमॅटमध्ये परत बोलावण्यात आले होते; मात्र लखनौ येथे अफगाणिस्तानविरुद्धच्या दुसऱ्या सामन्यात तो अवघ्या ४ धावांवर बाद झाला. या डावापूर्वी विशाखापट्टणम येथे दक्षिण आफ्रिकेविरुद्ध त्याने नाबाद ११६ धावांची खेळी केली होती, परंतु त्यानंतर ईशान किशनच्या पुनरागमनामुळे अव्वल फळीतील स्थानांसाठी आणखी एक दावेदार



यशस्वी जयस्वाल    केएल राहुल

निर्माण झाला आहे.

लखनौमधील शतकी खेळीमुळे ईशान किशनने आपली प्रतिष्ठा अधिक उंचावली आहे, तर जयस्वालला सामावून घेण्यासाठी कर्णधार शुभमन गिलने स्वतःला तिसऱ्या क्रमांकावर खेळवले. परंतु दुखापतीतून सावरल्यानंतर जेव्हा विराट कोहली संघात परत येईल, तेव्हा हा फलंदाजीचा सुपरस्टार निश्चितपणे तिसऱ्या क्रमांकाची जागा घेईल. त्यामुळे गिलकडे रोहित शर्मासोबत सलामीला परतण्याशिवाय दुसरा पर्याय उरणार नाही. किशन व श्रेयस अय्यर अनुक्रमे चौथ्या आणि पाचव्या क्रमांकावर असल्याने, जयस्वालला मिळालेल्या मर्यादित संधींचा पुरेपूर फायदा घेणे भाग आहे.


**भारत वि. अफगाणिस्तान**
**तिसरा वन-डे सामना आज**
**स्थळ :** एम. ए. चिदम्बरम् स्टेडियम, चेन्नई
**वेळ :** दुपारी १.३० वाजतापासून
**थेट प्रसारण :** स्टार स्पोर्टसवर

कोणत्याही फलंदाजासाठी ही एक कठीण आणि अस्वस्थ करणारी स्थिती आहे, मग जयस्वालसारख्या अत्यंत प्रतिभावान क्रिकेटपटूसाठी तर ती अधिकच आव्हानात्मक आहे; परंतु सध्याच्या घडीला संघाच्या संयोजनाची गुंतागुंत ही एक अत्यंत क्लिष्ट समस्या झाली आहे, या मुद्याला भारतीय संघाचे सहाय्यक प्रशिक्षक रायन टेन डोशेट यांनी दुजोरा दिला.जेव्हा खेळाडूंना मैदानात उतरण्याची संधी मिळते-मग ती 'रोटेशन' धोरणामुळे असो किंवा संघ व्यवस्थापनाने घेतलेल्या निर्णयामुळे तेव्हा त्यांना मिळालेल्या त्या मोजक्या संधींचे सोने करावेच लागते, असे त्यांनी स्पष्ट केले.

यशस्वी जयस्वालसाठी मोठी धावसंख्या उभारणे अत्यंत महत्त्वाचे आहे, कारण इंग्लंड दौऱ्यावरील तीन सामन्यांच्या मालिकेसाठी भारताचा एकदिवसीय संघ लवकरच जाहीर होणार आहे, त्यामुळे जयस्वालला स्वतःचे नशीब स्वतःच घडवावे लागेल.

राहुलची परिस्थिती मात्र पूर्णपणे वेगळी आहे. दीर्घ काळानंतर श्रेयस अय्यरचे भारतीय संघात पुनरागमन झाल्यामुळे, ३४ वर्षीय राहुलला आता प्रामुख्याने सहाव्या क्रमांकावर फलंदाजी करावी लागेल. बऱ्याच काळापासून पाचवा क्रमांक हे राहुलसाठी अत्यंत सोयीचे आणि यशस्वी स्थान राहिले आहे. ◂ (वृत्तसंस्था)

### राणाचे पुनरागमन, पण नितीश खेळणार



हर्षित राणा

बीसीसीआयच्या 'सेंटर ऑफ एक्सलन्स'मध्ये पुनर्वसन प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर हर्षित राणाचा चेन्नई वन-डेसाठी भारतीय संघात समावेश करण्यात आला आहे; मात्र तो या सामन्यात खेळण्याची शक्यता कमी आहे. कारण, या मालिकेत आतापर्यंत दोन सामने खेळलेल्या अर्शदीप सिंगच्या जागी अष्टपैलू खेळाडू नितीश रेड्डीला संधी मिळण्याची शक्यता आहे.दुसरीकडे, अफगाणिस्तान या मालिकेत आतापर्यंत लाल चेंडू आणि पांढऱ्या चेंडूच्या दोन्ही प्रकारांमध्ये पूर्णपणे निष्प्रभ ठरला आहे. जर विजय मिळवता आला नाही, तर अधिक झुंजार वृत्ती दाखवून या मालिकेचा शेवट करण्यास ते उत्सुक असतील. परंतु त्यासाठी, पाहुण्या संघाला फलंदाजी आणि गोलंदाजी या दोन्ही विभागांमध्ये अधिक धमक दाखवावी लागेल. ■




# वेस्ट इंडीजचा दुसरा विजय

**लीड्स, १९ जून**

आयसीसी महिला टी-२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत झालेल्या चुरशीच्या साखळी सामन्यात स्टेफनी टेलरची (नाबाद ४७) आणि मध्यम गती गोलंदाज आलिया ॲलेन व फिरकीपटू हिली मॅथ्यूजच्या प्रभावी माऱ्याच्या बळावर वेस्ट इंडिजने स्कॉटलंडवर अवघ्या ७ धावांनी रोमहर्षक विजय नोंदविला. वेस्ट इंडीजचा हा या स्पर्धेतील दुसरा विजय ठरला.

स्टेफनी टेलर आणि फिरकीपटूंच्या मदतीने वेस्ट इंडीजने स्कॉटलंडचे आव्हान परतवून लावले. वेस्ट इंडीजने २० षटकांत ६ बाद १५३ धावा नोंदविल्या आणि स्कॉटलंडसमोर विजयासाठी १५४ धावांचे लक्ष्य ठेवले, परंतु त्यांना मर्यादित षटकांत सर्वबाद १४६ धावाच काढता आल्या. स्टेफनी टेलर सामनावीर पुरस्काराची




मानकरी ठरली, परंतु स्कॉटलंडच्या डार्सी कार्टरचे अर्धशतक व्यर्थ ठरले.

प्रथम फलंदाजी करताना वेस्ट इंडीजची सुरुवात डळमळीत झाली. सामन्याच्या १५ व्या षटकापर्यंत वेस्ट इंडीजची अवस्था ५ बाद ८५ धावा अशी झाली होती. अशा कठीण परिस्थितीत, स्पर्धेतील आपला पहिलाच सामना खेळणाऱ्या स्टेफनी टेलरने केवळ १९ चेंडूंत ४ चौकार व ३ षट्कारांसह नाबाद ४७ धावांची खेळी करत संघाच्या डावाला आवश्यक ती गती दिली. धावांचा पाठलाग करताना स्कॉटलंडची सलामीवीर डार्सी कार्टरने पायाच्या दुखापतीची तमा न बाळगता दमदार अर्धशतक झळकावून स्कॉटलंडच्या विजयाच्या आशा पल्लवीत केल्या. २१ वर्षीय डार्सी कार्टरने ६२ चेंडूंत ८ चौकारांच्या मदतीने ५९ धावांची खेळी केली, परंतु स्कॉटलंडचे इतर फलंदाज नियमित अंतराने तंबूत परतले व त्यांचा संपूर्ण संघ २० षटकांत १४६ धावांतच बाद झाला. ◂ (वृत्तसंस्था)

### आजचे सामने

**ऑस्ट्रेलिया वि. नेदरलँड्स**
**स्थळ :** साऊदम्पटन
**वेळ :** दुपारी ३.०० वाजतापासून

**बांगलादेश वि. पाकिस्तान**
**स्थळ :** साऊदम्पटन
**वेळ:** सायंकाळी ७.०० वाजतापासून

**इंग्लंड वि. स्कॉटलंड**
**स्थळ :** लीड्स
**वेळ :** रात्री ११.०० वाजतापासून
**थेट प्रसारण :** स्टार स्पोर्टसवर

# भारताची गोलंदाजी कमकुवत : मिताली राज

**नवी दिल्ली, १९ जून**

भारतीय महिला संघाचा गोलंदाजी विभाग कमकुवत असल्याचे दिसत आहे, गोलंदाजी विभागात 'भूमिकांची स्पष्टता' असणे गरजेचे आहे, असे मत महिला क्रिकेट संघाची माजी कर्णधार आणि दिग्गज फलंदाज मिताली राजने व्यक्त केले. इंग्लंडमध्ये सुरू असलेल्या आयसीसी महिला टी-२० विश्वचषकातील महत्त्वाच्या सामन्यांच्या पृष्ठभूमीवर ही चिंतेची बाब आहे.

भारताने टी-२० विश्वचषकातील आपल्या मोहिमेची सुरुवात दमदारपणे केली आणि 'पूल ए' मधील पहिल्या दोन सामन्यांत कट्टर प्रतिस्पर्धी पाकिस्तान व नेदरलँड्सचा पराभव केला. मात्र, हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखालील संघासमोर आता कठीण आव्हाने आहेत; रविवारी दक्षिण आफ्रिकेविरुद्ध आणि त्यानंतर २८ जून रोजी ऑस्ट्रेलियाविरुद्ध सामने होणार आहेत. या दरम्यान, २५ जून रोजी भारत बांगलादेशविरुद्ध खेळणार आहे. मात्र, उजव्या हाताची ऑफ-स्पिनर श्रेयंका पाटील घोट्याच्या दुखापतीमुळे विश्वचषकातून बाहेर पडली आहे आणि वेगवान गोलंदाजीचा विभाग तुलनेने कमकुवत व वाईट फॉर्ममध्ये आहे; त्यामुळे गोलंदाजी हा भारताचा सर्वात कमकुवत दुवा असल्याचे मितालीला वाटते.

गोलंदाजीच्या पहिल्या सहा षटकांत, जो कोणी गोलंदाजी करत असेल, त्याने आम्हाला महत्त्वाचे बळी मिळवून द्यावेत अशी माझी अपेक्षा असते, असे ती म्हणाली. गत दोन-तीन मालिकांमध्ये आम्हाला तसे पाहायला मिळाले नाही. संघात काशवी गौतम आणि अमनजोत कौर यांची उणीव भासत असली, तरी उपलब्ध संसाधनांचा वापर करून सुरुवातीच्या काही षटकांतच प्रतिस्पर्ध्यांना धक्के देणे गरजेचे आहे. जेव्हा तुम्हाला सुरुवातीलाच बळी मिळतात, तेव्हा फलंदाजी करणाऱ्या संघावर दबाव निर्माण होतो, असे ती म्हणाली. ◂ (वृत्तसंस्था)

# श्रीलंका 'अ' संघ १०३ धावांनी विजयी

### भारत 'अ' संघाविरुद्ध रविवारी अंतिम सामना

**डाम्बुला, १९ जून**

श्रीलंका तिरंगी मालिकेतील अखेरच्या साखळी सामन्यात अविष्का फर्नांडोने झळकावलेल्या शतकाच्या बळावर यजमान श्रीलंका 'अ' संघाने अफगाणिस्तान 'अ' संघावर १०३ धावांनी दणदणीत विजय नोंदविला आणि मालिकेच्या अंतिम फेरीत स्थान मिळविले. अविष्का फर्नांडो सामनावीर पुरस्काराचा मानकरी ठरला. आता रविवारी भारत 'अ' संघ आणि श्रीलंका 'अ' संघ यांच्यादरम्यान मालिकेचा अंतिम सामना खेळला जाणार आहे. रंगिरी डाम्बुला क्रिकेट स्टेडियमवर श्रीलंका 'अ' संघाने ५० षटकांत ८ बाद ३२२ धावा उभारल्या आणि अफगाणिस्तान 'अ' संघासमोर विजयासाठी ३२३ धावांचे लक्ष्य ठेवले.

अफगाणिस्तानने नाणेफेक जिंकून श्रीलंका अ संघाला प्रथम फलंदाजीसाठी पाचारण केले. निरोशन डिकवेला व अविष्का फर्नांडोने १३३ धावांची सलामी भागीदारी करीत श्रीलंकेला चांगली सुरुवात करून दिली. फरीदून दाऊदझाईच्या गोलंदाजीला बळी पडण्यापूर्वी निरोशन डिकवेलाने ५४ चेंडूंत १२ चौकारांच्या मदतीने ६६ धावा केल्या. अविष्का फर्नांडोने ९७ चेंडूंत १३ चौकार व एका षट्कारसह ११० धावांची शतकी खेळी केली. नुवानिंदू फर्नांडोने ७० चेंडूंत ४ चौकारांसह ४५ धावांची भर घातली. अफगाणिस्तानचा सलामीवीर हसन एसाखिलने ७४ धावांचे, तर पाचव्या क्रमांकावरील फैसल शिनोझादाने ३५, तर फरमानुल्लाहने ४३ धावांचे योगदान देऊन अफगाणिस्तानला विजय मिळवून देण्यासाठी कसोशीने प्रयत्न केले, परंतु इतर फलंदाज श्रीलंकेच्या गोलंदाजांसमोर टिकाव धरू शकले नाही. ◂ (वृत्तसंस्था)

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



# सांगोल्यातील भारनियमनावर निघणार तोडगा

**माजी आ. दीपकआबा साळुंखे-पाटील यांच्या इशाऱ्यानंतर महावितरण अधिकारी शेतकऱ्यांच्या भेटीला**

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.१९ जून-**

सांगोला शहर आणि तालुक्यातील भारमनियमन बंद करण्याबाबत माजी आ.दिपकआबा साळुंखे पाटील आणि शेतकऱ्यांच्या शिष्टमंडळांसोबत शुक्रवार दि.१९ जून रोजी सांगोला येथील महावितरणच्या कार्यालयात बैठक पार पडली. त्यानंतर भारनियम नावर तोडगा निघण्याची शक्यता आहे.

बैठकीत महावितरण कंपनीचे कार्यकारी अभियंता मधुकर साळवे यांनी सकाळी ६ ते १० आणि रात्री ६ ते १० या वेळेत विजेचे भारनियमन होणार नाही. शेतीपंपासाठी पूर्ण क्षमतेने ८ तास वीजपुरवठा केला जाईल असे आश्वासन दिले. सांगोला शहर आणि तालुक्यातील वाढत्या भारनियमनामुळे शेतकरी आणि पशुपालक चिंतेत होते. या पार्श्वभूमीवर सोमवार दि.१५ जून रोजी दिपकआबा साळुंखे पाटील यांनी थेट महावितरणच्या कार्यालयात धडक दिली होती. शेतकरी आणि पशुपालकांसाठी जाचक असणारे भारनियमन त्वरित रद्द करा अन्यथा थेट वीज वितरण कंपनीच्या कार्यालयाला टाळे ठोकू असा इशारा दिला होता. यावेळी वीज वितरण कंपनीचे कार्यकारी अभियंता मधुकर साळवे आणि कार्यकारी अभियंता शिंदे यांनी सांगोला येथे येऊन सदरचा प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन दिले होते.



**कमी भाराची उपकरणे वापरावीत**

सकाळी आणि रात्री सहा ते दहा या वेळेत महावितरण कंपनीवर किंवा यंत्रणेवर जास्तीचा भार येणार नाही अशी उपकरणे ग्राहकांनी चालवावी. शेतकरी ग्राहकांनी प्रशासनाला सहकार्य करावे आम्ही निश्चित तुमच्या सेवेसाठी तत्पर राहू.

**- मधुकर साळवे, कार्यकारी अभियंता, महावितरण पंढरपूर विभाग**

आश्वासनानुसार शुक्रवार दि.१९ रोजी ते सांगोला येथील महावितरणच्या कार्यालयात आले. यावेळी बोलताना दिपकआबा साळुंखे पाटील यांनी महावितरण कंपनी आणि ग्राहक यांनी परस्परात समन्वय आणि संवाद ठेवण्याचे आवाहन केले. तसेच शेतकरी आणि पशुपालकांनीही महावितरण कंपनीच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना सहकार्य करण्याची विनंती केली. यावेळी साळवे यांनी हे आश्वासन दिले.

यावेळी तानाजी पाटील, शिवाजी बनकर, विजय येलपले, विजय पवार, चंद्रकांत चौगुले, चंद्रकांत कारंडे, सोमनाथ लोखंडे, सूर्याजी खटकाळे, ज्ञानेश्वर शिंदे, शेतकरी व महावितरणचे सर्व अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

## ▶▶ महत्वाचे...



## एसपीएम स्कूलमध्ये क्रीडो लॅबचे उद्घाटन

**सोलापूर, दि. १९ जून-**

एस.पी.एम. इंग्लिश स्कूल, सोलापूर येथे पूर्व प्राथमिक विभागासाठी नव्याने उपलब्ध करून देण्यात आलेल्या क्रीडो लॅबचे उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमास शिक्षण प्रसारक मंडळी, पुणेचे नियामक मंडळाचे अध्यक्ष सुधीर काळकर, शाळेचे स्थानिक व्यवस्थापन समिती अध्यक्ष तथा नियामक मंडळ सदस्य अनिल बर्वे , शाळेचे स्थानिक व्यवस्थाप समिती चे सदस्य व नियामक मंडळ सदस्य तुषार कुलकर्णी, सुरेशबाबू मंकणी तसेच शाळेचे माजी अध्यक्ष मा. राजेशजी पटवर्धन यांची प्रमुख उपस्थिती लाभली. मान्यवरांचे स्वागत व सत्कार शाळेच्या प्राचार्या संगीता कोळी यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी सुधीर काळकर यांनी उपस्थितांना संबोधित करताना सांगितले की, एस.पी.एम. इंग्लिश स्कूल ही केवळ शिक्षण देणारी संस्था नसून विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भवितव्याची भक्कम पायाभरणी करणारे ज्ञानमंदिर आहे. संस्कार, प्रगती आणि मानवता या त्रिसूत्रीवर आधारित शिक्षणपद्धतीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी संस्था सातत्याने प्रयत्नशील आहे. क्रीडो ही २ ते ८ वर्षे वयोगटातील मुलांसाठी विकसित करण्यात आलेली Play-Based आणि Amctivity-Based Learning पद्धत असून, खेळ, कृती, शैक्षणिक साहित्य आणि प्रत्यक्ष संवेदनात्मक अनुभवांच्या माध्यमातून मुलांना शिकण्याची आनंददायी संधी उपलब्ध करून देते. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये भाषा, गणित, विचारशक्ती, सर्जनशीलता तसेच सामाजिक कौशल्यांचा भक्कम पाया निर्माण होण्यास मदत होणार आहे.

## चालकाला मारहाण करून ४३ पोती कांद्यासह जीप लंपास

**सापटणे हद्दीत महामार्गावर धक्कादायक प्रकार**

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि. १९ जून-**

माढा तालुक्यातील सापटणे हद्दीत पुणे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर मध्यरात्रीच्या सुमारास धक्कादायक चोरी व मारहाणीची घटना घडली. तीन अनोळखी इसमांनी चालक व मालकाला मारहाण करून तब्बल १० लाख ३४ हजार ३५० रुपयांचा मुद्देमाल लंपास करण्यात आला.

शिवाजी नामदेव नांदे (वय ४५, रा. मदनवाडी, ता. इंदापूर, जि. पुणे) हे कांद्याचा माल घेऊन पिकअप वाहनातून प्रवास करत होते. १८ जून रोजी मध्यरात्री १२.०५ वाजण्याच्या सुमारास सापटणेच्या शिवारात राजस्थान ढाब्यापुढे सुमारे तीन किलोमीटर अंतरावर पुणे-सोलापूर हायवेवर ही घटना घडली. फिर्यादीनुसार, पाठीमागून मोटारसायकलवर आलेल्या अंदाजे २५ ते ३० वर्षे वयोगटातील तीन अनोळखी इसमांनी पिकअप वाहन अडवले. त्यांनी चालक खादीर मोहंमद (वय ४३, रा. हादनूर, जि. संगारेड्डी, तेलंगणा) याला गाडी नीट चालविता येत नाही का? असे विचारत वाहन थांबवले. त्यानंतर चालकास तसेच फिर्यादीस मारहाण केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

घटनेत आरोपींनी ४३ पोती कांदा (प्रत्येकी ५० किलो) - एकूण २१५० किलो. किंमत अंदाजे ३२,२५० रुपये, पांढऱ्या रंगाची महिंद्रा बोलेरो जीप - किंमत अंदाजे १० लाख रुपये, मोबाईल फोन - किंमत अंदाजे २ हजार रुपये, चालकाची कागदपत्रे असलेली बॅग - किंमत अंदाजे १०० रुपये असा एकूण १०,३४,३५० रुपयांचा मुद्देमाल लंपास केला. या प्रकरणी टेंभुर्णी पोलिस ठाण्यात गुरुवारी दि. १८ जून रोजी गुन्हा दाखल झाला आहे. प्रकरणाचा तपास पोलिस उपनिरीक्षक संदेश बावकर यांच्या मार्गदर्शनाखाली हेड कॉन्स्टेबल नलावडे करत आहेत.

## टेंभुर्णी परिसरात अपघातात एकाचा मृत्यू; वाहनचालकावर गुन्हा

**टेंभुर्णी, दि. १९ जून-**



टेंभुर्णी गावाच्या शिवारातील जुन्या सोलापूर-पुणे महामार्गावर झालेल्या अपघातात एका व्यक्तीचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. या प्रकरणी वाहन चालकावर टेंभुर्णी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. रमेश गायकवाड (वय ५७, रा. अकोले बुद्रुक, ता. माढा) यांनी याप्रकरणी तक्रार दिली आहे. आरोपी म्हणून धर्मा नारायण आवचारे (रा. पेनूर, ता. मोहोळ) यांचे नाव नमूद केले आहे. ही घटना ८ जून रोजी सायंकाळी साडेसात वाजण्याच्या सुमारास टेंभुर्णी गावच्या हद्दीतील जुना सोलापूर-पुणे महामार्गावरील लक्ष्मी पार्क हॉटेलसमोर घडली. महेश ओहोळ (वय ३५, रा. पालवण, ता. माढा) व धर्मा आवचारे हे टेंभुर्णी येथील काम आटोपून दुचाकीवरून घरी परतत होते. कट पॉईंटवर अचानक एस.टी. बस सोलापूरच्या दिशेने वळल्याने महेश ओहोळ यांनी दुचाकीला (एमएच १२ एमएम ९५३६) अचानक ब्रेक लावला. त्याचवेळी मागून येणाऱ्या धर्मा आवचारे यांच्या दुचाकीची (एमएच ४५ एडब्ल्यू ८५३४) त्यांच्या वाहनाला जोरदार धडक बसली. या अपघातात महेश ओहोळ यांच्या डोक्याला व छातीला गंभीर दुखापत झाली. तोंडातून रक्तस्त्राव झाल्याने त्यांना उपचारासाठी दाखल केले होते; मात्र उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. धर्मा आवचारे यांना किरकोळ दुखापत झाली असून दुचाकीचे सुमारे तीन हजार रुपयांचे नुकसान झाल्याचे फिर्यादीत नमूद आहे. घटनेचा तपास पोहेकॉ जगताप करीत आहेत.

## रेल्वेत नोकरीचे आमिष दाखवून ७० हजारांची फसवणूक

**लग्नाचे आश्वासन, सरकारी अधिकारी असल्याचा दावा; पैसे घेतल्यानंतर धमक्या**

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १९ जून-**

बार्शी शहरातील एका महिलेची रेल्वे विभागात सरकारी नोकरी लावून देण्याचे आमिष दाखवत ७० हजार रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी, मयूर हणुमंत काटे (रा. कारुंडे, ता. माळिशरस) याच्याविरुद्ध बार्शी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत जास्मीन वजीर शेख (वय ३९, रा. नाळे प्लॉट, बार्शी) यांनी बार्शी शहर पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती. या तक्रारीची चौकशी झाल्यानंतर सहाय्यक संचालक व सरकारी अभियोक्ता कार्यालय, सोलापूर तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, बार्शी यांच्या पत्रानुसार वरिष्ठांच्या आदेशावरुन गुन्हा दाखल करण्यात आला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी महिला बार्शी शहर पोलीस ठाण्यासमोर ऑनलाइन सर्व्हिस सेंटर चालवतात. डिसेंबर २०२५ मध्ये एका व्यवहारादरम्यान आरोपीचा त्यांच्याशी संपर्क आला. सुरुवातीला आरोपीने स्वतःला रेल्वे विभागातील सरकारी अधिकारी असल्याचे सांगून अनेकांना नोकरी मिळवून दिल्याचा दावा केला. त्यानंतर त्याने फिर्यादी महिलेशी वारंवार संपर्क साधत लग्नाची इच्छा व्यक्त केली तसेच त्यांचे भले करण्यासाठी रेल्वेत नोकरी लावून देण्याचे आश्वासन दिले. फिर्यादींचा विश्वास संपादन करण्यासाठी आरोपीने स्वतःचे आधारकार्ड, पॅनकार्ड व छायाचित्रदेखील पाठवले. त्यानंतर टेंभुर्णी येथे प्रत्यक्ष भेट घेऊन कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती आणि रोख ५ हजार रुपये घेतले. तसेच विविध कारणे सांगत वेळोवेळी ऑनलाइन स्वरुपात आणखी ६५ हजार रुपये घेतल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. अशा प्रकारे आरोपीने एकूण ७० हजार रुपयांची रक्कम घेतल्याचा आरोप आहे. दरम्यान, नोकरीबाबत कोणताही पुरावा न देता आरोपीकडून आणखी पैशांची मागणी सुरुच राहिली. त्यामुळे फिर्यादीनी दिलेली रक्कम परत मागितली असता आरोपीने अश्लील व शिवीगाळ करणारी भाषा वापरुन धमकावल्याचा आरोप आहे. तसेच पोलिसांत तक्रार दिल्यास समाजात बदनामी करण्याची धमकी दिल्याचेही फिर्यादींनी म्हटले आहे. या प्रकरणी बार्शी शहर पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरु आहे.

## पिलीव परिसरात शेळ्या चोरीचे सत्र सुरुच

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. १९ जून-**

माळिशरस तालुक्यातील पिलीव परीसरात शेळ्या चोरीचे सत्र सुरुच आहे. गेल्या एक, दोन वर्षांपासून पिलीव परिसरात मोठ्या प्रमाणात शेळयांची चोरी झाली आहे. मात्र याचा छडा काही केल्या लागलाच नाही. १७ जून रोजी सोमनाथ मोरे यांच्या दोन तसेच काळे यांच्या चार अशा सहा शेळयांची चोरी झाली आहे.

जवळपास एक लाख २० हजारांच्या शेळयांची मंगळवारी आठवडा बाजाराचा दिवशीच चोरी झाल्यामुळे सध्या पिलीव परिसरात पुन्हा एकदा शेळयांची चोरी करणारी टोळी सक्रिय झाली आहे. सोमनाथ मोरे यांनी शेळ्या चोरीची रितसर तक्रार पिलीव पोलिस ठाण्यात झाली आहे. सध्या शेळीपालकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले असून पोलिस प्रशासनापुढे चोरीचा छडा लावण्याचे मोठे आव्हान निर्माण झाले आहे.

## १७ वर्षीय अल्पवयीन मुलीचे अपहरण; एकाविरुध्द पांगरी पोलिसांत गुन्हा दाखल

**बार्शी, दि.१९ जून-**

बार्शी तालुक्यातील एका गावातून १७ वर्षे ७ महिने वयाच्या एका अल्पवयीन मुलीला अज्ञात इसमाने अज्ञात कारणासाठी फूस लावून पळवून नेल्याची गंभीर घटना घडली आहे. याप्रकरणी पीडित मुलीच्या वडिलांनी दिलेल्या तक्रारीवरून पांगरी पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी हे आपल्या कुटुंबासह बार्शी तालुक्यातील एका गावात राहतात आणि शेती करुन आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. बुधवार, दि. १७ जून २०२६ रोजी रात्रीच्या सुमारास संपूर्ण कुटुंब जेवण करुन नेहम ीप्रमाणे झोपी गेले होते. त्यानंतर गुरुवार, दि. १८ जून २०२६ रोजी मध्यरात्री २ वाजण्याच्या सुमारास मुलीचे वडील जागे झाले असता, त्यांना घराचा दरवाजा उघडा असल्याचे निदर्शनास आले. त्यांनी घरात पाहिले असता, त्यांची १७ वर्षे ७ महिने वयाची मोठी मुलगी तिच्या जागेवर मिळून आली नाही. मुलीचा घरात आणि परिसरात शोध घेतल्यानंतरही ती मिळून आली नाही. कुटुंबाने तात्काळ नातेवाईकांकडे आणि आसपासच्या गावांमध्ये शोध घेतला, मात्र तिचा कुठेही पत्ता लागला नाही. अखेर तिला कोणीतरी अज्ञात इसमाने कायदेशीर रखवालीतून फुस लावून पळवून नेल्याची खात्री पटल्यानंतर, वडिलांनी पांगरी पोलीस ठाण्यात कायदेशीर तक्रार दाखल केली. पांगरी पोलिसांनी या प्रकरणी अज्ञात आरोपीविरुद्ध अपहरणाचा गुन्हा दाखल केला असून, पोलीस या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत. बेपत्ता अल्पवयीन मुलीचा शोध घेण्यासाठी पोलिसांची पथके रवाना करण्यात आली असून परिसरातील संशयितांची चौकशी सुरु आहे.

## कर्मचारी वर्गांना आरोग्यविषयक प्रशिक्षण महत्वाचे

**डॉ. पृथ्वीराज माने; कोंडी प्राथमिक आरोग्य केंद्रात जन आरोग्य समिती बैठक**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ जून-**

भारत हा विकसनशील देश असून रुग्णसेवा ही ईशसेवा समजून आरोग्य विभागातील सर्व कर्मचारी काम करतात त्यांना आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती मिळण्यासाठी प्रशिक्षण महत्वाचे असल्याचे जिल्हा परिषद सदस्य डॉ. पृथ्वीराज माने यांनी सांगितले.

कोंडी (ता.उत्तर सोलापूर) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात आरोग्य कर्मचारी आशा सेविका प्रशिक्षण समारोप कार्यक्रमात बोलत होते. यावेळी तालुका आरोग्य अधिकारी डॉ.चंद्रकांत ऐवळे, वैद्यकीय अधिकारी सुभाष कांबळे, प्रशिक्षीका डॉ. श्रीमती झाड, डॉ. शेगर, डॉ. जानकर, डॉ. धोत्रे, डॉ. घोडके, संवेदना प्रकल्प समन्वयक संतुलन अधिकारी डॉ. सारिका सोनवले उपस्थित होते.



खासगी हॉस्पिटलपेक्षा प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्रात चांगल्या सुविधा असून रुग्णांना वेळेत उपचार,परिसर स्वच्छता, पुरेसा कर्मचारी वर्ग,आवश्यक औषधे देणे आवश्यक असल्याचे डॉ. माने यांनी सांगितले.

**जनआरोग्य समिती बैठक संपन्न**

कोंडी प्राथमिक आरोग्य केंद्र अंतर्गत जन आरोग्य समितीची बैठक जिल्हा परिषद सदस्य तथा समितीचे पदसिद्ध अध्यक्ष डॉ पृथ्वीराज माने यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. यावेळी तालुका आरोग्य अधिकारी डॉ. ऐवळे, सदस्य सचिव डॉ. सुभाष कांबळे, सदस्य एस.पी. फाळके, सुनिल जाधव, गणेश भोसले, सुधिर नवगिरे, विनोद पेंडपाले, सचिन ढेपे, ज्ञानोबा साखरे, परिणिता शिंदे उपस्थित होते. यावेळी आरोग्य केंद्रात अंतर्गत व बाह्य स्वच्छता ठेवणे, सीसीटीव्ही बसवणे, सोलर पॅनल बसवणे या सुविधा देण्यासंदर्भात पाठपुरावा करू, मात्र रुग्णाला वेळेत सेवा देणे ही कर्मचाऱ्याची जबाबदारी असून वेळेचे बंधन पाळा, रुग्णाची कसलीही तक्रात चालणार नाही असे डॉ. माने यांनी सांगितले.

## फॅबटेकमधील ३ विद्यार्थ्यांची डॅना टीएम ४ इंडिया कंपनीत निवड

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. १९ जून-**

फॅबटेक टेक्निकल कॅम्पस कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड रिसर्च, सांगोला येथील मेकॅनिकल विभागातील दिगंबर कोळेकर, पृथ्वीराज बैस आणि चेतन सावंत या विद्यार्थ्यांची पुणे येथील डॅना टीएम४ इंडिया प्रा.लि कंपनीत कॅम्पस प्लेसमेंट मधून निवड झाली असल्याची माहिती उपप्राचार्या डॉ.विद्याराणी क्षीरसागर यांनी दिली.



ही कंपनी ऑटोमोबाईल, व्यावसायिक वाहने, ऑफ-हायवे वाहने, रेल्वे, मोटरस्पोर्ट्स आणि मनोरंजनात्मक वाहनांसाठी उपयुक्त अशा लो-व्होल्टेज आणि हाय-व्होल्टेज इलेक्ट्रिक मोटर्स, पॉवर इलेक्ट्रॉनिक्स आणि कंट्रोल सिस्टीम्स यांचे डिझाइन व उत्पादन करते. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी जागतिक तंत्रज्ञान क्षेत्राकडे टाकलेले हे आत्मविश्वासपूर्ण पाऊल असून फॅबटेकचे विद्यार्थी उद्योगविश्वात आपला ठसा उमटवत आहे. प्राचार्य डॉ.रविंद्र शेंडगे, उपप्राचार्या डॉ.विद्याराणी क्षीरसागर, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर प्रा.धनंजय शिवपुजे, मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभाग प्रमुख प्रा.राहूल औताडे यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## प्रामाणिक प्रयत्नच यशापर्यंत नेतात : तहसीलदार भागवत

**सांगोला विद्यामंदिर येथे गुणवंतांचा सन्मान**

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. १९ जून-**

प्रबळ इच्छाशक्ती, अथक परिश्रम व आत्मविश्वास या त्रिसूत्रीवर यश अवलंबून असून आई-वडिलांच्या कष्टाला योग्य न्याय देण्यासाठी विद्यार्थ्यांनी सातत्यपूर्ण प्रयत्न करणे आवश्यक आहे. ध्येयवेडे होऊन सर्वोत्तम बनण्याचा प्रयत्न केल्यास यशाचे शिखर निश्चितपणे गाठता येते असे प्रतिपादन सांगोला तहसीलदार बाळूताई भागवत यांनी केले.

त्या सांगोला विद्यामंदिर मध्ये इयत्ता दहावीच्या बोर्ड परीक्षेमध्ये ९० टक्के पेक्षा जास्त गुण मिळवणारे विद्यार्थी व पालक यांच्या सत्कार सोहळ्यामध्ये प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होत्या. कार्यक्रम प्रारंभी गुरुवर्य कै.बापूसाहेब झपके यांच्या तैलचित्रास तहसीलदार बाळूताई भागवत यांच्या हस्ते पुष्पहार समर्पित करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष प्रा.प्रबुद्धचंद्र झपके उपस्थित होते. यावेळी विद्यार्थ्यांनी सिद्धी उकळे, पालक सचिन गायकवाड, बाळराजे सावंत यांनी मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी संस्था सचिव म.शं.घोंगडे, सदस्य विश्वेश झपके, नाझरा विद्यामंदिरचे मुख्याध्यापक अमोल गायकवाड, उपमुख्याध्यापक प्रदीप धुकटे, उपप्राचार्य शिवशंकर तटाळे, पर्यवेक्षक उत्तम सरगर, काकासो नरूटे उपस्थित होते. यावेळी संस्थेच्या वतीने ९५ टक्के पेक्षा अधिक गुण प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांना १ हजार रु.याप्रमाणे २७ हजार, गणित विषयांमध्ये पैकीच्या पैकी गुण मिळवणाऱ्या ७ विद्यार्थ्यांना गणित शिक्षक शिवाजी चौगुले यांच्या वतीने ५०० रु.प्रमाणे ३ हजार ५०० तसेच टेक्निकल मध्ये प्रथम आणि द्वितीय क्रमांक मिळवणाऱ्या विद्यार्थ्याला उत्तम सोनलकर यांच्याकडून ५०० रु.प्रमाणे १ हजार रू.चे रोख पारितोषिक देण्यात आले. प्रास्ताविक मुख्याध्यापक चारुदत्त जगताप, सूत्रसंचालन प्रशांत रायचुरे यांनी केले. आभार पर्यवेक्षिका शुभांगी घोंगडे यांनी मानले.



या विद्यार्थ्यांचा पालकांसह झाला सन्मान

सिद्धी उकळे, अर्जुन सावंत, जिज्ञासा घाडगे, दिग्विजय पवार, सुकन्या दिघे, यशस्वी गायकवाड, सृष्टी झरे, वेदांगी नीलकंठ, शामल आलदर, दिशा गायकवाड, शिवानी दिवसे, विश्वजीत जाधव, सानवी माने, सार्थक बुरुंगले, अथर्व खटकाळे, अस्मिता काशीद, श्रावणी चव्हाण, ओंकार मेनकुदळे, साक्षी घोंगडे, प्रतिक्षा जानकर, सिद्धी कोकरे, संस्कृती जाधव, अनुष्का बनसोडे, वेदांत खबाले, श्रेया काशीद, प्रणिती जाधव, विश्वजा गायकवाड, प्रांजली बनकर, उत्कर्ष लवटे, संस्कृती बिले, श्रेया जाधव, सृष्टी वाघमारे, स्वरूप इंगोले, अथर्व माने, अक्सा बागवान, शर्वरी पाटणे, प्रतीक नलावडे, गार्गी सोडळ, श्रावणी लिंगे, रणजीत सरगर, सनलिट नवले, भक्ती कदम, साक्षी देवकते, प्रसाद जाधव, प्रणाली दवंडे, अनुष्का आहेरकर, अमृता राऊत, श्रीयश स्वामी, सिया बागवान, उत्कर्ष खरात, प्रतीक्षा लेंडवे, आयुष शिंदे, अथर्व नवले, ओम कोकरे, अर्पिता अरबळी, सोहम वाघमोडे, श्रद्धा क्षीरसागर, श्रवण वस्त्रद, संस्कार इंगोले, स्नेहल दिघे, अपर्णा शेटे, श्रावणी दीक्षित, प्रेम गायकवाड, ऋतिक सराटे, मनीष पाटील, अनुष्का शिंदे, सानिका इंगोले, प्रल्हाद खडतरे, पवन घाडगे, प्रतीक्षा आहेरकर, चतुर्दशी साळे.

## ▶▶ निधन वृत्त...

### पांडुरंग बोगा

**सोलापूर, दि. १९ जून-**



नीलम श्रमजीवी नगर परिसरातील ज्येष्ठ नागरिक पांडुरंग रसप्पा बोगा (८७, रा. मार्कंडेय चौक) यांचे शुक्रवारी निधन झाले आहे. त्यांच्या मागे पत्नी, चार मुले, दोन मुली, सुना तसेच नातवंडे असा परिवार आहे. नीलम नगर परिसरातील प्रसिद्ध अंबिका जनरल स्टोअर्सचे ते संस्थापक होते.

# पाणीपुरवठ्याच्या प्रस्तावित १३७८ कोटी रुपयांच्या प्रकल्पासंदर्भात विभागनिहाय आढावा



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१९ जून-**

महाराष्ट्र शहरी पाणीपुरवठा, स्वच्छता आणि पुनर्वापर कार्यक्रमाच्या अनुषंगाने तसेच सोलापूर शहरासाठी प्रस्तावित १३७८ कोटी रुपयांच्या सर्वसमावेशक पाणीपुरवठा योजनेच्या अंमलबजावणीसंदर्भात महापौर विनायक कोंड्याल यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सभेत आढावा घेण्यात आला. दरम्यान, सर्वसमावेशक पाणीपुरवठा प्रकल्पाच्या अंमलबजावणीदरम्यान शहरातील कोणताही भाग वंचित राहू नये, सर्व भागांना समान व नियोजनबध्द पाणीपुरवठा मिळावा तसेच पाण्याचा अपव्यय टाळण्यासाठी प्रभावी यंत्रणा उभारावी, अशा सूचना महापौर कोंड्याल यांनी दिल्या.

शहरातील पाणीपुरवठा व्यवस्था अधिक सक्षम करणे, प्रत्येक नागरिकापर्यंत समान व पुरेसा पाणीपुरवठा पोहोचविणे, पाण्याची गळती रोखणे, वितरण व्यवस्थेचे आधुनिकीकरण करणे, भविष्यातील वाढत्या लोकसंख्येच्या गरजा लक्षात घेऊन आवश्यक उपाययोजना, संबंधित प्रभागांमध्ये प्रस्तावित पाण्याच्या टाक्या, नव्याने उभारण्यात येणाऱ्या जलकुंभांची ठिकाणे, जुन्या व जीर्ण झालेल्या पाण्याच्या टाक्यांचे पुनर्बांधणी अथवा बदल, वितरण नेटवर्कमधील सुधारणा यासंदर्भातील सविस्तर माहिती देण्यात आली. या योजनेमुळे सोलापूर शहरातील पाणीपुरवठा व्यवस्थेत आमूलाग्र सुधारणा होऊन नागरिकांना दीर्घकालीन, शाश्वत व समान पाणीपुरवठा उपलब्ध होणार असल्याचा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

### नगरसेवकांनी उपस्थित केल्या अनेक तांत्रिक शंका

नव्या झोनिंग पद्धतीमुळे पाणीपुरवठा क्षेत्रांचे विभाजन करण्यात येणार असून त्यामुळे कमी क्षमतेच्या टाकीतूनही नियोजनबद्ध आणि अखंडित पाणीपुरवठा शक्य होईल. अवंती नगर आणि एबीडी क्षेत्रातील विविध भागांना स्वतंत्र जलसाठा केंद्रांमधून पाणीपुरवठा करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. बैठकीदरम्यान नगरसेवकांनी प्रस्तावित आराखड्याबाबत अनेक तांत्रिक शंका उपस्थित केल्या. विद्यमान टाक्यांचा वापर कायम राहणार का, नवीन टाक्यांमुळे साठवण क्षमतेत वाढ होणार का, तसेच उंच आणि सखल भागांमध्ये समान व सुरळीत पाणीपुरवठा कसा केला जाणार याबाबत प्रश्न उपस्थित करण्यात आले. यशनगर, वसंत विहार आणि अवंती नगर परिसरातील पाइपलाइन जोडणी, नवीन लाईनचे मार्ग, पाण्याचा दाब आणि वितरण व्यवस्था याबाबतही नगरसेवकांनी चिंता व्यक्त केली.

यावेळी उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, स्थायी समितीच्या सभापती रंजीता चाकोते, नगरसेविका रोहिणी तडवळकर, मंदाकिनी तोडकरी, वंदना गायकवाड, श्रध्दा पवारख अलका भवर, राजश्री कनके, पूनम काशीद, नगरसेवक अनंत जाधव, बिज्जू प्रधाने, समाधान आवळे, विनायक विटकर, संजय कोळी, अविनाश पाटील, राजू पाटील, प्रा.नारायण बनसोडे, गौतम कसबे, ज्ञानेश्वर कारभारी, दत्तात्रय बडगु, किरण पवार, सार्वजनिक आरोग्य अभियंता व्यंकटेश चौबे, विभागीय अधिकारी-१ चे सुनीता हिबारे, विभागीय अधिकारी-२ चे सरकाझी, सहाय्यक अभियंता शाम कन्ना, रऊफ शेख, एच.मुजावर, समीर जोशी, शशिकांत भुदे, किशोर पत्तेवाले, मधुकर साळुंखे, सुचिता अमेणगी आदी उपस्थित होते.

**प्रत्यक्ष स्थळ पाहणी करून अंतिम नियोजन करा**

काही लोकप्रतिनिधींनी विद्यमान आराखडा जुन्या नकाशांवर आधारित असल्याचा मुद्दा उपस्थित करत प्रत्यक्ष स्थळ पाहणी करून अंतिम नियोजन करण्याची मागणी केली. यावर अधिकाऱ्यांनी संयुक्त पाहणी करून लोकप्रतिनिधींनी सुचविलेल्या बाबींचा विचार करण्यात येईल, असे आश्वासन दिले. तसेच पाणीपुरवठा योजनेत पारदर्शकता राखून नागरिकांच्या सूचना आणि स्थानिक गरजांनुसार आवश्यक बदल करण्याची तयारी असल्याचेही स्पष्ट करण्यात आले.बैठकीत आगामी काळात प्रत्यक्ष स्थळ पाहणी, तांत्रिक सादरीकरण आणि लोकप्रतिनिधींच्या सूचनांनंतर अंतिम आराखडा निश्चित करण्यात येणार आहे.

# खतांचा काळाबाजार, साठेबाजीवर कारवाई; १०७ परवाने निलंबित, ७ गुन्हे दाखल

## सहा परवाने रद्द, खत विक्रेत्यांचे धाबे दणाणले

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१९ जून-**

खतांचा काळाबाजार व साठेबाजीच्या विरोधात कृषी विभागाने कारवाई मोहीम हाती घेतली. याद्वारे १०७ परवाने निलंबित, ६ परवाने रद्द तर ७ केंद्रांवर गुन्हे दाखल करण्यात आले. एकूण ११३ परवान्यांवर कारवाई करण्यात आली. यामुळे खत विक्रेत्यांचे धाबे दणाणले आहे.

शेतकऱ्यांना दर्जेदार आणि रास्त दरात खतांचा पुरवठा व्हावा यासाठी कृषी विभागामार्फत पुणे विभागातील पुणे, अहिल्यानगर आणि सोलापूर जिल्ह्यांमध्ये खत विक्री केंद्रांची कडक तपासणी मोहीम राबविण्यात येत आहे.

आतापर्यंत १०७ खत विक्री परवाने निलंबित आणि ६ खत विक्री परवाने रद्द करण्यात आले आहेत. ७ केंद्रांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत, अशी माहिती विभागीय कृषी सहसंचालक बाबासाहेब जेजुरकर यांनी दिली आहे.




या मोहिमेअंतर्गत पुणे विभागात एकूण २ हजार ५७६ परवानाधारक केंद्रांची तपासणी करण्यात आली. तपासणी दरम्यान २८१ प्रकरणांमध्ये काळाबाजार झाल्याचे समोर आले असून, २७७ केंद्रांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे.

पुणे जिल्ह्यातील ६५० केंद्रांची तपासणी करण्यात आली. यापैकी ७१ प्रकरणांत अनियमितता आढळली असून २७ परवाने निलंबित करण्यात आले आहेत. अहिल्यानगर जिल्ह्यात ८१२ केंद्रांची तपासणीनंतर १६ खत विक्री परवाने निलंबित आणि २ खत विक्री परवाने रद्द करण्यात आले. ३ केंद्रांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

सोलापूर जिल्ह्यात सर्वाधिक १ हजार १२९ केंद्रांची तपासणी करण्यात आली. १८ प्रकरणांमध्ये खतांचे नमुने निकृष्ट आढळले आहेत. जिल्ह्यात एकूण ६४ परवाने निलंबित आणि ४ खत विक्री परवाने रद्द करण्यात आले असून ४ केंद्रांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

अनुदानित युरियाचा औद्योगिक कारणांसाठी वापर टाळण्यासाठी विभागात ४२ औद्योगिक युनिट्सना भेटी देण्यात आल्या आहेत. खतांचा काळाबाजार, कृत्रिम टंचाई, साठेबाजी आणि चढ्या दराने विक्री करणाऱ्या विक्रेत्यांवर यापुढेही कडक कारवाई करण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले. या कारवाईच्यावेळी पुणे अधिक्षक कृषि अधिकारी विजयकुमार राऊत, तंत्र अधिकारी निलेश गढरी, विभागीय गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक अतुल जाधव आदी उपस्थित होते.



# टीईटी पात्रतेच्या अटीतून शिक्षकांना कायमस्वरुपी मुक्ती देण्यात यावी

**पंढरपूर, दि.१९ जून-**

अखिल भारतीय राष्ट्रीय शैक्षिक महासंघ संलग्न महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद (प्राथमिक विभाग), जिल्हा सोलापूर यांच्या वतीने २३ ऑगस्ट २०१० पूर्वी नियुक्त झालेल्या शिक्षकांना टीईटी पात्रतेच्या अटीतून कायम स्वरुपी मुक्ती देण्यात यावी. त्यांच्या सेवा, वरिष्ठता, पदोन्नती व इतर सर्व वैधानिक लाभांचे संरक्षण करण्यात यावे यांसह अन्य मागण्यांसंदर्भात निवेदन जिल्हाधिकारी यांच्यामार्फत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे पाठविण्यात आले.

तत्कालीन नियमांनुसार विधिसम्मतरीत्या नियुक्त झालेल्या लाखो शिक्षकांवर नंतरचे पात्रता निकष पूर्वलक्षी प्रभावाने लागू करणे हे नैसर्गिक न्याय, समानता आणि विधिक निश्चिततेच्या तत्त्वांच्या विरोधात आहे, असेही या निवेदनात नमूद आहे. यावेळी पुणे विभाग संयोजक डॉ.सचिन लादे, जिल्हाध्यक्ष सुनील जगताप, राहुल साबणे, आप्पाशा धनशेट्टी, अंबादास खराडे उपस्थित होते.

# तांदूळवाडी दुर्घटनेतील मृतांच्या कुटुंबीयांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून ४० लाखांची मदत



**पंढरपूर,दि.१९ जून-**

तांदूळवाडी येथे झालेल्या भीषण अपघातातील मृतांच्या कुटुंबियांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून अपघातग्रस्त कुटुंबीयांसाठी ४० लाख रुपयांची मदत मंजूर झाली आहे. आमदार समाधान आवताडे यांनी केलेल्या पाठपुराव्याने ८ मृतांच्या कुटुंबियांना आर्थिक आधार मिळाला आहे.

सातारा-पंढरपूर महामार्गावर तांदूळवाडी येथे पिकअप वाहन विहिरीत कोसळून पंढरपूर तालुक्यातील एकाच कुटुंबातील आठ जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला होता. या दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्या इंदुबाई दशरथ बावचे, पूजा अमोल सातूरे, पूजा बालाजी बावचे, अश्विनी संदीप बावचे, संस्कार संदीप बावचे, संस्कृती संदीप बावचे, भारत अमोल सातूरे आणि समर्थ बालाजी बावचे यांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी ५ लाख रुपये देण्यात आले.याप्रसंगी युवक नेते प्रणव परिचारक, द्रोणाचार्य हाके, नगरसेवक राहुल शिंदे, रोहित पानकर, तमीम मुजावर उपस्थित होते.

# लाचखोर अधीक्षक, वरिष्ठ लिपिकाला पोलिस कोठडी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ जून-**

भविष्य निर्वाह निधी (पीएफ) खात्यातील ५ लाख रुपये काढून देण्याच्या कामासाठी ६ हजार रुपयांची लाच स्वीकारताना रंगेहात अटक करण्यात आलेल्या लक्ष्मण दत्तात्रय बालवाड (वय-५५, रा.मंगल रेसिडेन्सी होटगी रोड, सोलापूर), विक्रम हरिश्चंद्र बारबोले (वय-५५, रा.करमाळा) या दोघांना शुक्रवारी न्यायालयात हजर करण्यात आले असता त्यांना एक दिवसांची पोलिस कोठडी सुनावण्यात आली.

### घरात तब्बल ११ लाखांचा मुद्देमाल मिळाला

पीएफची रक्कम काढून देण्यासाठी लाच घेताना लोकसेवकांना अटक केल्यानंतर एसीबीच्या पथकाने शुक्रवारी आरोपींच्या घराची झडती घेतली. या झडतीत आरोपी बालवाड याच्या घरात २ लाख ३५ हजारांचा ऐवज, मेटकरी याच्या घरात तब्बल ११ लाखांचा मुद्देमाल मिळाला. बारबोले याच्याही घराची झडती घेण्यात आली.

करमाळा तालुक्यातील चिकलठाण येथील विद्यालयात ग्रंथपाल असलेला तिसरा आरोपी अण्णासाहेब दगडू मेटकरी (वय-४८ रा.कडलास ता.सांगोला) हा अद्याप फरार असून त्याचा शोध सुरू आहे.

एका तक्रारदाराचे भविष्य निर्वाह निधीतील पैसे काढून देण्यासाठी आरोपींनी सहा हजार रुपयांची मागणी केल्याची तक्रार लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे केली होती. पोलिस उपअधीक्षक प्रशांत चौगुले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक शैलेश पवार हे पुढील तपास करीत आहे.

# ३६ वर्षीय महिला चढली मोबाईल टॉवरवर

**सोलापूर, दि.१९ जून-**

सांगली जिल्ह्यातील एका ३६ वर्षीय २ मुलांच्या मातेचा आणि पंढरपूर तालुक्यातील भाळवणी येथील २० वर्षीय तरुणाचा समाज माध्यमावरील प्रेमप्रकरण थेट मोबाईल टॉवरवर पोहोचल्याची घटना समोर आली. भाळवणी गावातील एका उंच मोबाईल टॉवरवर चढून शोले स्टाईल आंदोलन केले.ती महिला आणि तो तरुण गेल्या तीन ते चार वर्षांपासून लिव्ह इन रिलेशिपमध्ये राहत होते. तरुणाने मला आता तुझ्यासोबत एकत्र राहायचे नाही, असे सांगितल्याने तिने हा थरारक प्रकार केला.




# विकासासाठी विरोधी आमदार आमच्यासोबत : पालकमंत्री गोरे

### राजेंद्र राऊत यांचा विजय विक्रमी मताने होणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१९ जून-**

सोलापूर स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या विधान परिषद निवडणुकीत भाजपचे उमेदवार राजेंद्र राऊत यांचा ऐतिहासिक आणि विक्रमी विजय होईल, असा ठाम विश्वास ग्रामविकास मंत्री तथा सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी व्यक्त केला.

आषाढी वारीच्या नियोजनासंदर्भातील विभागीय कार्यालयातील बैठकीनंतर पत्रकारांशी संवाद साधताना त्यांनी विरोधकांवर अप्रत्यक्ष निशाणा साधत भाजपच्या विकासकेंद्री राजकारणाचा पुनरुच्चार केला.

राज्यात सध्या विविध राजकीय घडामोडींच्या पार्श्वभूमीवर 'ऑपरेशन टायगर' आणि





'ऑपरेशन तुतारी'च्या चर्चांना उधाण आले आहे. सोलापूर जिल्ह्यातही भाजपकडून 'ऑपरेशन तुतारी' राबवले जात असल्याची चर्चा राजकीय वतुर्ळात सुरू आहे. यासंदर्भात विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना गोरे यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, आम्हाला कोणतेही 'ऑपरेशन तुतारी' करण्याची गरज नाही. आम्ही 'ऑपरेशन विकास' राबवत आहोत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्यात विकासकामांना गती मिळाली असून सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नांना न्याय मिळत असल्याचे त्यांनी नमूद केले. विकासासाठी निधी, निर्णयक्षमता आणि राजकीय इच्छाशक्ती आवश्यक असते. फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली हे सर्व उपलब्ध असल्याने विरोधी पक्षातील अनेक लोकप्रतिनिधीही विकासाच्या मुद्द्यावर आमच्या भूमिकेशी सहमत आहेत, असेही ते म्हणाले.

विरोधी पक्षातील तीन आमदार महायुतीच्या भूमिकेला पाठिंबा देत असल्याचा दावा करताना त्यांनी हा पाठिंबा कोणत्याही राजकीय दबावामुळे नसून विकासकामांच्या विश्वासार्हतेमुळे मिळाल्याचे सांगितले. सोलापूर विधान परिषद निवडणुकीत महायुतीची संघटित ताकद, विकासाचा अजेंडा आणि स्थानिक स्वराज्य संस्थांमधील पाठिंबा यामुळे भाजप उमेदवार राजेंद्र राऊत यांचा विजय निश्चित असल्याचा पुनरुच्चार गोरे यांनी केला.




**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, श्री. मसलेकर निवास, जिल्हा न्यायालय पाठीमागे, समर्थ नगर, धाराशिव (उस्मानाबाद) ४१३५०१, कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ९७६७०९९७११ / ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. RNI No. MAHMAR/2023/86468. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003.**Publised at** TARUN BHARAT OFFICE Mr. Maslekar Residence, Behind District Court, Samarth Nagar, Dharashiv. PIN - 413501 |**RNI No. MAHMAR/2023/86468**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# लग्नाचे आमिष दाखवून महिलेवर अत्याचार

## मुरुम पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१९ जून -**
मुरुम पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एका ३० वर्षीय महिलेवर लग्नाचे आमिष दाखवून लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी एका तरुणाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपीने पीडित महिलेला लग्नाचे आश्वासन देत तिच्यावर वारंवार लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप आहे.

त्यानंतर पीडितेने विवाहाबाबत विचारणा केली असता संबंधित तरुणाने लग्नास नकार दिल्याचे



तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

या प्रकरणी पीडित महिलेने दिलेल्या फिर्यादीवरून भारतीय न्याय संहिता (बीएनएस) कलम ६९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास मुरुम पोलीस करीत आहेत.



## संक्षिप्त वृत्त...



### लोहारा येथे शिवसेना वर्धापन दिन उत्साहात साजरा

**लोहारा, १९ जून -**
लोहारा येथे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात आणि जल्लोषपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी मराठी अस्मिता, हिंदुत्व, लोकशाही मूल्ये आणि सर्वसामान्यांच्या हक्कांसाठी संघर्ष करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करत युवकांना पक्षाशी जोडण्याचे आवाहन करण्यात आले. कार्यक्रमास माजी सभापती विलास भंडारे, तालुकाप्रमुख अमोल बिराजदार यांच्यासह विविध पदाधिकारी व शिवसैनिक उपस्थित होते.



### राहुल गांधी यांच्या वाढदिनी उमरग्यात खाऊचे वाटप

**उमरगा, १९ जून -**
काँग्रेसचे माजी अध्यक्ष तथा लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या वाढदिवसानिमित्त उमरगा तालुका काँग्रेस कमिटी व धाराशिव जिल्हा युवक काँग्रेसच्या वतीने तुळजाभवानी मतिमंद व अनाथ बालगृह, उमरगा येथे खाऊ वाटपाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी बालगृहातील विद्यार्थ्यांना खाऊचे वितरण करण्यात आले तसेच विद्यार्थ्यांशी संवाद साधून सामाजिक बांधिलकी जपण्याचा संदेश देण्यात आला. कार्यक्रमास तालुकाध्यक्ष अर्जुन बिराजदार, उपाध्यक्ष विजय वाघमारे यांच्यासह विविध पदाधिकारी, शिक्षक, कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

### मुस्तान मिर्झा यांना राज्यस्तरीय 'बसवरत्न पुरस्कार' जाहीर

**कळंब, १९ जून -**
कळंब येथील पत्रकारिता क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे पत्रकार मुस्तान मुमताज मुक्तार मिर्झा यांना



यंदाचा राज्यस्तरीय 'बसवरत्न पुरस्कार' जाहीर झाला आहे. बसव प्रतिष्ठाणतर्फे महात्मा बसवेश्वर जयंती उत्सवानिमित्त विविध क्षेत्रांतील उल्लेखनीय कार्यकर्त्यांचा गौरव करण्यात येत असून पत्रकारितेतील योगदानाची दखल घेऊन त्यांची निवड करण्यात आली आहे. ग्रामीण प्रश्न, सामाजिक विषय आणि जनहिताच्या मुद्द्यांवर सातत्यपूर्ण वृत्तांकनामुळे त्यांनी स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. या पुरस्कार घोषणेनंतर पत्रकारिता क्षेत्रातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

### महिलेविरुद्ध गुन्हा दाखल

**भूम, १९ जून -**
येथील इंदिरानगर झोपडपट्टी परिसरात विनापरवाना लोखंडी तलवार बाळगणाऱ्या एका महिलेविरुद्ध भुम पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. रेखा शिवसनी उर्फ सनी काळे हिच्याकडे लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अशा प्रकारे बेकायदेशीररित्या तलवार आढळून आली. पोलिसांनी तलवार जप्त केली असून याप्रकरणी गुन्हा नोंद करण्यात आला आहे. याचा पुढील तपास पोलिस करित आहेत.

# शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी नळदुर्ग तहसील कार्यालयावर ट्रॅक्टर मोर्चा




**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१९ जून -**
शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी शेतकरी संघर्ष समितीच्या वतीने गुरुवारी (दि.१९) नळदुर्ग येथील अप्पर तहसील कार्यालयावर भव्य ट्रॅक्टर मोर्चा काढण्यात आला. या मोर्चात मोठ्या संख्येने शेतकरी आणि पालक सहभागी झाले होते.

मोर्चाद्वारे शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी द्यावी, पीक विम्याची रक्कम तात्काळ वितरित करावी, ऊस बिलाची थकबाकी शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करावी तसेच एक रुपयातील पीक विमा योजना पुन्हा सुरू करावी, अशा प्रमुख मागण्या करण्यात आल्या. याशिवाय शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क माफ करण्याची मागणीही करण्यात आली.

तसेच धाराशिवचे उपविभागीय अधिकारी संतोष राऊत यांनी पदाचा गैरवापर करून शेतकऱ्यांवर पोलीस बळाचा वापर केल्याचा आरोप आंदोलकांनी केला. या संदर्भातील अहवाल जिल्हाधिकारी धाराशिव यांच्या माध्यमातून विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांच्याकडे सादर करण्यात यावा, अशी मागणीही करण्यात आली.

अक्कलकोट रोड ते अप्पर तहसील कार्यालयापर्यंत हा ट्रॅक्टर मोर्चा काढण्यात आला. मोर्चादरम्यान सर्पदंशामुळे गुळहळ्ळी येथील शेतकरी विठ्ठल निकम यांच्या निधनाबद्दल श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.


मोर्चानंतर शेतकरी संघर्ष समितीच्या वतीने मागण्यांचे निवेदन अप्पर तहसीलदार प्रमोद गायकवाड यांना देण्यात आले.

यावेळी बोलताना शेतकरी संघर्ष समितीचे समन्वयक दिलीप जोशी यांनी सरकारने शेतकऱ्यांच्या मागण्यांवर सकारात्मक निर्णय घेतला नाही तर विधानसभेच्या पावसाळी अधिवेशनाच्या शेवटच्या आठवड्यात मुंबईतील नरीमन पॉईंट येथे आंदोलन करण्यात येईल, असा इशारा दिला.

यावेळी शेतकरी संघर्ष समितीचे महेश घोडके, महादेव बिराजदार, जिल्हाध्यक्ष सरदार सिंग ठाकूर यांनीही मनोगत व्यक्त केले. मोर्चादरम्यान पोलिसांकडून चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

या मोर्चात व्यंकट पाटील, पंडित पाटील, संतोष फडतरे, स्वामीनाथ माळगे, संजय कलकोटे, गुलाब शिंदे, अजमोद्दीन शेख, बालाजी ठाकूर, प्रताप ठाकूर, रहेमान शेख आणि अन्य शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# पेरणीची तयारी पूर्ण; पावसाच्या प्रतीक्षेत वाशी तालुक्यातील बळीराजा



## खरीप हंगामाबाबत चिंता वाढली...

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.१९ जून -**
खरीप हंगामाच्या स्वागतासाठी धाराशिव जिल्ह्यातील वाशी तालुक्यातील शेतकऱ्यांनी शेतशिवाराची तयारी पूर्ण केली असली तरी अद्याप समाधानकारक पाऊस न झाल्याने बळीराजाची चिंता वाढू लागली आहे.

काही शेतकऱ्यांनी नांगरणी व मोगडणीची कामे पूर्ण केली आहेत, तर काहींनी बी-बियाणे आणि खतांची खरेदी करून त्याची साठवणूक केली आहे. खरीप हंगामाच्या तयारीसाठी शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात आर्थिक गुंतवणूक केली असून, चांगल्या उत्पादनाच्या आशेने मशागतीची कामेही पूर्ण केली आहेत. यंदा महागडी बियाणे, वाढलेले खतांचे दर आणि शेती मशागतीचा वाढता खर्च सहन करत शेतकरी पेरणीसाठी सज्ज झाला आहे. मात्र जून महिना संपत आला तरी पावसाने दमदार हजेरी लावलेली नसल्याने शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

ग्रामीण भागात ढगाळ वातावरण तयार होत असले तरी पावसाची प्रतीक्षा कायम आहे. शेतकरी पावसाच्या अपेक्षेने आकाशाकडे नजर लावून बसल्याचे चित्र अनेक ठिकाणी दिसून येत आहे.

वेळेत पाऊस न झाल्यास पेरणीला विलंब होण्याची आणि त्याचा संपूर्ण खरीप हंगामावर परिणाम होण्याची शक्यता शेतकऱ्यांकडून व्यक्त केली जात आहे.

# धमकी देऊन अल्पवयीन मुलीवर अत्याचार

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१९ जून -**
तुळजापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एका १७ वर्षीय अल्पवयीन मुलीवर धमकी देऊन



लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी एका तरुणाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, आरोपीने पीडित मुलीच्या भावाला जीवे मारण्याची धमकी देत तिच्यावर वारंवार लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप आहे. पीडितेने दिलेल्या फिर्यादीवरून गुन्हा नोंदविण्यात आला आहे. प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करीत आहेत.

# श्री तुळजाभवानी मंदिराच्या दर्शन व्यवस्थेत बदल; भाविकांना अधिक सुविधा उपलब्ध

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१९ जून -**
श्री तुळजाभवानी देवींच्या दर्शन व्यवस्थेत आजपासून महत्त्वपूर्ण बदल करण्यात आला असून, सर्व भाविकांना देवीचे दर्शन समान अंतरावरून आणि अधिक सुलभ पद्धतीने घेता यावे, या उद्देशाने नव्या दर्शन व्यवस्थेची अंमलबजावणी करण्यात आली आहे.

यापूर्वी ५०० रुपये आणि २०० रुपये देणगी दर्शन पासधारकांच्या रांगा अनुक्रमे मंदिर परिसरातून फिरत न्हाणी गेट मार्गे तसेच छत्रपती संभाजी महाराज प्रांगणातून जात होत्या. या मार्गांवर भाविकांसाठी आवश्यक सेवा-सुविधा उपलब्ध करून देताना काही अडचणी येत असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले.

नवीन व्यवस्थेनुसार आता ५०० रुपये व २०० रुपये देणगी दर्शन पासधारकांच्या रांगा दर्शन मंडपातून जाणार आहेत. त्यामुळे या मार्गावरून दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना पिण्याचे पाणी, कुलर, स्वच्छतागृह तसेच स्तनदा मातांसाठी हिरकणी कक्ष यांसारख्या सुविधा उपलब्ध



देण्यात आली आहे.

दरम्यान, या नव्या व्यवस्थेमुळे देणगी दर्शनाच्या वेळेत कोणताही बदल होणार नसल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. ५०० रुपये आणि २०० रुपये देणगी दर्शन रांगांमधून भाविकांना पूर्वीप्रमाणेच कमी वेळेत आणि जलदगतीने श्री तुळजाभवानी देवींचे दर्शन घेता येणार असल्याची माहिती होणार आहेत.

# शेतातील सोलार पंप व कॉपर वायरची चोरी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१९ जून -**
धाराशिव ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सांजा शिवारात शेतातील विहिरीवर बसविण्यात आलेला सोलार पंप आणि कॉपर वायर चोरीला गेल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी अज्ञात व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, युनुस दस्तगीर शेख (वय ६८, रा. सांजा) यांच्या उपळा मांजा परिसरातील शेतातील विहिरीवर बसविण्यात आलेला जी.के. एनर्जी कंपनीचा ३ एचपी सोलार पंप तसेच सुमारे ३२० फूट कॉपर वायर असा एकूण ४२ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याची घटना घडली. या प्रकरणी युनुस शेख यांनी दिलेल्या फिर्यादीवरून ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# ढोकी परिसरात अवैध मद्यविक्रीवर कारवाई; तीन स्वतंत्र गुन्हे दाखल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१९ जून -**
ढोकी पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध मद्यविक्रीविरोधात कारवाई करत पोलिसांनी गावठी दारू, देशी-विदेशी मद्याच्या बाटल्या तसेच मद्यनिर्मितीसाठी वापरण्यात येणारा रासायनिक द्रव असा मोठा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी तीन स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

कोंडा येथील एका महिलेच्या राहत्या घराशेजारील पत्र्याच्या शेडमधून सुमारे ५० लिटर गावठी दारू जप्त करण्यात आली. या दारूची अंदाजे किंमत ५ हजार रुपये असल्याचे सांगण्यात आले. तसेच जागजी-सुंभा मार्गालगत एका तरुणाकडून देशी व विदेशी मद्याच्या ३१ सीलबंद बाटल्या जप्त करण्यात आल्या. या मद्याची अंदाजे किंमत ४ हजार ६८० रुपये असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

याशिवाय दत्तानगर पारधी पिढी परिसरात करण्यात आलेल्या कारवाईत ८०० लिटर गावठी दारू निर्मितीसाठी वापरण्यात येणारा गुळमिश्रित रासायनिक द्रव तसेच ६० लिटर गावठी दारू असा एकूण सुमारे ८६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

# कळंब शहरातील गटारे, नाल्यांची युद्धपातळीवर साफसफाई

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.१९ जून -**
आगामी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर कळंब शहरात मान्सूनपूर्व स्वच्छता मोहिमेला वेग आला असून नगराध्यक्षा सुनंदा कापसे यांच्या नेतृत्वाखाली शहरातील गटारे, नाले आणि जलनिस्सारण व्यवस्थेची व्यापक स्वच्छता मोहीम राबविण्यात येत आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून दुर्लक्षित राहिलेल्या गटारांच्या स्वच्छतेसह शहरातील प्रमुख नाल्यांची साफसफाई युद्धपातळीवर सुरू आहे. अनेक ठिकाणी

> "स्वच्छता विभागामार्फत शहरातील प्रत्येक प्रभागात गटारे, नाले आणि जलवाहिन्यांची नियमित स्वच्छता केली जात असून नागरिकांना स्वच्छ, सुरक्षित आणि आरोग्यदायी वातावरण उपलब्ध करून देण्यासाठी नगर परिषद कटिबद्ध असल्याचे नगराध्यक्षा सुनंदा कापसे यांनी सांगितले.

नाल्यांवरील अतिक्रमणे हटवून जेसीबीच्या साहाय्याने नाल्यांतील गाळ, कचरा आणि इतर अडथळे काढण्याचे काम सुरू करण्यात आले आहे. यामुळे पावसाचे पाणी सुरळीत वाहून जाण्यास मदत होणार असून शहरातील पाणी तुंबणे आणि पूरस्थितीच्या समस्येवर नियंत्रण मिळविण्यास मदत होणार असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले.

**मान्सूनपूर्व स्वच्छता मोहिमेला वेग...**


या स्वच्छता मोहिमेचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे नगराध्यक्षा कापसे स्वतः विविध भागांना भेट देऊन कामांची पाहणी करत आहेत. स्वच्छतेची कामे प्रभावी आणि दर्जेदार पद्धतीने व्हावीत यासाठी त्या अधिकाऱ्यांना आवश्यक सूचनाही देत आहेत. त्यामुळे स्वच्छता विभागाच्या कामाला अधिक गती मिळाल्याचे सांगण्यात येत आहे.

दरवर्षी पावसाळ्यात शहरातील अनेक भागांत पाणी तुंबण्याच्या समस्या निर्माण होत असल्याने नागरिकांना गैरसोयींचा सामना करावा लागत होता. मात्र यंदा मान्सूनपूर्व नियोजनबद्ध स्वच्छता मोहिमेमुळे या समस्यांमध्ये मोठ्या प्रमाणात घट होईल, असा विश्वास प्रशासनाने व्यक्त केला आहे.

# संभाजीराव पाटील निलंगेकर यांचा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रमांतून साजरा होणार

**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.१९ जून -**
लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री तथा निलंगा विधानसभा मतदारसंघाचे आमदार संभाजीराव पाटील निलंगेकर यांच्या वाढदिवसानिमित्त यावर्षी विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती भाजप पदाधिकाऱ्यांनी दिली.

दरवर्षीप्रमाणे यंदाही वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्याचे नियोजन कार्यकर्त्यांनी केले होते. मात्र, यंदाच्या पावसाची परिस्थिती आणि शेतकऱ्यांना भेडसावणाऱ्या अडचणी लक्षात घेऊन वाढदिवस साध्या पद्धतीने व सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून साजरा करावा, असा संदेश संभाजीराव पाटील निलंगेकर यांनी दिल्याचे पदाधिकाऱ्यांनी सांगितले.



या निमित्ताने हलगरा जिल्हा परिषद गटातील गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार सोहळ्याचे आयोजन मौजे माकणी थोर येथे सकाळी १० वाजता करण्यात आले आहे.

तसेच सावनगिरा व परिसरातील ग्रामस्थांच्या वतीने पदयात्रा काढून पर्जन्यवृष्टीसाठी माकणी थोर येथील हनुमंत मंदिरात जलाभिषेक करण्यात येणार आहे. याशिवाय निलंगा शहरातील निळकंठेश्वर मंदिरात अभिषेक, महापुरुषांना अभिवादन, उपजिल्हा रुग्णालयात फळवाटप तसेच जिल्हा परिषद शाळांमध्ये शालेय साहित्य वाटपाचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत.

याचबरोबर मौजे बोरसुरी येथे २१ जून रोजी मोफत सर्वरोग निदान व आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आल्याची माहिती भाजप तालुकाध्यक्ष कुमोद लोभे, शहराध्यक्ष रवी फुलारी आणि अनिल भंडारे यांनी दिली.

# तुळजापूरात २१ जूनला ब्राह्मण महासंघाचा प्रदेश पदाधिकारी मेळावा

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१९ जून -**
तुळजापूर येथे ब्राह्मण महासंघाच्या वतीने येत्या रविवारी, २१ जून रोजी प्रदेश पदाधिकारी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

शहरातील घाटशीळ रस्त्यावरील गुळवणी महाराज साधक आश्रमात हा कार्यक्रम होणार असून सकाळी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्रांचे वितरण संस्थापक आनंद दवे यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. तसेच दुपारी त्यांच्या मार्गदर्शनपर भाषणाचे आयोजन करण्यात आले आहे.

मेळाव्याच्या तयारीसाठी प्रदेशाध्यक्ष विलास शाळू, अजित नाईक, धनंजय पाटील आणि हेमंत इंदापूरकर यांनी बैठक घेतल्याची माहिती संयोजकांनी दिली.

# लाच मागितल्याप्रकरणी पोलिस कॉन्स्टेबलविरुद्ध गुन्हा; एसीबीची कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१९ जून -**
नातवाविरुद्ध आलेला छेडछाडीचा अर्ज मिटवून घेण्यासाठी आणि संबंधित प्रकरणात कायदेशीर कारवाई न करण्यासाठी ५ हजार रुपयांची लाच मागितल्याच्या आरोपावरून शिराढोण पोलीस ठाण्यातील एका पोलीस कॉन्स्टेबलविरुद्ध लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) गुन्हा दाखल केला आहे.

एसीबीने दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार यांच्या नातवाविरोधात शिराढोण पोलीस ठाण्यात छेडछाडीबाबत अर्ज दाखल झाला होता. हे प्रकरण मिटवून देण्यासाठी संबंधित पोलीस कॉन्स्टेबल अतुल संपत जाधव यांनी ५ हजार रुपयांची मागणी केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

तक्रारदाराने २१ मे रोजी एसीबीच्या धाराशिव कार्यालयात लेखी तक्रार दिली होती. त्यानंतर एसीबीच्या पथकाने पंचांसमक्ष तक्रारीची पडताळणी केली असता लाचेची मागणी झाल्याचे निष्पन्न झाल्याचे सांगण्यात आले.

या प्रकरणी २३ मे रोजी शिराढोण पोलीस ठाण्यात सापळा रचण्यात आला होता.

मात्र संबंधित कर्मचाऱ्याला संशय आल्याने त्याने ऐनवेळी रक्कम स्वीकारण्यास नकार दिला. त्यामुळे सापळा यशस्वी झाला नसला तरी लाचेची मागणी झाल्याचे स्पष्ट झाल्याने १८ जून रोजी संबंधित पोलीस कर्मचाऱ्याविरोधात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली.

सध्या संबंधित आरोपी पोलीस कॉन्स्टेबल फरार असून त्याचा शोध घेऊन अटक करण्याची कार्यवाही सुरू असल्याचे एसीबीने सांगितले आहे.

ही कारवाई लाचलुचपत प्रतिबंधक विभागा धाराशिवचे पोलीस उपअधीक्षक योगेश वेळापुरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक विजय वगरे, बाळासाहेब नरवटे आणि त्यांच्या पथकाने केली.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा,
छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली,
जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर
(कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# विशेष सखोल पुनरिक्षण मोहीमेत नागरिकांनी सहभागी व्हावे

## जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांचे नागरिकांना आवाहन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १९ जून**

जिल्ह्यामध्ये दि २० जून ते २९ जुलैपर्यंत निवडणूक विभागाच्यावतीने विशेष सखोल पुनरिक्षण मोहीम राबविण्यात येणार असून या मोहीमेत नागरिकांनी सहभागी होऊन प्रशासनाला सहकार्य करावे असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी पत्रकार परिषदेत केले आहे.

राज्यात सध्या एसआयआर म्हणजेच मतदार याद्यांचे विशेश सखोल पुनरिक्षण मोहीमेचा कार्यक्रम दि २० जून पासून सुरू होत आहे. २००२ च्या मतदार यादीत नाव नसलेल्या मतदारांनी त्यांची नावे मतदार यादीत समाविष्ट करण्यासाठी निवडणुक विभागाने ही मोहीम हाती घेतली असून यासाठी संबंधित बिएलओ घरोघरी भेटी देणार आहेत. बिएलओच्या गृहभेटीपूर्वी मतदारांनी मागील एसआयआरमधील आपला किंवा आई वडीलांचा तपशील जसे की नाव, मतदारसंघ, यादी भाग क्रमांक, अनुक्रमांक शोधून ठेवावा, तसेच बिएलओने दिलेल्या गणना अर्जात आवश्यक माहिती भरून व स्वाक्षरी करून त्याची एक प्रत बिएलओला द्यावी व पोच घेवून एक प्रत स्वतःजवळ ठेवावी, आपले किंवा आई-वडीलांचे नाव मागील एसआयआर मध्ये नसल्यास जन्माचा दाखला, पासपोर्ट, इयत्ता १० वीचे किंवा शैक्षणिक प्रमाणपत्र, रहीवासी प्रमाणपत्र, जात प्रमाणपत्र, सरकारी किंवा सार्वजनिक उपक्रम क्षेत्रातील कर्मचारी/निवृत्तीवेतन ओळखपत्र, राज्य/स्थानिक प्राधिकरणाची कुटुंब नोंदवही, शासनाने दिलेले जमीन किंवा घर वाटप प्रमाणपत्र, वन हक्क प्रमाणपत्र, राष्ट्रीय नागरिक नोंदणीचा पुरावा, बँक, टपाल कार्यालय, जीवन विमा महामंडळ किंवा सरकारने १ जुलै १९८७ पूर्वी दिलेले ओळखपत्र/प्रमाणपत्र तसेच आधार कार्ड ओळखपत्र पुरावा म्हणून स्विकारले जाईल.तथापि आधार ॲक्ट २०२६ च्या कलम ९ प्रमाणे आधारकार्ड नागरिकत्वाचा पुरावा म्हणून मानले जाणार नाही. कोणताही पात्र मतदार वंचीत राहणार नाही याची काळजी प्रशासन घेत आहे.

हिंगोली जिल्ह्यात आतापर्यंत ९२.५५ टक्के इतके मॅपींग झाले आहे. हिंगोली जिल्ह्यातील एकूण ९ लाख ६९ हजार ३८५ मतदारांच्या तपशीलांची खातरजमा १०१५ मतदान केंद्रीस्तरीय अधिकाऱ्यांमार्फत करण्यात येणार आहे. या प्रक्रियेत पारदर्शकता राखण्यासाठी राजकीय पक्षातर्फे नेमण्यात आलेले १०१५ मतदान केंद्रस्तरीय प्रतिनिधी त्यांना सहकार्य करणार आहेत. या मोहीमेला नागरिकांनी सहकार्य करावे असे आवाहनही जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी केले. यावेळी निवडणुक अधिकारी, माहीती अधिकारी प्रभाकर बारहाते, चंद्रकांत कारभारी यांची उपस्थिती होती.

# पोलिस कवायत मैदानावर २१ जूनला आंतराष्ट्रीय योग दिनाचे आयोजन

## नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १९ जून**

योगाच्या माध्यमातून निरोगी जीवनशैली, मानसिक स्वास्थ्य आणि शारीरिक तंदुरुस्तीचा संदेश समाजात पोहोचविण्याच्या उद्देशाने २१ जून रोजी आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त हिंगोली येथे भव्य योग दिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. संत नामदेव पोलीस कवायत मैदान येथे सकाळी ७ वाजता होणारा हा कार्यक्रम जिल्हा प्रशासन, पोलीस प्रशासन, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, शिक्षण विभाग आणि जिल्हा योग संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला आहे.

या कार्यक्रमात विविध क्षेत्रातील नागरिक, विद्यार्थी, युवक, क्रीडापटू, योगप्रेमी, स्वयंसेवी संस्था तसेच विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी सहभागी होणार असून नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन निवासी जिल्हाधिकारी अभिमन्यू बोधवड यांनी केले आहे.

कार्यक्रमाच्या पूर्वतयारीसंदर्भात जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित आढावा बैठकीत विविध विभागांच्या जबाबदाऱ्या निश्चित करण्यात आल्या. कार्यक्रमाचे नियोजन, सुविधा आणि विभागांतील समन्वय याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. बैठकीस माध्यमिक शिक्षणाधिकारी विपुल भागवत, प्रभारी जिल्हा क्रीडा अधिकारी आत्माराम बोथीकर, शासकीय तंत्रनिकेतनचे मुकेश सामलेटी, स्काऊट गाईडच्या जिल्हा संघटक माधुरी दळवी, योग विद्या धामचे रत्नाकर महाजन, पतंजली योग समितीचे विठ्ठल सोळुंके तसेच विविध योग संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते. यावेळी निवासी जिल्हाधिकारी श्री. बोधवड यांनी कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सर्व विभागांनी परस्पर समन्वय साधून सूक्ष्म नियोजन करण्याच्या सूचना दिल्या. योगाचा संदेश गावपातळीपर्यंत पोहोचविण्यासाठी शिक्षण विभागाने विशेष पुढाकार घ्यावा, असे निर्देशही त्यांनी दिले. त्यानुसार जिल्ह्यातील सर्व शाळांमध्ये योग दिन साजरा करण्यासाठी विद्यार्थ्यांचा सहभाग वाढविण्याचे नियोजन करण्यात येणार आहे.

कार्यक्रमासाठी आसन व्यवस्था, पिण्याच्या पाण्याची सुविधा, सहभागी नागरिक व विद्यार्थ्यांच्या बसण्याची व्यवस्था, प्रवेशद्वार आणि इतर आवश्यक सुविधांबाबत क्रीडा विभागाला सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच योगाचार्य आणि योग संघटनांच्या प्रतिनिधींनी कार्यक्रम अधिक प्रभावी व व्यापक करण्यासाठी विविध सूचना मांडल्या.

जिल्हास्तरावर आयोजित करण्यात येणाऱ्या या योग दिन कार्यक्रमातून नागरिकांमध्ये योगाविषयी जागरूकता निर्माण होऊन निरोगी जीवनशैलीचा संदेश अधिक व्यापकपणे पोहोचेल, असा विश्वास प्रशासनाने व्यक्त केला आहे.

# सीजेपीचे अभिजीत दिपके यांची त्यांच्या मुळगावी संतुक पिंपरी येथे भेट, न्याय मिळेपर्यंत लढाई लढणार

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १९ जून**

कॉकरोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजीत दिपके यांनी दि १९ जून रोजी त्यांचे मुळगाव असलेल्या हिंगोली जिल्ह्यातील संतुक पिंपरी येथे भेट दिली. यावेळी ग्रामस्थांनी केलेल्या जंगी स्वागतानंतर बोलतांना अभिजीत दिपके भाऊक झाले. मी ज्या उद्देशासाठी हा लढा देत आहे तो उद्देश पूर्ण होईपर्यंत, न्याय मिळेपर्यंत लढाई चालूच राहणार असल्याचा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

सीजेपीचे संस्थापक अभिजीत दिपके हे नांदेडकडे जात असतांना हिंगोली जिल्ह्यात कनेरगाव नाका, हिंगोली तसेच त्यांच्या मुळगावी त्यांचे जंगी स्वागत करण्यात आले. यावेळी त्यांच्या सुरक्षेसाठी मोठा पोलिस



बंदोबस्त ठेवण्यात आला होता. अभिजीत दिपके यांनी देशभरात नीट परीक्षेच्या पेपर लीकवरून मोठे आंदोलन उभे केले आहे. त्यांच्या आंदोलनाला मोठा प्रतिसाद मिळत असल्याचे दिसत आहे. तरूण मंडळी अभिजीत दिपके यांच्या कामाला पाठींबा देतांना दिसत आहे.

शुक्रवार दि १९ जून रोजी नांदेडकडे जातांना अभिजीत दिपके यांचे कनेरगाव नाका, हिंगोली तसेच त्यांच्या मुळगावी संतुक पिंपरी येथे स्वागत करण्यात आले.

संतुक पिंपरी येथील ग्रामपंचायत आणि ग्रामस्थांच्यावतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी बोलतांना अभिजीत दिपके यांनी सांगितले की, संतुक पिंपरी येथील गावात त्यांचे बालपणाचे काही दिवस गेले. त्या आठवणी आजही स्मरणात आहेत. गावातील लोकांसमोर मी राजकीय बोलणार नाही परंतु नीट परीक्षेतील पेपर लीकमुळे ११ मुलांनी आत्महत्या केल्या. ही मुले आपल्यासारख्या सर्वसामान्य कुटुंबातून आली होती. त्यांच्या आई-वडीलांनी कर्ज काढून, शेती विकून त्यांना डॉक्टर्स बनविण्याचे स्वप्न पाहीले होते. या मुलांच्या कुटुंबियांना न्याय मिळवून देण्यासाठी तसेच सध्याच्या शिक्षण व्यवस्थेविरूध्द माझा लढा चालूच राहणार असून आपणा सर्वांचे आर्शिवाद व पाठींबा माझ्यासोबत असल्यामुळेच मी ही लढाई लढत असल्याचा विश्वास यावेळी दिपके यांनी व्यक्त केला.

## संक्षिप्त वृत्त

### आचार्यकुल राष्ट्रीय बैठकीचे आयोजन

हिंगोली- राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या १८ विधायक कार्यातील आचार्यकुल विषयावर राष्ट्रीय पातळीवरील बैठकीचे आयोजन राज्यातील सुप्रसिद्ध रांजणगाव येथे दि. २० आणि २१ जून दरम्यान आयोजिण्यात आल्याची माहिती महाराष्ट्र सर्वोदय मंडळाचे महामंत्री तथा कार्याध्यक्ष विशाल अग्रवाल यांनी येथे दिली आहे. आचार्य विनोबा भावे यांनी समाजातील भेडसावणाऱ्या समस्यांवर वैचारिक मंथन करण्यासाठी आचार्यकुलाची संकल्पना रुजविली, शिक्षण क्षेत्रातील सेवानिवृत्त शिक्षक, बुद्धीजीवी, सामाजिक क्षेत्रातील संस्था, संघटना, सामाजिक कार्यकर्ते आदींचा समावेश यात करण्यात आला आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातील रांजणगाव येथे पार पडणाऱ्या बैठकीत अध्यात्म आणि विज्ञान=सर्वोदय, ग्रामसभा सहयोग, रचनात्मक कार्यक्रम आदी विषयांवर देशातील नामवंत शिक्षण तज्ज्ञ, लेखक, ज्येष्ठ सर्वोदय विचारवंत विविध सत्रांमध्ये वैचारिक उद्बोधन करणार आहेत. महाराष्ट्र सर्वोदय मंडळाचे प्रदेश अध्यक्ष डॉ. धर्मेंद्र राजपूत (अकोला), विशाल अग्रवाल (हिंगोली) यांचा राज्यातून समावेश राहणार आहे.

### एकल महिला धोरणासाठी अभिप्राय द्या

हिंगोली- राज्यातील एकल महिलांच्या समस्या, अपेक्षा व हक्कांचा विचार करून प्रभावी, समावेशक आणि उपयुक्त एकल महिला धोरण तयार करण्यासाठी जिल्हा परिषदेमार्फत नागरिकांकडून अभिप्राय मागविण्यात येत आहे. यासाठी ८२०८५८९९९५ हा व्हॉट्सअॅप क्रमांक उपलब्ध करून देण्यात आला आहे. एकल महिलांच्या सक्षमीकरणासाठी तयार करण्यात येणाऱ्या धोरणात सर्व घटकांचा सहभाग महत्त्वाचा असून, संबंधित महिलांनी तसेच नागरिकांनी आपले अभिप्राय, सूचना व अपेक्षा या क्रमांकावर पाठवाव्यात, असे आवाहन करण्यात आले आहे. सदर व्हॉट्सअॅप क्रमांकावर एकल महिलांच्या अडचणी व समस्या, शासनाकडे करावयाच्या सूचना व शिफारसी, योजना व धोरणांबाबतच्या अपेक्षा, तक्रारी व अंमलबजावणीतील अडचणी, हक्क, सुविधा व कल्याणकारी योजनांबाबत सूचना पाठविता येईल. प्राप्त होणारा प्रत्येक अभिप्राय एकल महिला धोरण अधिक प्रभावी, सर्वसमावेशक व उपयुक्त बनविण्यास मदत करणार आहे. त्यामुळे जास्तीत जास्त एकल महिलांनी या उपक्रमात सहभागी होऊन आपले मत नोंदवावे, तसेच हा संदेश इतर एकल महिलांपर्यंत पोहोचवावा, असे आवाहन जिल्हा परिषद, हिंगोली यांच्या वतीने करण्यात आले आहे. याबाबत सर्व गटविकास अधिकाऱ्यांनी अहवाल सादर करावेत, असे निर्देश दिले आहेत. एकल महिला शक्तीचा आधार, नवीन उद्याचा विचार या संकल्पनेतून राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमात नागरिकांचा सहभाग बदल घडविण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

### हिंगोलीत उन्हाचे चटके कायम

हिंगोली- जून महिन्याचा तिसरा आठवडा उलटूनही जिल्ह्यात उन्हाचे चटके कायम आहेत. तापमान कमी झाले असले तरी उकाड्यामध्ये काहीच बदल झाला नसल्याचे दिसत आहे. जिल्ह्यात काही ठिकाणी तुरळक पाऊस पडला परंतु त्यामुळे अधिकच उकाडा जाणवत आहे. दुसरीकडे शेतकरी मशागतीची कामे आटोपून पावसाची वाट पाहत आभाळाकडे पाहत आहे. परंतु अजूनही पाऊस पडत नसल्यामुळे सामान्य नागरिकासह शेतकरीही आतुरतेने पावसाची वाट पाहत आहे.

# परभणी-हिंगोली विधान परिषदेसाठी ९९.७९ टक्के मतदान

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १९ जून**

विधान परिषदेच्या परभणी-हिंगोली स्थानिक प्राधिकारी मतदारसंघ निवडणुकीसाठी आज झालेल्या मतदानात मतदारांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत मतदान केले. सकाळी ८ ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत झालेल्या मतदानात एकूण ४६६ मतदारांपैकी ४६५ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला, त्यामुळे एकूण मतदानाची टक्केवारी ९९.७९ टक्के इतकी नोंदविण्यात आली.

निवडणुकीसाठी परभणी व हिंगोली जिल्ह्यातील सात मतदान केंद्रांवर मतदान प्रक्रिया शांततेत आणि सुरळीत पार पडली. हिंगोली जिल्ह्यातील हिंगोली, कळमनुरी, वसमत आणि परभणी जिल्ह्यातील परभणी, गंगाखेड व पाथरी येथील सहा केंद्रांवर १०० टक्के मतदान झाले. तर सेलू मतदान केंद्रावर ५९ पैकी ५८ मतदारांनी मतदान केल्याने तेथे ९८.३१ टक्के मतदानाची नोंद झाली.

मतदानासाठी नोंद असलेल्या २१२ पुरुष आणि २५४ महिला अशा एकूण ४६६ मतदारांपैकी २११ पुरुष व सर्व २५४ महिला मतदारांनी मतदान केले. महिला मतदारांची मतदानाची टक्केवारी १०० टक्के राहिली, तर पुरुषांची मतदानाची टक्केवारी ९९.५३ टक्के नोंदविण्यात आली.

जिल्हा प्रशासनाने केलेल्या प्रभावी नियोजनामुळे मतदान प्रक्रिया कोणत्याही अडचणीशिवाय पार पडली. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रतिनिधींनी मोठ्या उत्साहाने मतदानात सहभाग घेत लोकशाही प्रक्रियेप्रती आपली बांधिलकी पुन्हा एकदा अधोरेखित केली.

मतदान केंद्रनिहाय मतदान टक्केवारी पुढील प्रमाणे आहे. परभणी – १०० टक्के, सेलू – ९८.३१ टक्के, गंगाखेड – १०० टक्के, पाथरी – १०० टक्के, हिंगोली – १०० टक्के, कळमनुरी – १०० टक्के, वसमत – १०० टक्के.

लोकशाहीप्रती जागरूकता आणि कर्तव्यभावनेचे दर्शन घडविणाऱ्या या मतदान प्रक्रियेत मतदारांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत आदर्श निर्माण केला. या निवडणुकीचा निकाल २२ जून रोजी लागणार असून परभणी व हिंगोली जिल्ह्यातील राजकीय मंडळीचे याकडे लक्ष लागले आहे.

# एल निनोच्या संभाव्य संकटाच्या पार्श्वभूमीवर पशुपालकांनी चारा नियोजन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १९ जून**

जागतिक हवामान बदलामुळे निर्माण होणाऱ्या 'एल निनो'च्या संभाव्य प्रभावामुळे आगामी काळात चारा टंचाई निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेता राज्यातील सर्व पशुपालकांनी आतापासूनच चारा नियोजनाकडे विशेष लक्ष द्यावे, असे आवाहन पशुसंवर्धन आयुक्त डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

'एल निनो'मुळे उद्भवू शकणाऱ्या दुष्काळसदृश परिस्थितीचा पशुधन व दुग्धोत्पादनावर विपरीत परिणाम होऊ नये, यासाठी पशुपालकांनी पोषक व बहुउद्देशीय चारा पिकांची निवड करावी. गाई-म्हशींचे आरोग्य आणि दूध उत्पादन टिकवून ठेवण्यासाठी अशा पिकांची लागवड करणे आवश्यक आहे, ज्यातून मुख्य पीक उत्पादनाबरोबरच दर्जेदार चाऱ्याचीही उपलब्धता होईल, असे त्यांनी सांगितले.

शेतकऱ्यांनी शेताच्या बांधावरील किंवा पडीक जमिनीवरील नैसर्गिक गवताचे संवर्धन करून त्याचा योग्य वापर करावा. पावसाची कमतरता किंवा चारा टंचाईच्या काळात हेच गवत जनावरांसाठी महत्त्वाचे खाद्यस्रोत ठरू शकते. त्यामुळे उपलब्ध जमिनीवर मोठ्या प्रमाणावर चारा उत्पादन वाढविण्यावर भर द्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

उत्पादित अतिरिक्त चारा 'मुरघास' (सायलेज) किंवा सुक्या चाऱ्याच्या स्वरूपात साठवून ठेवण्याचा सल्लाही पशुसंवर्धन विभागाने दिला आहे. खरीप व रब्बी हंगामातील चारा पिकांचे सायलेज तंत्रज्ञानाद्वारे जतन केल्यास फेब्रुवारी ते जून २०२७ या संभाव्य टंचाईच्या कालावधीत जनावरांच्या खाद्याची गरज भागविणे शक्य होणार आहे.

पशुसंवर्धन विभागाच्या वतीने 'एल निनो'च्या संभाव्य परिणामांबाबत पशुपालक व शेतकरी बांधवांना विविध माध्यमांतून मार्गदर्शन करण्यात येत असून, पशुधनाच्या आरोग्य संरक्षणासाठी विभाग सज्ज असल्याचेही डॉ. पाटील यांनी स्पष्ट केले.

पशुपालकांनी कोणत्याही प्रकारच्या शंका किंवा अडचणींसाठी पशुसंवर्धन विभागाच्या १९६२ या कॉल सेंटर क्रमांकावर संपर्क साधून आवश्यक माहिती तसेच पशुवैद्यकीय सेवा प्राप्त कराव्यात, असे आवाहनही करण्यात आले आहे.

# खा. रामराव वडकुते यांच्याकडून शहरातील मान्यवरांच्या भेटी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १९ जून**




भारतीय जनता पक्षाच्या विशेष जनसंपर्क अभियानांतर्गत राज्यसभा खासदार रामराव वडकुते यांनी हिंगोली शहराचा दौरा करून विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या निवासस्थानी सदिच्छा भेटी दिल्या. या दौऱ्यात त्यांनी नागरिकांशी संवाद साधत केंद्र व राज्य सरकारच्या विविध लोककल्याणकारी योजनांची माहिती दिली आणि स्थानिक विषयांवर चर्चा केली.

या अभियानांतर्गत खा. रामराव वडकुते यांनी हिंगोली शहरातील प्रसिद्ध बालतज्ज्ञ डॉ. मुरलीधर तोष्णीवाल यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांची भेट घेतली. या भेटीदरम्यान वैद्यकीय क्षेत्रातील विविध विषय आणि शहरातील आरोग्य सुविधांबाबत त्यांनी चर्चा केली. त्यानंतर त्यांनी शहरातील प्रसिद्ध कंत्राटदार (कॉन्ट्रॅक्टर) प्रसन्न बडेरा तसेच प्रकाश सोनी यांचीही भेट घेऊन विविध विषयांवर सविस्तर संवाद साधला. शहरात विविध ठिकाणी सदिच्छा भेटी देऊन त्यांनी नागरिकांच्या अडीअडचणी जाणून घेतल्या. या विशेष जनसंपर्क दौऱ्यादरम्यान खासदार वडकुते यांच्यासोबत भाजपाचे ज्येष्ठ कार्यकर्ते संजय कावडे, जिल्हा प्रवक्ते विलास गोरे, शहराध्यक्ष रजनीश पुरोहीत, प्रशांत सोनी यांच्यासह भाजपचे इतर पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. या अभियानाला शहरवासीयांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या अभियानाला शहरातील व्यापारी, डॉक्टर्स, वकील यांनी उत्स्फूर्तपणे प्रतिसाद दिला आहे.

# शिरड शहापूर येथील पोलिस चौकी बंद, कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न

**तभा वृत्तसेवा**
**औंढा नागनाथ, १९ जून**




शिरड शहापूर परिसरातील दुरक्षेत्र पोलीस चौकीला कुलूप असल्याचे निदर्शनास आले असून चोवीस तास जनतेच्या सेवेत असलेल्या या चौकीला कुलूप असल्यामुळे गावात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास जबाबदार कोण असा प्रश्न गावकरी करीत आहेत.

औंढा तालुक्यातील शिरड शहापूर ही मोठी ग्रामपंचायत आहे. तसेच हे गाव संवेदनशील आहे. त्यामुळे गावात पोलिस विभागाने दुरक्षेत्र पोलिस चौकी उभारली आहे परंतु या चौकीला कुलूप असल्याचे दि १९ जून रोजी आढळून आले. अनेकवेळा पोलीस अधिकारी, कर्मचारी हजर राहत नाही त्यामुळे परिसरातील कायदा व सुव्यवस्था धोक्यात आली आहे. कर्मचाऱ्यांच्या अनुपस्थितीमुळे जनतेच्या कामाची हेळसांड होत आहे. गुन्हेगारीच्या घटनांमध्ये यामुळे वाढ होत आहे तसेच जनतेचे पासपोर्ट काढण्याचे अहवाल तसेच जन्म मृत्यू बाबत अहवाल ३ महिन्यापासून प्रलंबित आहेत.कागदपत्र आणण्याच्या नावाखाली कामात चालढकल करीत असल्याचा आरोप केल्या जात आहे. याकडे वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनी लक्ष देऊन सदरील पोलिस चौकी चोवीस तास जनतेच्या सेवेत कार्यरत करावी तसेच जनतेला न्याय द्यावा अशी मागणी नागरिकांमधून होत आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## नांदेड जिल्हा परिषद आरोग्य विभागाचा स्तुत्य उपक्रम; स्थलांतरित मजुरांसाठी 'आरोग्य साथी' प्रशिक्षण

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १९ जुन -**

नांदेड जिल्ह्यातील हजारो मजूर दरवर्षी आपल्या कुटुंबासह ऊसतोडीसाठी स्थलांतरित होतात. या स्थलांतरित ऊसतोड मजुरांच्या आरोग्याचे रक्षण करण्यासाठी आणि त्यांना फडावरच तातडीने प्राथमिक आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हा प्रशासनाच्यावतीने 'आरोग्य साथी' हा अत्यंत महत्त्वाचा उपक्रम राबवण्यात येत आहे.




नुकतेच नांदेड येथे 'आरोग्य साथी प्रशिक्षण पुस्तिका' आणि नियोजित आराखड्यानुसार 'आरोग्य साथी' प्रशिक्षण शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते. सदर प्रशिक्षण कार्यक्रम नांदेडचे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले आणि जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांच्या प्रेरणेने व मार्गदर्शनाखाली पार पडला. या कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्या वतीने करण्यात आले होते.

या विशेष आरोग्य शिक्षण व प्रशिक्षण कार्यक्रमाच्या अध्यक्षतेखाली अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सलमा हिराणी उपस्थित होत्या. प्रशिक्षण सत्रादरम्यान डॉ. सलमा हिराणी यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना 'आरोग्य साथी' उपक्रमाची गरज आणि मजुरांच्या आरोग्याविषयी सविस्तर माहिती दिली. स्थलांतरादरम्यान मजुरांना भेडसावणारे विविध आजार, लहान मुलांचे व महिलांचे आरोग्य, कुपोषण, तसेच फडावरच द्यावयाचे प्राथमिक उपचार आणि घ्यावयाची काळजी याविषयी त्यांनी सखोल मार्गदर्शन केले.

या प्रशिक्षण कार्यक्रमाला श्रीमती बेरलीकर (झक्छ - पब्लिक हेल्थ नर्स) व रफिक शेख (क - हेल्थ असिस्टंट) हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. त्यांनी आरोग्य साथींना तांत्रिक व व्यावहारिक कामांविषयी मोलाचे धडे दिले.

या प्रशिक्षणासाठी जिल्ह्यातील हदगाव, मुखेड आणि तुपा या भागांतून मोठ्या संख्येने 'आरोग्य साथी' (आरोग्य स्वयंसेवक) उपस्थित होते. प्रशिक्षणादरम्यान ७ सर्व आरोग्य साथींना आरोग्याची काळजी घेणे, प्रथमोपचार किटचा वापर करणे आणि गंभीर परिस्थितीत रुग्णांना जवळच्या आरोग्य केंद्रात किंवा रुग्णालयात रेफरल सेवा कशी उपलब्ध करून द्यायची, याचे शास्त्रशुद्ध प्रशिक्षण देण्यात आले.

जिल्हा परिषद नांदेडच्या आरोग्य विभागामार्फत राबविल्या जाणाऱ्या या विशेष उपक्रमामुळे स्थलांतरित ऊसतोड मजुरांच्या आरोग्य सुविधेत मोठी सुधारणा होईल, असा विश्वास या प्रसंगी व्यक्त करण्यात आला.

## नांदेड विधान परिषद द्विवार्षिक निवडणूक किनवटमध्ये १०० टक्के मतदान

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. १९ जुन -**

नांदेड विधान परिषद द्विवार्षिक निवडणूक २०२६ च्या अनुषंगाने किनवट तहसील कार्यालय येथे स्थापन करण्यात आलेल्या मतदान केंद्रावर गुरुवारी शांततापूर्ण व उत्साहपूर्ण वातावरणात मतदान प्रक्रिया पार पडली. या मतदान केंद्रावरील सर्व ४१ मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावल्याने १०० टक्के मतदानाची नोंद झाली. मतदान प्रक्रिया सुरळीत, पारदर्शक व नियमानुसार पार पाडण्यासाठी मतदान केंद्राध्यक्ष तथा तहसीलदार डॉ. शारदा चौंडेकर यांच्या नेतृत्वाखाली निवडणूक यंत्रणेने आवश्यक नियोजन केले होते. यावेळी मतदान अधिकारी चंद्रशेखर सहारे, मुकेश कोल्हे आणि अवधूत बोडखेवाड यांनी मतदानाची संपूर्ण प्रक्रिया यशस्वीपणे पार पाडली. मतदारांची ओळख पडताळणी करण्यासाठी किनवट नगर परिषद येथील अधिकारी अल्ताफ गफुर शेख तसेच सेवक वैजयंता सोनकांबळे यांची नियुक्ती करण्यात आली होती. त्यांनी मतदारांची ओळख निश्चित करून मतदान प्रक्रिया सुरळीत पार पडण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावली. मतदान केंद्रावर कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलिस प्रशासनाकडून चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.



उपविभागीय पोलिस अधिकारी रामकृष्ण मळघणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक गणेश कराड, दोन पोलिस उपनिरीक्षक आणि २३ पोलिस कर्मचारी बंदोबस्तासाठी तैनात करण्यात आले होते. मतदान केंद्र परिसरात सुरक्षा व्यवस्था कडक ठेवण्यात आल्याने मतदान प्रक्रिया कोणत्याही अडथळ्याविना पार पडली. निवडणूक प्रशासन, नगर परिषद कर्मचारी आणि पोलिस विभाग यांच्या समन्वयामुळे संपूर्ण मतदान प्रक्रिया शांततापूर्ण वातावरणात यशस्वीरित्या पूर्ण झाली. सर्व ४१ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावल्याने किनवट मतदान केंद्राने १०० टक्के मतदानाची उल्लेखनीय नोंद केली असून, लोकशाही प्रक्रियेप्रती मतदारांनी दाखविलेल्या सजगतेचे सर्व स्तरांतून स्वागत करण्यात येत आहे.

### गोविंदराजचे सी. ए. परिक्षेत नेत्रदीपक यश

**उमरी** -शहरातील नावाजलेल्या इंग्रजी माध्यमाचे मॉडर्न इंग्लिश स्कूलमध्ये प्राथमिक शिक्षण घेऊन नंतर तेलंगणा राज्यातील निजामाबादला पुढील शिक्षण घेतलेले विद्यार्थी गोविंदराज गजानन बच्चेवार मुगळीकर यांनी सी. ए. सारखी कठीण परिक्षा पहिल्याच झटक्यात पास करून शाळेचे, पालकांचे व शहराचे नावलौकिक केले आहे. त्याचे ह्या यशाबद्दल गोविंदराजचे आणि त्यांचे पालकांचा मॉडर्न इंग्लिश स्कूल व कनिष्ठ महाविद्यालय उमरी येथे उमरीचे माजी नगराध्यक्ष संजय कुलकर्णी, सौ. अनुराधा कुलकर्णी यांनी सत्कार करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. ह्याप्रसंगी शाळेतील शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी टाळ्यांचा गजरात गोविंदराजचे अभिनंदन करून त्याचे सारखी मेहनत घेऊन आभ्यास करण्याची प्रतिज्ञा घेतली.



### श्री गुरु हरगोविंद साहिब महाराज जयंतीनिमित्त विविध कार्यक्रम

**नांदेड** -नांदेड शिख धर्माचे सहावे धर्मगुरू श्री हरगोविंद साहिबजी यांच्या ४३१ व्या जयंती निमित्त दि.२५जून ते ३०जून दरम्यान विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. श्री गुरू ग्रंथ साहिबजी, श्रीदसम ग्रंथ साहिब जी, श्री सरबलोह ग्रंथ साहिबजी श्री चौपई साहिबचे पाठ होणार आहे. नगरकिर्तनाने कार्यक्रमांचा समारोप होणार आहे, अशी माहिती हजुरी साथ संगत व हजुरी क्रांती सघटनांचे अध्यक्ष मनप्रीत सिंघ कुंजीवाले यांनी दिली आहे. गुरुद्वाराचे मुख्य जत्थेदार संत बाबा कुलवंत सिंघजी, समुह पंजप्यारे साहिब यांच्या आशीर्वादाने व बाबा नरिदंरसिंघजी, संत बाबा बलविंदर सिंघ लंगर साहिब (कार सेवा वाले) व माता साहिब देवाजीचे जत्थेदार बाबा तेजासिंघ यांच्या संयुक्त विद्यमाने गुरू हरगोविंद साहिब यांच्या जंयतीनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. सहाववे गुरु हरगोविंद साहिबजी यांची जयंती २४ जून रोजी साजरी करण्यात येत आहे. त्या निमित्ताने फतेह सिंघजी मंगल कार्यालय अबचल नगर कॉलनी येथे सात दिवस दर रोज कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. दुपारी ३.३० ते ५ वाजेपर्यंत सुखमनी साहिबचा पठण आणि रात्री ८ ते ९ वाजेपर्यंत श्री गुरु हरगोबिंद साहिब यांचे जीवनचरित्र, कथाकार, ज्ञानी सरबजीत सिंग निर्मले आणि ज्ञानी नाहर सिंघ हे सादर करणार आहेत. दररोज कथेच्या नंतर सायंकाळी ९ ते ९.३० पर्यंत नाम सिमरणचे पाठ होणार असून त्यानंतर लंगर प्रसादाचे आयोजन केले आहे. दि. २५जून व २६ जून रोजी सकाळी ११ वाजता गतका प्रतियोगिता व दि. २७ जून ते २८ जूनपर्यंत चेस प्रतियोगिताचे आयोजन करण्यात आले आहे. दि. ३०जून रोजी सप्ताह पाठच्या समाप्ती होईल. या कार्यक्रमांना सर्व साथ संगतने मोठ्या प्रमाणात उपस्थित राहून कार्यक्रम व लंगर प्रसादाचा लाभघेऊन महाराजांचे आशिवार्द प्राप्त करावेत, असे आवाहन हजुरी क्रांती संघटनेच्या वतीने करण्यात आले आहे.

### मराठवाडा क्रिकेट अकॅडमीचा खेळाडू शाश्वत भुयारे याची चमकदार कामगिरी

**नांदेड** -येथील मराठवाडा क्रिकेट अकॅडमीचा १४ वर्षाखालील वयोगटातील खेळाडू तथा श्रीचैतन्य टेक्नो स्कूलचा/किड्स किंग्डम पब्लिक स्कूलचा विद्यार्थी शाश्वत सदाशिव भुयारे हा पुणे येथे सुरू असलेल्या महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनसाठी १४ वर्षाखालील वयोगटातील निवड चाचणी सामन्यात इन्फिनिटी क्रिकेट ग्राउंड मावळ पुणे येथे पारसी जिमखाना पुणे ब या संघाकडून खेळताना पहिल्या डावात ९१ चेंडूचा सामना करताना ७ नेत्रदीपक व तंत्रशुद्ध चौकार लगावत नाबाद ५२ धावांची निर्णायक खेळी केली. तर दुसऱ्या डावात ३६ चेंडूचा सामना करताना ३ नेत्रदीपक व तंत्रशुद्ध चौकार लगावत २० धावांची निर्णायक खेळी केल्यामुळे पारसी जिमखाना ब या संघाने पारसी जिमखाना अ या संघावर निर्णायक विजय मिळवला. शाश्वत भुयारे यांच्या यशाबद्दल मराठवाडा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष प्रा. सदाशिव रा.भुयारे, मराठवाडा क्रिकेट अकॅडमीचे संचालक माधव भुयारे, मोनिका लेडीज फिटनेस क्लबच्या संचालिका मोनिका नांदेडकर, मराठवाडा क्रिकेट अकॅडमीचे सर्व प्रशिक्षक व व्यवस्थापकीय टीम आणि किड्स किंग्डम पब्लिक स्कूल/ श्री चैतन्य टेक्नो स्कूल खुरगाव या शाळेच्या प्राचार्य आणि शाळेतील सर्व स्टाफ मेंबर्सने शाश्वत भुयारे यांचे अभिनंदन केले.

### देगलूर नाका भागातील वीज प्रश्नांवर राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे निवेदन

**नांदेड** -देगलूर नाका सब स्टेशन विभागांतर्गत अन्सार कॉलनी, इस्माईल बाग, इस्लामपुरा, परिसरासह विविध भागांमध्ये सुरू असलेल्या गंभीर विद्युत समस्यांबाबत राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस शरदचंद्र पवारचे जिल्हाध्यक्ष फैसल सिद्दीकी यांच्यातर्फे महावितरणच्या कार्यकारी अभियंत्यांना निवेदन देण्यात आले आहे.

**टि.सी हरवली .**

कु . प्रतिक्षा पांडुरंग गोडगे रा गोरठा ता उमरी या नावाची इयत्ता १२ वी विज्ञान शाखेची मुळ टि.सी व इतर महत्वाचे कागदपत्रे उमरी ते नांदेड रेल्वे प्रवासात हरवले आहेत कोणाला सापडल्यास संपर्क करावा .

**संपर्क पत्ता**
प्रतिक्षा पांडूरंग गोडगे रा गोरठा ता उमरी जी नांदेड
मो . नंबर ९४०५५१५४७२

## अन्न व औषध प्रशासनाची कारवाई दहा लाखांचा मुद्देमाल जप्त

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १९ जुन -**

अन्न व औषध प्रशासन, आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या निर्देशान्वये गुटखा-पानमसाला या प्रतिबंधित खाद्य पदार्थाची नांदेड शहरात गुप्त माहितीच्या आधारे शोध घेवून गुरुवार १८ जून रोजी मे. गोल्डन जर्दा स्टोअर्स, पैलवान टी हाऊस जवळ, इतवारा नांदेड या पेढीवर धाड टाकण्यात आली. सदर धाडीमध्ये एकूण ३४ प्रकारच्या प्रतिबंधित खाद्यपदार्थाचा साठा ज्यामध्ये रजनीगंधा पानमसाला, विमल पानमसाला, राजनिवास सुगंधीत पानमसाला, सागर पानमसाला, मुसाफीस पानमसाला, गोवा १०००, आरएमडी पानमसाला, व्हीवन चेविंग टोबॅको, मिराज जाफरानी जर्दा, वजीर गुटखा, एम सेटेंड टोबॅको,सिंगनिचर पानमसाला इत्यादि ९ लाख ८६ हजार ०१७ रूपये एवढया किंमतीचा प्रतिबंधित अन्न पदार्थाचा साठा जप्त करण्यात आला.



विक्रेता व पुरवठादार अशा एकूण ०२ व्यक्तींविरूध्द इतवारा पोलीस स्टेशन, नांदेड येथे प्रथम खबरी अहवाल क्रमांक ०२०९/२०२६ दि. १९ जून २०२६ नोंदविण्यात आला असून सदरील पेढी सिल करण्यात आलेली असून पुढील तपास इतवारा पोलीसांमार्फत करण्यात येत आहे.

सदर कारवाई अन्न सुरक्षा अधिकारी श्रीमती अमृता दुधाटे, अरूण तम्मडवार, अ. नं. गिरी, श्रीमती शिल्पा श्रीरामे, तुषार घोपे, कृष्णा मुळे व वैभव ढोंबरे यांच्या पथकाने सहायक आयुक्त रा. मा.भरकड व अनंत चौधरी यांचे व छत्रपती संभाजीनगर विभागाचे सह आयुक्त (अन्न) श्रीकांत करकाळे यांचे मार्गदर्शखाली पार पाडण्यात आली.

## नीट (युजी) परीक्षा केंद्र परिसरात प्रतिबंधात्मक आदेश

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १९ जुन -**

छएएढ-णऋ-२०२६ फेर प्रवेश परीक्षा रविवार २१ जून २०२६ रोजी दुपारी २ ते ५ या कालावधीत जिल्ह्यातील विविध ४२ परीक्षा केंद्रावर घेण्यात येणार आहे. या केंद्रापासून ५०० मिटरच्या परिसरात २१ जून रोजी सकाळी ८ ते सायं ७ वाजेपर्यंतच्या कालावधीत परीक्षार्थी व परीक्षेच्या कामाशी संबंधीत असलेले अधिकारी-कर्मचारी या व्यक्तीरीक्त इतर कोणत्याही व्यक्तीस प्रवेश करता येणार नाही. भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ नुसार पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी याबाबतचा आदेश १७ जून २०२६ रोजी निर्गमीत केला आहे.

या परीक्षेच्या कामाशी संबंधीत असलेले अधिकारी-कर्मचारी याव्यतिरिक्त इतर कोणत्याही व्यक्तीस कॅलक्युलेटर, ट्रॅन्झीस्टर, रेडिओ, लॅपटॉप आदी तत्सम साहित्य परीक्षा केंद्राच्या ५०० मिटर पर्यंत परिसरात वापरण्यास व जवळ बाळगण्यास, परीक्षा केंद्रात नेण्यास त्याचप्रमाणे दर्शविलेल्या कालावधीत परीक्षा केंद्राच्या परिसरातील ५०० मीटर पर्यंतची सर्व सार्वजनिक टेलिफोन्स,एस. टी.डी., आय.एस.डी., भ्रमणध्वनी, फॅक्स, झेरॉक्स, पेजर आणि ध्वनिक्षेपक चालू ठेवण्यास याद्वारे प्रतिबंध करण्यात आले आहे.

## राहेर ग्रामपंचायत इमारतीच्या निकृष्ट बांधकामाची चौकशी करण्याची मागणी

**तभा वृतसेवा**
**नरसी, दि. १९ जुन -**

नायगाव तालुक्यातील राहेर येथील नव्याने उभारण्यात येत असलेल्या ग्रामपंचायत इमारतीचे बांधकाम अत्यंत निकृष्ट दर्जाचे होत असल्याचा गंभीर आरोप करत गावातील नागरिक प्रकाश नारायणराव सोनकांबळे यांनी जिल्हाधिकारी नांदेड यांच्याकडे लेखी तक्रार दाखल केली आहे. सदर बांधकामाची तात्काळ तांत्रिक चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी त्यांनी केली आहे.

तक्रारीनुसार, राहेर गावातील नवीन ग्रामपंचायत इमारतीचे बांधकाम ग्रामपंचायतीच्या माध्यमातून सुरू असून या कामात दर्जेदार साहित्याचा वापर न करता निकृष्ट साहित्य वापरले जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे ही इमारत भविष्यात धोकादायक ठरू शकते व केव्हाही कोसळण्याची शक्यता असल्याची भीती ग्रामस्थांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

तक्रारदाराने पुढे म्हटले आहे की, ग्रामपंचायतीचे सरपंच व्यंकटराव गंगाराम नरवाडे हे स्वतःच या बांधकामात प्रत्यक्ष सहभाग घेत असून ग्रामसेवकांच्या संगनमताने मंजूर निधीपेक्षा कमी खर्चात काम करून मोठ्या प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार करण्यात येत आहे. शासनाने मंजूर केलेल्या निधीचा योग्य वापर न करता काम कमी खर्चात करून उर्वरित निधीचा अपहार केल्याचा आरोपही तक्रारीत करण्यात आला आहे.

ग्रामस्थांनी यापूर्वी संबंधित अधिकाऱ्यांकडे तोंडी तक्रारी केल्या होत्या. मात्र, त्याकडे दुर्लक्ष करण्यात आल्याने अखेर जिल्हाधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार देण्याची वेळ आल्याचे तक्रारदाराने नमूद केले आहे.

सदर प्रकरणाची सखोल चौकशी करून बांधकामाचा दर्जा तपासण्यात यावा, तसेच दोषी आढळणाऱ्या संबंधित अधिकारी, सरपंच व बांधकामाशी संबंधित व्यक्तींवर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी तक्रारदार प्रकाश सोनकांबळे यांनी केली आहे.

या तक्रारीची प्रत तहसीलदार नायगाव तसेच गटविकास अधिकारी, पंचायत समिती नायगाव यांनाही देण्यात आली असून, प्रशासन या प्रकरणात काय भूमिका घेते याकडे राहेर ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

**नागरिकांची चौकशीची मागणी**

ग्रामपंचायत ही गावाच्या विकासाचे केंद्र असते. अशा संस्थेच्या इमारतीचे बांधकामच निकृष्ट दर्जाचे होत असेल तर हा सार्वजनिक निधीचा अपव्यय आहे. त्यामुळे तांत्रिक समितीमार्फत बांधकामाची तपासणी करून सत्य समोर आणावे,अशी मागणी तक्रारदार प्रकाश नारायणराव सोनकांबळे यांनी केली आहे.

## शिवसेना पक्षाचा ६० वा वर्धापन दिन उत्साहात साजरा



**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १९ जुन -**

विधान परिषद गटनेते हेमंत पाटील यांचे जनसंपर्क कार्यालय, किनवट येथे शिवसेना पक्षाचा ६० वा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात व जल्लोषपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.

यावेळी शिवसेनाप्रमुख हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तसेच पक्षाच्या स्थापनेपासून आजपर्यंतच्या गौरवशाली वाटचालीचा आढावा घेण्यात आला. उपस्थित शिवसैनिकांनी शिवसेनेच्या विचारांप्रती निष्ठा व्यक्त करत पक्ष संघटना अधिक बळकट करण्याचा संकल्प केला.

कार्यक्रमात शिवसेना पक्षप्रमुख तथा महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली पक्षाची होत असलेली प्रगती, सर्वसामान्य जनतेसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध विकासकामांबाबत माहिती देण्यात आली. तसेच आगामी काळात पक्ष संघटना तळागाळापर्यंत मजबूत करण्यासाठी सर्वांनी एकजुटीने कार्य करण्याचे आवाहन करण्यात आले.

या प्रसंगी शिवसेनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते, युवा सेना पदाधिकारी, तसेच अनेक शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. घोषणाबाजी, पक्षगीत आणि एकमेकांना शुभेच्छा देत शिवसेना पक्षाचा ६० वा वर्धापन दिन उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

यावेळी पंचायत समितीचे माजी सभापती मारोतराव सुंकलवाड, उपतालुकाप्रमुख घनश्याम कऱ्हाळे, सर्कल प्रमुख साहेबराव पळसपुरे,युवासेना शहर प्रमुख साई पालेपवाड,उपसंघटक अरविंद कदम, बबन वानखेडे, युवासेना उपतालुकाप्रमुख विक्रांत दगुलवार, उपसरपंच परमेश्वर कदम, ओमप्रकाश नरवाडे,नागेश कदम, बालाजी लांबाटे, सुनील वाठोरे, जयवंत देवठाणकर, सुरेश कऱ्हाळे, विपीन पवार, तेजस जाधव, अनुराग ठोंबरे, करण जाधव, सागर रुणवाल, किरण येरमे आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी आ.हेमंत पाटील यांचे जनसंपर्क अधिकारी सुनिल गरड यांनी परिश्रम घेतले.

## 'एल निनो'च्या पार्श्वभूमीवर पशुपालकांनी चारा नियोजनाकडे विशेष लक्ष द्यावे

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १८ जुन -**

जागतिक हवामान बदलाचा परिणाम म्हणून निर्माण होणाऱ्या 'एल निनो'च्या संभाव्य संकटामुळे आगामी काळात चारा टंचाई निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या परिस्थितीचा पशुधन व दुग्धोत्पादनावर विपरीत परिणाम होऊ नये, यासाठी राज्यातील सर्व पशुपालकांनी आतापासूनच सतर्क राहून चारा पिकांचे नियोजन करावे, असे आवाहन मा. आयुक्त पशुसंवर्धन डॉ. किरण पाटील (भा.प्र.से.) यांनी केले आहे.

पशुपालकांना या संकटाचा सामना समर्थपणे करता यावा, यासाठी पशुसंवर्धन विभागाच्या वतीने पशुपालक व शेतकरी यांना पोषक व बहुउद्देशीय चारा पिकांची निवड करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. गाई व म्हशींच्या उत्तम आरोग्यासाठी आणि दूध उत्पादनात घट होऊ नये म्हणून पशुपालकांनी पोषक असणाऱ्या चारा पिकांची लागवड करावी. अशी पिके निवडावीत ज्यातून मुख्य शेतमाल (धान्य/उत्पादन) तर मिळेलच, सोबतीला जनावरांच्या पोषणासाठी दर्जेदार चाराही उपलब्ध होईल.

शेतकऱ्यांनी आपल्या शेताच्या बांधावर अथवा पडीक जमिनीवर येणारे नैसर्गिक गवत वाया न घालवता त्याचे योग्य जतन करावे. पावसाची ओढ किंवा टंचाईच्या संकट काळात हेच गवत जनावरांसाठी अत्यंत महत्त्वाचा आणि मोलाचा आधार ठरणार आहे. भविष्यातील संभाव्य टंचाई टाळण्यासाठी शेतकऱ्यांनी आपल्या उपलब्ध जमिनीवर मोठ्या प्रमाणावर चारा उत्पादनावर भर द्यावा. उत्पादित केलेला अतिरिक्त चारा 'मुरघास' किंवा सुक्या चाऱ्याच्या स्वरूपात साठवून ठेवावा, जेणेकरून जनावरांच्या खाद्याचा प्रश्न निर्माण होणार नाही.

पशुसंवर्धन विभागामार्फत 'एल निनो'च्या संभाव्य संकटाचा सामना करण्यासाठी पशुपालक-शेतकरी बांधवांना विविध माध्यमातून मार्गदर्शन करण्यासाठी विभागाच्या वतीने नियोजन करण्यात येत आहे. या संभाव्य संकटकाळात पशुधनाची काळजी घेण्यासाठी पशुसंवर्धन विभाग सक्षम असून, कोणत्याही शंका तसेच अडचणी संदर्भात पशुपालकांनी १९६२ या कॉल सेंटर नंबरवरुन माहिती व पशुवैद्यकीय सेवा प्राप्त करुन घ्याव्यात, असे आवाहन पशुसंवर्धन विभागामार्फत करण्यात येत आहे.

शेतकऱ्यांना आवाहन करण्यात येते की, त्यांनी अशी पिके घ्यावीत जी तीव्र टंचाईच्या काळात पशुखाद्य (चारा) म्हणूनही उपयुक्त ठरतील; तसेच चाऱ्याची नासाडी न करता त्याचा प्रभावी वापर व व्यवस्थापन करावे. त्याचबरोबर, खरीप आणि रब्बी हंगामातील चारा पिके साठवून ठेवण्यासाठी 'सायलेज' (ीळश्ररसश) तंत्रज्ञानाचा वापर करावा; जेणेकरून फेब्रुवारी ते जून २०२७ या टंचाईच्या काळात त्याचा वापर करता येईल. एल निनोच्या सावटामुळे उद्भवणाऱ्या संभाव्य टंचाईचा फटका आपल्या पशुधनाला बसू नये, ही आपली प्राथमिकता असली पाहिजे. योग्य नियोजन, पोषक चारा पिकांची निवड व उपलब्ध चाऱ्याची साठवणूक करून आपण पशुधनाचे पोषण आणि आपले आर्थिक उत्पन्न दोन्ही सुरक्षित ठेवू शकतो. सर्व पशुपालकांनी या आवाहनाचा गांभीर्याने विचार करून तातडीने अंमलबजावणी करावी असे आवाहन करण्यात आले आहे.

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## शिवछत्रपती प्रतिष्ठानतर्फे गुणवंत विद्यार्थी व कर्मचाऱ्यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**येरोळा, दि.१९ जून -**

शिवछत्रपती प्रतिष्ठान, शेंद (पश्चिम) ता. शिरूर अनंतपाळ यांच्या वतीने आयोजित ८ वा गुणवंत विद्यार्थी व सेवानिवृत्त कर्मचारी सत्कार सोहळा दि. १४ जून रोजी हनुमान मंदिर सभागृहात उत्साहात पार पडला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उद्धव बाबुराव कावळे हे होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून माणिकराव गायकवाड, तुकाराम लांडगे आणि डॉ. गणेश नरवाडे उपस्थित होते.

यावेळी दहावीतील गुणवंत विद्यार्थ्यांसह नवोदय विद्यालयातील विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला.

तसेच सेवानिवृत्त कर्मचारी व वैद्यकीय क्षेत्रात उल्लेखनीय काम गिरी करणाऱ्यांचा फेटा, शाल, पुस्तक व ट्रॉफी देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी मान्यवरांनी विद्यार्थ्यांना शिक्षण, करिअर आणि जीवनातील यशाबाबत मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रतिष्ठानचे अध्यक्ष लिंबराज मनोहर माने यांनी केले.



## संक्षिप्त वृत्त...

### गायक हावगी पन्नासे यांना स्वर भास्कर पुरस्कार

**उदगीर, दि.१९ जून -**

सुप्रसिद्ध गायक तथा स्वरशिरोमणी श्री हावगी उत्तमराव पन्नासे यांना मानाचा स्वर भास्कर पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. सोलापूर येथील बृहन्मठ होटगी, अक्कलकोट रोडवरील वीरतपस्वी मंदिरात आयोजित धार्मिक सोहळ्यात विविध महास्वामीजींच्या दिव्य सानिध्यात हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.महाराष्ट्रातील अनेक शिवाचार्य, कीर्तनकार, प्रवचनकार, गायक, वादक, साहित्यिक तसेच हजारो भक्त यावेळी उपस्थित होते. अध्यात्म, समाजप्रबोधन, देव-देश-धर्म, अखंड शिवनाम सप्ताह व मठ परंपरेसाठी गायनाच्या माध्यमातून केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन त्यांना हा सन्मान प्रदान करण्यात आला.

### लातूर जिल्ह्यात ३ जुलैपर्यंत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश लागू

**लातूर, दि.१९ जून -**

कायदा व सुव्यवस्था तसेच सार्वजनिक शांतता व सुरक्षितता अबाधित राखण्यासाठी अप्पर जिल्हा दंडाधिकारी केशव नेटके यांनी संपूर्ण लातूर जिल्ह्यात १९ जून ते ३ जुलैदरम्यान शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश लागू केले आहेत. या कालावधीत शस्त्रे, दंडे, तलवारी, काठ्या तसेच स्फोटक किंवा दाहक पदार्थ बाळगण्यास मनाई करण्यात आली आहे. तसेच पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तींना एकत्र जमणे, मिरवणुका काढणे, घोषणा देणे तसेच सार्वजनिक शांततेला बाधा पोहोचेल अशा कृतींवर बंदी घालण्यात आली आहे.

### टीईटी परीक्षेसाठी लातूरमध्ये परीक्षा केंद्र परिसरात प्रतिबंधात्मक आदेश

**लातूर, दि.१९ जून -**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत आयोजित महाराष्ट्र राज्य शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) रविवार, २८ जून २०२६ रोजी लातूर जिल्ह्यातील ४१ परीक्षा केंद्रांवर दोन सत्रांमध्ये घेण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी परीक्षा केंद्र परिसरात भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ च्या कलम १६३ अंतर्गत प्रतिबंधात्मक आदेश लागू केले आहेत. आदेशानुसार परीक्षा केंद्र परिसरात पाच किंवा अधिक व्यक्तींना एकत्र येण्यास, घोषणा देण्यास तसेच शांततेला बाधा पोहोचवणाऱ्या कृतींना बंदी घालण्यात आली आहे. परीक्षा केंद्राच्या शंभर मीटर परिसरातील झेरॉक्स सेंटर, पानटपरी, टायपिंग सेंटर, एसटीडी बूथ आणि ध्वनिक्षेपक सेवा बंद ठेवण्यात येणार आहेत. हे आदेश २८ जून रोजी सकाळी ८ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत लागू राहणार असून परीक्षा अधिकारी, कर्मचारी व पोलीस कर्मचाऱ्यांना यामधून वगळण्यात आले आहे.

### लालबहादूर शास्त्री विद्यालयात उत्साहात प्रवेशोत्सव संपन्न

**उदगीर, दि.१९ जून -**

शासनाच्या निर्देशानुसार लालबहादूर शास्त्री माध्यमिक विद्यालय, उदगीर येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ चा प्रवेशोत्सव उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. नवीन शैक्षणिक वर्षाच्या स्वागतासाठी विद्यालय परिसर आकर्षक सजावटीने नटला होता. घोष पथकाच्या वादनाने व प्रवेश जागरण फेरीने कार्यक्रमाची सुरुवात झाली. ढोल-ताशांच्या गजरात नवागत व जुन्या विद्यार्थ्यांचे औक्षण करून पुष्पवृष्टीद्वारे स्वागत करण्यात आले. प्रार्थना सभेत विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके, अहिल्यादेवी मोफत पास तसेच शैक्षणिक साहित्याचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमास स्थानिक कार्यवाह शंकरराव लासूने, स्थानिक अध्यक्ष मधुकरराव वट्टमवार, वृक्षमित्र डॉ. येरमे, मुख्याध्यापक शैलेंद्र कंगळे यांच्यासह शिक्षक, कर्मचारी, पालक व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी मुख्याध्यापक शैलेंद्र कंगळे यांनी विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक वर्षाच्या शुभेच्छा देत शिक्षणासोबत संस्कार, क्रीडा व सर्वांगीण विकासाचे महत्त्व अधोरेखित केले. शासनाच्या सर्व मार्गदर्शक सूचनांचे पालन करून प्रवेशोत्सव यशस्वीरित्या पार पडला.

# विनाअट कर्जमुक्ती व पीकविम्याच्या मागणीसाठी लातुरात आंदोलन

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.१९, जून -**

शेतकऱ्यांना विनाअट सरसकट कर्जमुक्ती मिळावी तसेच हक्काचा पीकविमा मिळावा या मागणीसाठी शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी अन्नत्याग आंदोलन सुरू करण्याचा निर्णय घेतला असून, त्यांच्या आंदोलनाला समर्थन देत लातूर येथे क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या वतीने प्रदेशाध्यक्ष राजीव कसबे यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन करण्यात आले.



यावेळी आंदोलकांनी राज्य शासनाने नुकताच जाहीर केलेल्या कर्जमुक्तीच्या निर्णयात अनेक अटी व शर्ती घालण्यात आल्याचा आरोप केला. त्यामुळे शेतकऱ्यांना या निर्णयाचा अपेक्षित लाभ मिळणार नसल्याचे त्यांनी सांगितले. तसेच उद्योगपतींची मोठी कर्जे माफ केली जात असताना शेतकऱ्यांसाठी मात्र कठोर अटी लागू करण्यात येत असल्याची भावना आंदोलकांनी व्यक्त केली.

शेतीमालाला योग्य भाव, पीकविमा आणि कर्जमुक्ती यांसारख्या प्रश्नांकडे शासनाने गांभीर्याने लक्ष द्यावे, अशी मागणी आंदोलकांनी केली. शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांवर सरकारने तातडीने उपाययोजना कराव्यात तसेच रविकांत तुपकर यांच्या अन्नत्याग आंदोलनाची दखल घ्यावी, असेही यावेळी आंदोलकांनी सांगितले.

आंदोलनात राजीव कसबे, सत्तार पटेल, राजेंद्र आबा मोरे, अरुण दादा कुलकर्णी, नवनाथ शिंदे, प्रज्योत हुडे, शाम जाधव, सतीश राठोड, इमाम सय्यद, विशाल ढोबळे, बालाजी सूर्यवंशी, गौतम कांबळे, दत्ता किणीकर, आदेश कसबे, बालाजी हौळ पाटील, मारुती कसबे, धनराज घुटे, सावन गवळी, शिवाजी कसबे, प्रवीण गायकवाड, सतीश चोरमले, एम.एम. जगताप, बबलू शेख, आकाश घुटलकर यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.

### रविकांत तुपकरांच्या जीवितास धोका : राजीव कसबे

देशात कायदा व सुव्यवस्था बिघडलेली असून सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या नेत्यांवर पाळत ठेवली जात असल्याचा आरोप क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष राजीव कसबे यांनी केला आहे. रविकांत तुपकर यांना अडचणीत आणून त्यांचा आवाज दाबण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा आरोपही त्यांनी केला. रविकांत तुपकर यांच्या जीवितास कोणतीही हानी पोहोचल्यास राज्यात तीव्र जनआक्रोश उसळू शकतो व लोक कायदा हातात घेण्याची परिस्थिती निर्माण होईल, असा इशारा देत सरकारने तातडीने हस्तक्षेप करून मार्ग काढावा, अन्यथा राज्यभर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा राजीव कसबे यांनी दिला.

## उष्माघाताच्या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषद शाळा सकाळच्या सत्रात भरवाव्यात



**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.१९, जून -**

जिल्ह्यातील तीव्र उन्हाळा, वाढते तापमान, पाणीटंचाई आणि उष्माघाताच्या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषद शाळा सकाळच्या सत्रात भरविण्यात याव्यात, अशी मागणी शिक्षक व शिक्षकेत्तर संघटना समन्वय समितीने जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना यांच्याकडे केली आहे.

समितीने दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, ग्रामीण आणि शहरी भागातील अनेक शाळांमधील विद्यार्थ्यांना दुपारच्या सत्रात प्रखर उन्हाचा सामना करावा लागत आहे. तसेच अनेक ठिकाणी पिण्याच्या पाण्याची कमतरता जाणवत असल्याचेही नमूद करण्यात आले आहे.

**लातूर जिल्ह्यातील शिक्षक संघटनांची मागणी...**

शाळांकडून प्राप्त माहितीनुसार काही विद्यार्थ्यांना उष्णतेमुळे चक्कर येणे, डोकेदुखी, अशक्तपणा, मळमळ होणे आणि थकवा जाणवणे अशा आरोग्यविषयक समस्या उद्भवत असल्याचे समितीने म्हटले आहे. काही विद्यार्थ्यांना वैद्यकीय उपचारांची गरजही भासत असल्याचा दावा करण्यात आला आहे. लहान वयातील विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर वाढत्या उष्णतेचा विपरीत परिणाम होण्याची शक्यता असल्याने सध्याच्या हवामान परिस्थितीत दुपारच्या सत्रात शाळा सुरू ठेवणे विद्यार्थ्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने धोकादायक ठरू शकते, असे समितीने नमूद केले आहे.

दरम्यान, राज्यातील काही जिल्हा परिषदांनी वाढत्या तापमानाचा आणि उष्माघाताच्या धोक्याचा विचार करून शाळा सकाळच्या सत्रात भरविण्याचे निर्णय घेतले असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

त्यामुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा विचार करून लातूर जिल्ह्यातही तातडीने याबाबत निर्णय घ्यावा, अशी मागणी शिक्षक व शिक्षकेत्तर संघटना समन्वय समितीने केली आहे.

## लातूर जिल्ह्यात २१ जून रोजी आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा होणार

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.१९, जून -**


आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त लातूर जिल्ह्यात २१ जून रोजी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथे जिल्हास्तरीय मुख्य कार्यक्रम पार पडणार आहे. या कार्यक्रमाच्या पूर्वतयारीचा आढावा घेण्यासाठी जिल्हाधिकारी डॉ. बास्टेवाड यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली.

यावेळी जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त आयोजित करण्यात येणाऱ्या कार्यक्रमांमध्ये नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन केले. तसेच योगाचे महत्त्व जनसामान्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. बैठकीस उपजिल्हाधिकारी सायली ठाकूर, जिल्हा क्रीडाधिकारी महादेव कसगावडे, जिल्हा आयुष अधिकारी डॉ. सुधीर बनशेळकीकर यांच्यासह योग विषयक विविध संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते. यावर्षीच्या आंतरराष्ट्रीय योग दिनाची अधिकृत संकल्पना निरोगी वृद्धत्वासाठी योग अशी निश्चित करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर २१ जून रोजी सकाळी ७ ते ७.४५ या वेळेत सामूहिक योग अभ्यासाचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमात जिल्ह्यातील विद्यार्थी, युवक-युवती, ज्येष्ठ नागरिक तसेच सर्व नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी केले आहे.

## मान्सूनच्या प्रतीक्षेत लातूरकर; पारा ३८ अंशांवर स्थिर

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.१९, जून -**

पावसाळ्याचा कालावधी सुरू होऊन पंधरा दिवस उलटले असतानाही लातूर जिल्ह्यात अद्याप मान्सूनचे समाधानकारक आगमन झाले नसल्याने उन्हाळ्यासारखी परिस्थिती कायम आहे. मागील तीन दिवसांपासून शहरातील तापमान ३८ अंश सेल्सिअसच्या आसपास स्थिरावले असून, उकाड्यामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. पावसाची प्रतीक्षा आता सर्वांनाच लागली आहे.




मागील सलग दोन वर्षांत जिल्ह्यात चांगला पाऊस झाल्यामुळे विविध प्रकल्पांमध्ये मुबलक पाणीसाठा उपलब्ध होता. यंदा उन्हाळ्याची तीव्रता अधिक जाणवल्याने वेळेत पाऊस होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात होती. मात्र अद्यापही मान्सून सक्रिय न झाल्याने पावसाळ्यातही उन्हाळ्याचा अनुभव नागरिकांना येत आहे.

दरम्यान, वाढत्या तापमानाचा परिणाम भूगर्भातील पाणीपातळीवरही होत असल्याचे दिसून येत आहे. शहरातील अनेक भागांतील बोअरवेल कोरड्या पडू लागल्या असून, काही नागरिकांना खाजगी टँकरच्या पाण्यावर अवलंबून राहण्याची वेळ आली आहे.

मांजरा प्रकल्पात पाणीसाठा उपलब्ध असतानाही वितरण व्यवस्थेतील अडचणींमुळे नियमित पाणीपुरवठा करण्यात अडथळे येत असल्याचे नागरिकांकडून सांगितले जात आहे. त्यामुळे पावसाळ्याच्या काळातही पाणीटंचाईची समस्या कायम आहे.

मागील आठवड्यात काही दिवस ढगाळ वातावरण तयार झाले होते. जिल्ह्याच्या काही भागांत वादळी वाऱ्यासह हलका पाऊसही झाला. मात्र त्यानंतर पुन्हा आकाश निरभ्र झाले असून मान्सूनच्या आगमनाची प्रतीक्षा कायम आहे. पावसाच्या विलंबामुळे शेतकऱ्यांमध्येही चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

## लातूर लोकसभा मतदारसंघाच्या सर्वांगीण रेल्वे विकासासाठी सातत्याने पाठपुरावा करणार : खा.डॉ. शिवाजीराव काळगे




**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.१९, जून -**

दक्षिण मध्य रेल्वेचे विभागीय व्यवस्थापक गोपालकृष्णन यांच्या दौऱ्यादरम्यान लातूर लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. शिवाजीराव काळगे यांनी त्यांची भेट घेऊन मतदारसंघातील विविध प्रलंबित रेल्वे प्रश्नांवर सविस्तर चर्चा केली. यावेळी रेल्वे विकास, प्रवासी सुविधा, नवीन रेल्वेमार्ग, सुरक्षा व्यवस्था तसेच रेल्वे गाड्यांच्या विस्तारासंदर्भातील विविध मागण्यांचे निवेदन विभागीय व्यवस्थापकांना सादर करण्यात आले.

यावेळी बोलताना खासदार डॉ. शिवाजीराव काळगे यांनी लातूर लोकसभा मतदारसंघाच्या सर्वांगीण रेल्वे विकासासाठी सातत्याने पाठपुरावा करणार असल्याचे सांगितले. खासदार डॉ. काळगे यांनी सिकंदराबाद-मुंबई आणि सिकंदराबाद-पुणे मार्गावर विकाराबाद-जहीराबाद-बिदर-लातूर रोड-लातूर-कुर्डुवाडी मार्गे वंदे भारत शयनयान सेवा सुरू करण्याची मागणी केली.

तसेच वाढत्या प्रवासी संख्येचा विचार करून काझीपेठ-हडपसर-काझीपेठ एक्सप्रेस आणि यशवंतपूर-लातूर एक्सप्रेस या आठवड्यातून तीन दिवस धावणाऱ्या गाड्या नियमित चालविण्याची मागणी करण्यात आली.

याशिवाय बोधन-लातूर रोड नवीन रेल्वेमार्ग, लातूर रोड-नांदेड नवीन रेल्वेमार्ग तसेच विकाराबाद-परळी वैजनाथ दुहेरीकरण प्रकल्पांच्या सर्वेक्षणाची सद्यस्थिती जाहीर करून या कामांना गती देण्याची मागणी करण्यात आली. उदगीर आणि लातूर रोड रेल्वे स्थानकांवर कायमस्वरूपी रेल्वे संरक्षण दलाच्या (आरपीएफ) चौक्या स्थापन करण्याची आवश्यकताही खासदारांनी अधोरेखित केली.

निवेदनात मछलीपट्टणम-बिदर एक्सप्रेसचा लातूरपर्यंत विस्तार, बिदर-लातूर दरम्यान दिवसातून दोन वेळा डीईएमयू सेवा सुरू करणे, कोविड काळात बंद झालेल्या लोकमान्य टिळक टर्मिनस-बिदर आणि कोल्हापूर-बिदर या गाड्या पुन्हा सुरू करणे, सिकंदराबाद-शिर्डी एक्सप्रेसची वारंवारता वाढविणे तसेच हैदराबाद-बिदर इंटरसिटी एक्सप्रेसचा लातूरपर्यंत विस्तार करण्याच्या मागण्यांचाही समावेश करण्यात आला.

तसेच कोविडपूर्वी विविध रेल्वे स्थानकांवरील कारेपूर, जानवळ, हेर आणि रोहिणा येथील थांबे पूर्ववत करणे, पानगाव येथे नांदेड-पनवेल एक्सप्रेसला अतिरिक्त थांबा मंजूर करणे, सीएसएमटी-बिदर एक्सप्रेसला अतिरिक्त डबे जोडणे, खानापूर जंक्शन-परळी वैजनाथ विभाग नांदेड विभागाकडे हस्तांतरित करणे आणि मराठी भाषा कक्ष स्थापन करण्याची मागणीही करण्यात आली.

खानापूर जंक्शन येथील विद्यमान पिट लाईनचा वापर करून बिदरहून पुणे, मुंबई आणि अहमदाबादकडे नियमित रेल्वे सेवा सुरू करावी, अशी मागणी करण्यात आली. तसेच हेर, वडवळ नागनाथ आणि पानगाव येथील रेल्वे फाटकांवर उड्डाणपूल उभारणे, लातूर रोड स्थानकावरील फलाट क्रमांक २ व ३ वर संरक्षित शेड उभारणे, पानगाव येथील मालधक्का सुविधा पूर्ववत सुरू करणे तसेच जानवळ परिसरातील रोड अंडरब्रिजच्या दुरुस्तीची कामे तातडीने हाती घेण्याची गरजही व्यक्त करण्यात आली.

यावेळी उदगीर रेल्वे संघर्ष समितीचे अध्यक्ष रमेश अंबरखाने, सचिव मोतीलाल डोईजोडे, माजी आमदार शिवराज तोंडचिरकर यांच्यासह विविध संस्था, संघटनांचे पदाधिकारी, दक्षिण मध्य रेल्वेचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## विधानपरिषद निवडणुकीत वंचितचे नगरसेवक तटस्थ; मतदान टक्केवारीवर परिणाम

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.१९, जून -**



उस्मानाबाद-लातूर-बीड विधानपरिषद मतदारसंघाच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर गेल्या काही दिवसांपासून विविध पक्षांच्या उमेदवारांनी मतदारांच्या भेटीगाठींवर भर दिला होता. तसेच पक्षातील वरिष्ठ नेत्यांनीही बैठका घेऊन स्थानिक स्वराज्य संस्थांमधून निवडून आलेल्या प्रतिनिधींशी संवाद साधला. मात्र, वंचित बहुजन आघाडीची भूमिका अखेरपर्यंत स्पष्ट झाली नव्हती.

मतदानाच्या दिवशी लातूर महानगरपालिकेतील वंचितचे नगरसेवक पत्रकार परिषद घेऊन मतदान प्रक्रियेवर बहिष्कार टाकण्याची भूमिका जाहीर केली. पक्षाच्या निर्देशानुसार पाच नगरसेवकांनी मतदानापासून दूर राहण्याचा निर्णय घेतल्याने लातूर तहसीलमधील मतदानाच्या टक्केवारीवर त्याचा परिणाम झाल्याचे दिसून आले.




उस्मानाबाद-लातूर-बीड विधानपरिषद मतदारसंघासाठी गुरुवारी सकाळी ८ ते दुपारी ४ या वेळेत मतदान पार पडले. या निवडणुकीत सर्वसामान्य मतदारांना मतदानाचा अधिकार नसून स्थानिक स्वराज्य संस्थांमधून निवडून आलेले प्रतिनिधी मतदानाचा हक्क बजावतात. लातूर जिल्ह्यात नगरपरिषद, पंचायत समिती, नगरपंचायत, जिल्हा परिषद आणि महानगरपालिका मिळून एकूण ३६७ सदस्य मतदानासाठी पात्र होते.

उमेदवारी निश्चित झाल्यानंतर भाजप आणि काँग्रेसकडून मतदारांशी संपर्क वाढविण्यावर भर देण्यात आला होता. मतदारांची संख्या मर्यादित असल्याने मतांचे विभाजन टाळण्यासाठी पक्षांकडून स्वतंत्र रणनीती आखण्यात आली होती.

लातूर तहसील वगळता जिल्ह्यातील इतर नऊ मतदान केंद्रांवर १०० टक्के मतदान झाल्याची माहिती समोर आली आहे. लातूर तहसीलमध्ये एकूण ८८ मतदारांपैकी ८३ जणांनी मतदानाचा हक्क बजावला.

महानगरपालिका निवडणुकीत काँग्रेस आणि वंचित बहुजन आघाडी यांच्यात युती झाली होती. त्यामुळे विधानपरिषद निवडणुकीत वंचितची मते काँग्रेसच्या बाजूने जाऊ शकतात, असा अंदाज व्यक्त केला जात होता.

मात्र पक्षाच्या आदेशानुसार वंचित नगरसेवकांनी मतदानावर बहिष्कार टाकल्याने त्याचा निवडणुकीच्या निकालावर काय परिणाम होतो, याकडे आता राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे. २२ जून रोजी निकाल जाहीर होणार आहे.